# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹


## जीएसटी निरीक्षक, अधीक्षकाला अटक

**मुंबई :** केंद्रीय अन्वेषण विभागाने रचलेल्या सापळ्यात वस्तू आणि सेवा कर विभागातील अधीक्षकासह निरीक्षक अडकले. एका व्यावसायिकाला जीएसटी प्रमाणपत्र देण्यासाठी या दोघांनी २५ हजार रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने सांताक्रूझ येथील वस्तू आणि सेवा कर विभागाच्या कार्यालयाकडे जीएसटी नोंदणीसाठी अर्ज केला होता. पाहणीनंतर जीएसटीकडून प्रमाणपत्र देण्यात येणार होते. त्यानुसार वस्तू आणि सेवा कर विभागातील निरीक्षकाने पाहणी केली होती. परंतु प्रमाणपत्र देण्यास तो टाळाटाळ करीत होता. सकारात्मक पाहणी अहवाल आणि त्याआधारे नोंदणी प्रमाणपत्र हवे असल्यास २५ हजार रुपये देण्याची मागणी त्याने केली. तक्रारदाराच्या कंपनीत काहीच त्रुटी नव्हत्या. त्याला लाच द्यायची नव्हती. त्यामुळे त्याने या संदर्भात केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तक्रार केली.

## दहशतवाद्याचा प्रयत्न लष्कराने हाणून पाडला

**श्रीनगर :** पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधून दहशतवाद्यांच्या घुसखोरीचे प्रयत्न सुरक्षा दलांच्या सजगतेमुळे आणि आधुनिक टेहेळणी प्रणालीच्या मदतीने हाणून पाडला. यासंदर्भातील कारवाईची माहिती सीमा सुरक्षा दलाचे काश्मीर फ्रंटियरचे महासंचालक अशोक यादव यांनी दिली. सीमेपलीकडील लाँचपॅडवर शंभर ते दहशतवादी असून त्यांच्या हालचालीवर गुप्तचर यंत्रणांचे लक्ष असल्याचेही यादव म्हणाले. गुप्तचर संस्थेच्या अहवालानुसार भारत पाकिस्तान नियंत्रणरेषेच्या पलीकडे लाँच पॅडवर अनेक दहशतवादी सक्रिय असून ते भारतात घुसण्याच्या तयारीत आहेत.नियंत्रणरेषेवरील परिस्थितीबाबत विचारले असता यादव म्हणाले, सीमा सुरक्षा दल आणि लष्कराकडून नियंत्रणरेषेवर अधिक सजगता बाळगली जात असून आधुनिक निगराणी उपकरणांमुळे घुसखोरीचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले आहेत.

# रायगडच्या पर्यटनाला आंतरराष्ट्रीय ओळख

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, नागाव समुद्रकिनाऱ्यांना स्वच्छता, पर्यावरणस्नेही व्यवस्थापन आणि शाश्वत पर्यटनाच्या निकषांवर ब्लू फ्लॅग पायलट बीचचा बहुमान मिळाला आहे. भारतातील पाच किनाऱ्यांना हा दर्जा मिळाला असून, रायगडचे दोन किनारे असल्याने आंतरराष्ट्रीय नकाशावर कोकणातील सागरी पर्यटनाची नवी ओळख निर्माण झाली आहे.

श्रीवर्धन आणि नागाव किनाऱ्यांचे ब्लू फ्लॅग इंडिया व पर्यावरण आणि हवामान बदल विभाग तसेच पर्यटन संचालनालय यांच्या संयुक्त उपक्रमांतर्गत मूल्यमापन करण्यात आले. राष्ट्रीय परीक्षक मंडळ व नॅशनल ऑपरेटर यांनी केलेल्या संयुक्त पाहणी, तांत्रिक तपासणीनंतर २०२५-२६ हंगामासाठी या किनाऱ्यांना पायलट स्टेटस मान्यता देण्यात आली आहे. श्रीवर्धन किनाऱ्याच्या विकासासाठी किनाऱ्यावरील वाळुक्षरण रोखण्यासाठी शास्त्रीय बौल्डर रचना आणि वृक्षसंवर्धनावर भर दिला जाणार आहे. तर नागाव किनाऱ्याच्या आराखड्यात प्रवेशद्वार, शौचालये, खाद्य विभाग, •›पान २ वर



■ श्रीवर्धन, नागाव किनाऱ्यांना ब्लू फ्लॅग पायलटच्या मिळणार दर्जा

### ब्लू फ्लॅग म्हणजे काय?

- सागरीकिनाऱ्यांच्या पर्यावरणीय गुणवत्ता, पाण्याची स्वच्छता, सुरक्षा व स्वच्छता सुविधांवरील काटेकोर निकषांवर ब्लू फ्लॅग हा आंतरराष्ट्रीय दर्जा दिला जातो. जगभरातील ५० पेक्षा अधिक देशांत हा सन्मान मिळवलेले बीच पर्यावरणपूरक पर्यटनाचे आदर्श मानले जातात.

### मान्यतेसाठी २०२६ उजाडणार

- ब्लू फ्लॅग समितीकडून डिसेंबरमध्ये मध्यमकालीन आढावा घेतला जाणार असून, मार्च-एप्रिल २०२६ मध्ये अंतिम तपासणीनंतर किनाऱ्यांना पूर्ण आंतरराष्ट्रीय ब्लू फ्लॅग दर्जा मिळण्याची अपेक्षा आहे. पर्यावरण व पर्यटन विभागाचे अधिकारी, स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायतींच्या समन्वयातून महाराष्ट्रासाठी सस्टेनेबल कोस्टल टुरिझमचे आदर्श ठरणार असल्याचे ब्लू फ्लॅग इंडियाचे नॅशनल ऑपरेटर डॉ. श्रीजी कुरुप यांनी सांगितले.

## वेधक

### वांगणीमधून तरुणीचे अपहरण

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील वांगणी येथील स्वप्नालय मुलीचे बालगृह येथून एक अल्पवयीन तरुणीचे अपहरण करण्यात आले आहे. स्वप्नालय मुलीचे बालगृह येथून मुस्कान अरबाज शेख (वय १६) हिचे अपहरण करण्यात आले असून तिची उंची ४ फुट ६ इंच, रंग निमगोरा, नाक लांब व सरळ, केस काळे, बांधा मजबुत असून अंगात पांढऱ्या रंगाचा टिशर्ट त्यावर काळ्या रंगाचे पट्टे, उजव्या हातावर कोपऱ्याजवळ लहान पणी लागल्याची खुण आहे. तिला हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ यांच्याशी संपर्क साधावा.

### पनवेलमध्ये १४ लाखांची घरफोडी

**पनवेल :** सेक्टर-१४ मधील डॉक्टरांच्या बंद घरात चोरट्यांनी हात साफ करत येथून तब्बल १४ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. कळंबोली पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे. डॉ. गुरूनाथ नरशेट्टी (६४) हे त्यांच्या बंगल्याला कुलूप लावून कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. ही संधी साधत अज्ञात चोरट्यांनी बंगल्याच्या लाकडी दरवाज्याचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. तसेच लोखंडी कपाटातील लॉकर उघडून सोन्याच्या बांगड्या, मंगळसूत्र, लॉकेट, मोठे आणि लहान नेक्लेस, कानातील रिंग अशा दागिन्यांसह ४० हजार रुपयांची रोकड असा एकूण १४.७५ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. याबाबतची माहिती त्यांनी कळंबोली पोलीस ठाण्याला दिली.

### पोर्शे कारला भीषण अपघात

**मुंबई :** मुंबईतील पश्चिम द्रुतगती महामार्गावर वेगवान शर्यतीमुळे भीषण अपघात झाला. या अपघातात पोर्शे कारचा चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात पहाटे अडीचच्या सुमारास घडला. बोरिवलीहून अंधेरीकडे जाणाऱ्या मार्गावर बीएमडब्ल्यू आणि पोर्शे या दोन महागड्या कारची शर्यत सुरू होती. त्यावेळी पोर्शे कारच्या चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि कार थेट दुभाजकावर जाऊन आदळली. भीषण धडकेनंतर ही कार चार ते पाच वेळा पलटी झाली. अपघातात कारचा चेंदामेंदा झाला असून चालक गंभीररित्या जखमी झाला आहे. धडकेनंतर गाडीतील एअरबॅग्ज उघडल्यामुळे चालकाचा जीव वाचला, मात्र त्याला गंभीर दुखापत झाली आहे.

# महावितरणचे कर्मचारी संपावर



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

महावितरणचे खासगीकरण शासनाकडून सुरु करण्यात आले. या खासगीकरणासह विविध मागण्यांसाठी महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी लढा सुरु केला आहे. गुरुवारपासून (दि.९) तीन दिवस संप पुकारला आहे. सकाळी अलिबागमधील अतिरिक्त कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयासमोर आणि दुपारी पेण येथील अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयासमोर राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीच्या वतीने निदर्शने करण्यात आली.

महानिर्मितीच्या ताब्यातील जलविद्युत प्रकल्पाचे खासगीकरण, महापारेषणमधील टीबीसीबीच्या माध्यमातून सुरु झाले आहे. महावितरण कंपनीमधील एकतर्फी पुनर्रचना केली जात आहे. महावितरण, महापारेषण, महानिर्मिती कंपनीतील विविध मार्गाने होणाऱ्या खासगीकरणाविरोधात महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी संप सुरु केला आहे. राज्य शासनाने मंजूर केलेली पेन्शन योजना लागू करा. मागासवर्गीय पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करा. तिन्ही कंपनीमधील वर्ग तीन व चार स्तरावरील संवर्ग निहाय रिक्त पदे भरण्यात यावी. सरळसेवा भरती, पदोन्नती व अंतर्गत भरतीद्वारे मूळ बी. आर प्रमाणे भरणे. कंत्राटी व बाह्यस्त्रोत कामगारांना कायम नोकरीत समाविष्ट करण्यात धोरण राबविणे अशा अनेक मागण्यांसाठी हा लढा सुरु केला आहे.

■ खासगीकरणाविरोधात कर्मचाऱ्यांचा लढा

■ अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयासमोर केली निदर्शने

महावितरण कंपनीमध्ये दीड हजारहून अधिक अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामध्ये नियमीत कर्मचारी ७५० असून त्यापैकी ५०० कर्मचारी संपावर गेले आहेत. महावितरणचे कर्मचारी संपावर गेल्याने वीजपुरवठा सेवा सुरळीत करण्यास अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम शासकीय कार्यालयांसह दवाखाने व सर्वसामान्य नागरिकांना होण्याची भिती निर्माण झाली आहे. ७२ तासांच्या संपाचा परिणाम जिल्ह्यातील वीज सेवेवर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

> “महावितरण कंपनीचे कर्मचारी रात्री बारा वाजल्यापासून नियमीत कर्मचाऱ्यांपैकी ७० टक्के कर्मचारी संपावर गेले आहे. बाह्यस्त्रोतमधील ७५० कर्मचारी तसेच २२ एजन्सीचे कर्मचारीदेखील कार्यरत आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी प्रशासनाकडून घेण्यात आली आहे. काही प्रमाणात कामामध्ये विलंब होऊ शकतो. त्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.
>
> - धनराज बक्कड- अधिक्षक अभियंता”

# गरीबांचा प्रवास खड्ड्यातून

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

हवेत उडणाऱ्या लोकांसाठी चांगले दिवस आहेत. परंतू जमीनीवर चालणाऱ्यांचे दिवस बिकट झाले आहेत. श्रीमंताना जाण्यासाठी उत्तम व्यवस्था केली जाते. गरीब मात्र खड्ड्यातूनच प्रवास करत आहे, अशी घणाघाती टीका माजी मंत्री बच्चू कडू यांनी केली. नवी मुंबई विमानतळ आणि अलिबाग पेण रस्त्यावरील दुरावस्थेबाबत नाराजी व्यक्त करीत त्यांना सरकारवर हल्लाबोल केला.

श्रीमंत, गरीब अशी दरी निर्माण केली जात आहे. जाती-जातीमध्ये भांडण लावण्याचे काम केले जात आहे. जाती जातीमध्ये न लढता आपल्या न्याय हक्कासाठी लढा, असे आवाहन त्यांनी केले. प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने अलिबागमध्ये हक्क यात्रा काढण्यात •›पान २ वर




■ माजी मंत्री बच्चू कडू यांची सरकारवर घणाघाती टीका

# कन्याशाळांचे होणार एकत्रीकरण

**। रायगड । प्रतिनिधी ।**

काळाच्या ओघात झालेले बदल विचारात घेऊन शालेय शिक्षण विभागाने कन्याशाळांचे रूपांतर मुले-मुली असलेल्या शाळांमध्ये करण्याचा निर्णय घेतला आहे. एकाच आवारात मुले आणि मुलींच्या स्वतंत्र शाळा असल्यास त्यांचे तात्काळ एकत्रीकरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शालेय शिक्षण विभागाने या बाबतचे शुद्धीपत्रक प्रसिद्ध केले. राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबरोबरच माध्यमिक शाळांचा विकास आणि विस्तार मोठ्या प्रमाणात झालेला आहे. शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे मूलभूत साधन •›पान २ वर

### शालेय शिक्षण विभागाचे निर्देश

### निर्णयाबाबत प्रश्न

- निर्णयाबाबत प्रश्नचिन्ह राज्यात काही ठिकाणी शासकीय कन्याशाळांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खासगी संस्थांच्या अनुदानित कन्याशाळा आहेत. त्यातील काही कन्याशाळा तर स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या आहेत. अनेक शाळांची पटसंख्या टिकून आहे. मात्र, आता शिक्षण विभागाने कन्याशाळांचे रुपांतर मुले, मुली असलेल्या शाळेत करण्याबाबत घेतलेला निर्णय अशा जुन्या शाळांनाही लागू होणार का, या बाबत या निर्णयात स्पष्टता देण्यात आलेली नाही. त्यामुळे या निर्णयाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.



## बोर्ली ग्रामपंचायतीवर महिलांचा हंडा मोर्चा

**। मुरूड । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील बोर्ली गावात गेल्या अनेक महिन्यांपासून पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. गावात नियमित पाणीपुरवठा होत नसल्यामुळे ग्रामस्थांना दीड ते दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या नदीनाल्यांमधून उन्हाच्या तडाख्यात पाणी आणावे लागत आहे. यामुळे विशेषतः महिलांवर मोठा मानसिक व शारीरिक ताण येत आहे.

या गंभीर परिस्थितीचा निषेध म्हणून बोर्ली गावातील महिलांनी ग्रामपंचायत कार्यालय येथे एकत्र येत हंडा मोर्चा काढला. यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक दोघेही कार्यालयात अनुपस्थित होते. सरपंचांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधला असता त्यांनी प्रत्यक्ष भेटण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले. दरवर्षी गावाकरीता •›पान २ वर

# पंचायत समितींवर महिलाराज

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष पदाच्या आरक्षणानंतर जिल्ह्यातील १५ पंचायत समितीच्या सभापतीपदाचे आरक्षण गुरुवारी (दि.९) जाहीर करण्यात आले. आठ पंचायतींवर महिलाराज असणार आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रत्येकी एक, नागरिकांचा मागास प्रवर्ग दोन आणि सर्वसाधारणमध्ये चार महिला राखीव ठेण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाची दोरी महिलांच्या हाती सोपविण्यात आली आहे. चक्री पध्दतीने ही आरक्षण सोडत काढण्यात आली.

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील १५ पंचायतीच्या सभापतीपदाचे आरक्षण काढण्यात आले. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात ही प्रक्रिया राबविण्यात आली. मयुरा महाडीक आणि कायरा शिंदे या दोन मुलींच्या हस्ते सोडत काढण्यात आली. सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी रविंद्र शेळके यांनी आरक्षणाचे वाचन केले.

म्हसळा पंचायत समितीच्या सभापतीपदासाठी •›पान २ वर




■ सभापती पदासाठी आरक्षण सोडत प्रक्रिया पूर्ण

■ ग्रामीण भागाच्या विकासाची दोरी महिलांच्या हाती

## जिल्हा परिषद निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी जाहीर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रारूप मतदार यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीतील नावेhttps://mahasecvoterlist.in या संकेतस्थळावर शोधण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला आहे. त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येत आहे. त्या आधारे तयार करण्यात आलेल्या जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय तसेच नगरपरिषद नगरपंचायतीसाठी प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी स्वतंत्र संकेतस्थळाची लिंक (दुवा) राज्य निवडणूक आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.



जिल्हा परिषद व पंचायत समितीची प्रारूप मतदार यादीची छायांकित प्रत संबंधित तहसील •›पान २ वर

### रुग्णवाहिकांचे जाळे उभारणार | आरोग्य विभागाकडून प्रस्ताव

# रुग्णांना तातडीने मिळणार उपचार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यात सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच एमएसआरडीसी, एनएचएआय अशा अनेक संस्थांच्यावतीने रुग्णवाहिका सेवा देण्यात येतात. या सर्व रुग्णवाहिकांचे एकत्रित जाळे व संचलन, देखरेख करण्यासाठी आरोग्य विभागाकडून प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. यामुळे अतिगंभीर रुग्णांना महत्त्वांच्या तासांत रुग्णालयापर्यंत पोहोचविण्यासाठी आणि त्यांचे प्राण वाचविण्यासाठी जलद रुग्णवाहिका उपलब्ध होणार आहे.

राज्याच्या रुग्णसेवेत लवकरच नवीन अत्याधुनिक १०८ रुग्णवाहिका रुजू होणार आहेत. या सर्व रुग्णवाहिका निर्धारित केलेल्या वेळेत सेवेत रुजू करून आवश्यकतेनुसार ठिकाणे निश्चित करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे नवीन अत्याधुनिक १०८ रुग्णवाहिकेसोबतच १०२, १०४, ११२ या क्रमांकाच्या रुग्णवाहिकाही कार्यरत आहेत. एमएसआरडीसी, एनएचएआय या संस्थांच्या वतीने महामार्गावर, टोल नाक्यावर, रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या आहेत. या सर्व रुग्णवाहिकांचे एकत्रित नेटवर्क तयार केल्यास, रुग्णांना महत्त्वाच्या तासांत जलद रुग्णसेवा उपलब्ध होणार आहे.

राज्यातील रुग्णवाहिका सेवावर महाराष्ट्र शासन असे स्पष्ट लिहिले असावे. कोणत्याही कंपनीचे नाव किंवा चिन्हे वापरू नये. पुरवठादार संस्थेने, रुग्णवाहिकेवर आपल्या कंपनीची नव्हे तर महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असल्याचे नमूद करावे. शासकीय अधिकाऱ्यांच्या मान्यता घेऊनच रुग्णवाहिकेवरील ब्रँडिंग करावे, अशा स्पष्ट सूचना आरोग्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णवाहिका सेवा गतिमान करण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला असून याचाच एक भाग म्हणून आगामी काळात तब्बल १७०० नवीन रुग्णवाहिका खरेदी करण्यात येणार आहेत. यासाठी सुमारे ८७२ कोटी रुपये खर्च येणार असून यातील ४९ टक्के रक्कम आरोग्य विभाग तर उर्वरित ५१ टक्के रक्कम ज्या संस्थेच्या माध्यमातून ही रुग्णवाहिका सेवा •›पान २ वर







## महाड ते शिवराजधानी रायगड समता मार्गावर
# २६ नोव्हेंबरला संत-स्वराज्य-संविधानयात्रा



। पोलादपूर । प्रतिनिधी ।
संविधान उखडायचे आहे असा प्रतिगाम्यांचा विचार स्पष्ट झाल्यानंतर आता संविधानासोबत जनतेला आणायचा प्रयत्न आहे. भीमरावांच्या चवदार तळे ते शिवरायांच्या रायगडपर्यंत समता मार्ग करीत आहोत.

२०२७ ला समतेच्या संघर्षाला १०० वर्षे पूर्ण होतील म्हणून २७ नोव्हेंबरला संविधान दिन वेगळा साजरा केला पाहिजे. पण त्याआधी महाड ते शिवराजधानी रायगड सम ता मार्गावर येत्या २६ नोव्हेंबरला संत-स्वराज्य-संविधानयात्रेचे आयोजन करून छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यासाठी १० हजारांहून अधिक सर्वधर्मियांसोबत सर्वपक्षियांची उपस्थिती अपेक्षित असल्याने हा सोहळा आतापर्यंतचा सर्वात मोठा संविधान रक्षणाचा सोहळा असेल, अशी माहिती सर्वहारा जनआंदोलनाच्या नेत्या उल्का महाजन यांनी दिली.

याप्रसंगी भारत घोगरे, कॉम्रेड धनाजी गुरव, भारत तथा कैकाडी जाधव, ह.भ.प. फडतरे, जालिंदर धिंगे, कैलास देसाई तसेच सर्वहारा जनआंदोलनाचे चंद्रकांत गायकवाड आणि सोपान सुतार यांच्यासह अन्य समाजसेवी व्यक्ती तसेच सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उल्का महाजन यांनी जी.जी. पारिख यांना श्रध्दांजली वाहताना युसूफ मेहेरअली सेंटर ताराची उभारणी करून सामाजिक प्रयोग केल्याचे सांगून गेल्यावर्षी १०० वर्षं पूर्ण केली आणि १०१ व्या वर्षी निरोप घेतला. राज्यस्तरीय संयोजन समितीमार्फत आर्किओलोजी व अन्य डिपार्टमेंटच्या परवानग्या आवश्यक आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांची भेट झाली, सकारात्मक प्रतिसाद आहे. पण संत-स्वराज्य-संविधानयात्रेचे आयोजन जनचळवळीच्या जोरावर चालणार, असेही उल्का महाजन यांनी स्पष्ट केले.

शिवशंभू प्रतिष्ठानतर्फे आयोजित शिवस्वराज्य मोहिमेची माहिती देताना कैलास देसाई यांनी २६ नोव्हेंबरला विविध सामाजिक व धार्मिक संस्कृतीची शिवाजी महाराजांना सामूहिक मानवंदना करण्याचा मुख्य कार्यक्रम झाल्यानंतर २७ नोव्हेंबरला रायगड प्रदक्षिणेचे नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले.

कॉम्रेड धनाजी गुरव यांनी, महाराष्ट्रभरातून १० हजाराहून अधिक कार्यकर्ते रायगडावर येणार असून आपण विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे अध्यक्षपद भूषविताना मंदिरातून बडवेहटाव आंदोलन केल्याची माहिती देऊन सामाजिक क्रांती झाल्याशिवाय राजकीय क्रांती होत नाही. जे तरुण प्रतिगाम्यांसोबत शिवाजी महाराजांच्या नावाने जात आहेत त्यांना सोबत घेऊन वादाचे मुद्दे खोडावेत, असे प्रयत्न करण्याची गरज आहे.

# बेकायदेशीर अतिक्रमणावर हातोडा

। पनवेल । प्रतिनिधी ।
कोमोठे वसाहतीमधील हॉटेल वेंकटेश प्रेसिडन्सी नावाच्या इमारतीत करण्यात आलेल्या अतिक्रमणावर आणि बेकायदेशीर बांधकामावर पालिकेने हातोडा चालवला आहे. या संदर्भात प्रहार जनशक्ती पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुनील शिरीषकर यांनी आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेऊन संबधित हॉटेलवर कारवाई करण्याची मागणी केली होती. शिरीषकर यांच्या मागणीची दखल घेत करण्यात आलेल्या या कारवाई बाबत प्रहारच्या कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

या ठिकाणी वापरातला बदल करून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर आणि अनधिकृत बांधकाम केले असल्याने ते तात्काळ निष्काशीत करून संबधित भोगवटादार आणि हॉटेल वापरकर्ता यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना अधिनियम अन्वये कारवाईची मागणी प्रहारने केली होती. त्याबाबत प्रहारच्यावतीने सतत पाठपुरावा केल्यानंतर अखेर बेकायदेशीर अतिक्रमण करणाऱ्या हॉटेल वेंकटेश प्रेसिडन्सीवर पनवेल पालिकेच्या प्रभाग अधिकारी सुबोध ठाणेकर यांनी अतिक्रमण व पोलीस बंदोबस्तामध्ये बेकायदेशीर अतिक्रमण हातोडा मारत तोंडकामची कारवाई केली आहे.



**जाहीर सूचना**
याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत गट क्र. २०२, गाव सोगाव, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड या मालमत्तेसंदर्भात (यापुढे मालमत्ता म्हणून उल्लेखित) १. निशा पंढरीनाथ म्हात्रे, २. मीरा गजानन घरत, ३. अभिजीत गजानन घरत, ४. रंजना रामचंद्र घरत व ५. पल्लवी समीर म्हात्रे (मालक) यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.
सर्व व्यक्ती/घटक/व्यक्ती, यांमध्ये कोणतीही बँक वा वित्तीय संस्था यांचा समावेश असेल यांचा सदर मालमत्ता वा तिच्याकोणत्याही भागासंदर्भात किंवा त्यावरील बांधकामासंदर्भात, यामध्ये कायद्याच्या कार्यान्वयनाअंतर्गत विकास हक्क, एफएसआय/टीडीआर यांद्वारे वा अन्य कोणत्याही स्वरूपातील हक्कांचा समावेश असेल, यामध्ये उत्तराधिकार, विनिमय, हिस्सा, संपादन, विभाजन, हस्तांतरण, करार, विक्री, अभिहस्तांकन, मृत्यूपश्चात वारसा, प्रभार, गहाण, तारणगहाण, परवानगी, उप-परवानगी, भाडेकरार, उप-भाडेकरार, धारणाधिकार, सुविधाधिकार, विचाराधीन विवाद, अनुज्ञप्ती, गहाण, हमी, सुविधाधिकार, भेट, न्यास, देखभाल, ताबा, निषेधाज्ञा, कर्जे, आगाऊ रकमा, जप्ती वा भार, निषेधाज्ञा वाकोणत्याही न्यासाअंतर्गत लाभ हितसंबंध, पूर्व क्रय अधिकार वा जुना वहिवाट हक्क वा कोणतेही कंत्राट/विक्री करार वा अन्य कोणत्याही स्वरूपात वा प्रलंबित दावाखटला, भागीदारी, संयुक्त उद्यम, कुटुंब व्यवस्था/तडजोड वा कोणतेही न्यायालय वा न्यायाधिकरणाद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूम वा कायद्याच्या अंमलबजावणीअंतर्गत अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा, हिस्सा, हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित सत्यापित प्रतींसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत त्यांचा हिस्सा वा दाव्याची, काही असल्यास, सूचना खालील निर्देशित पत्त्यावर द्यावी.
सदर प्रसिद्धी दिनांकापासून ७ दिवसांच्या आत आम्हाला सहाय्यक दस्तावेजांसमवेत अशी कोणतीही सूचना/दावा प्राप्त न झाल्यास, मालमत्तेमध्ये मालकांचा संपूर्ण हक्क आहे असे समजण्यात येईल व सदर मालमत्तेसंदर्भात कोणत्याही स्वरूपातकोणतेही विपरीत हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी नाही असे समजण्यात येईल तसेच सदर मालमत्ता भारांपासून मुक्त समजण्यात येईल व आमचे अशील हे
असा दावा वा मागणीच्या कोणत्याही संदर्भाविना सदर मालमत्तेसंदर्भात मालकांसमवेत व्यवहार पूर्ण करण्यास मुक्त असतील व अशा व्यक्तींचे दावे, काही असल्यास, ते अधित्यागित वा परित्यागित समजण्यात येतील व आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.
**अनुसूची**
**(मालमत्तेचे विवरण)**
पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. २०२, मोजमापित २१ आर अर्थात २१०० चौरस मीटर, गाव सोगाव, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड येथील.
दिनांक : १० ऑक्टोबर, २०२५
मेहेरनोश जे. हुमरानवाला
भागीदार
TATVALEGAL
वकील व सॉलिसिटर्स
१०१, १ ला मजला, जन्मभूमी भवन, जन्मभूमी मार्ग, फोर्ट - ४०० ००१.

**पान १ वरून**

## रायगडच्या पर्यटनाला आंतरराष्ट्रीय ओळख

वाहनतळ, जलतरण सुरक्षित क्षेत्र अशी सुसज्ज सुविधा उभारण्याचे नियोजन आहे. दोन्ही किनाऱ्यांवर सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा वर्गीकरण, सुरक्षितता उपाययोजना आणि स्थानिक ग्रामपंचायतींच्या सहभागातून स्वच्छता मोहीम राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## गरीबांचा प्रवास खड्डयातून

आली. यावेळी ते बोलत होते. सभेच्या सुरुवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते सभा मंडपापर्यंत रॅली काढण्यात आली. या रॅली दिव्यांगसह असंख्य नागरिक सहभागी झाले होते.

याप्रसंगी माजी मंत्री तथा प्रहार जनशक्तीचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांनी सांगितले की, हा लढा कोणत्याही जाती, धर्मासाठी नाही, तर शेतकरी, मच्छिमार, दिव्यांग, मेंढपाळांच्या न्याय हक्कासाठी आहे. मुंबईची ओळख गिरणी कामगार म्हणून होती. परंतु ती ओळख आता राहिली नाही. रक्ताचे पाणी करून मुंबईला जपण्याचे काम केले. त्यांची घरे कधी मोठी झाली नाही. मात्र त्याच मुंबईत नेते आणि उद्योगांची घरे मोठी झाली असल्याचे चित्र आहे. धर्माच्या नावावर राजकारण करणारे विकास कधीच करू शकत नाही, असे बच्चू कडू म्हणाले. पुढे त्यांनी सांगितले, पंतप्रधान यांनी अपंगावरून दिव्यांग शब्द आणला. परंतु त्या दिव्यांगांना सुविधांसाठी आजही भांडावे लागत आहे. पंधराशे रुपये देऊन मुर्ख बनविण्याचे काम केले जात आहे. त्यावर प्रहार केला जाणार आहे. मुंबई अलिबागच्या अगदी जवळ आहे. आर्थिक राजधानीच्या बाजूला असलेल्या अलिबागला सावली पडली असती, तर अलिबाग चमकले असते. परंतु अलिबागची अवस्था काय आहे, हे दिसून आले आहे, अशी टीका कडू यांनी केली.

## कन्याशाळांचे होणार एकत्रीकरण

असल्यामुळे सुरुवातीपासूनच राज्यात स्त्री शिक्षणाला महत्त्व देण्यात आलेले आहे. माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचा प्रसार मुलींमध्ये होण्यासाठी सुरुवातीला मुलींसाठी स्वतंत्र शाळा देण्याचे धोरण अवलंबले होते. त्यातून राज्यात अनेक कन्याशाळा अस्तित्वात आल्या.

माध्यमिक शिक्षणाची सार्वत्रिक सोय उपलब्ध नसल्याने कन्या शाळांचा मुलींच्या शिक्षणाच्या प्रसारासाठी निश्चितच उपयोग होता. सन २००१ नंतर कायम विनाअनुदान तत्त्वावर माध्यमिक शिक्षणाचा विस्तार मोठ्या प्रमाणात करण्यात आलेला आहे. सहशिक्षणामुळे समानतेचे वातावरण निर्माण होते, लिंगांमधील परस्पर आदर आणि समज वाढते, निरोगी सामाजिक आणि संवाद कौशल्यांना प्रोत्साहन मिळते आणि विद्यार्थ्यांना शाळेनंतर येणाऱ्या वैविध्यपूर्ण, वास्तविक जगाच्या वातावरणासाठी तयार करते. तसेच सहशिक्षण शैक्षणिक आणि शिक्षणेतर उपक्रमात संतुलित सहभागासाठी प्रोत्साहन देते. शालेय शिक्षणाच्या वयात मुलांमध्ये लिंगभेदाची भावना निर्माण होऊ नये, मुलामुलींना एकत्रित शिक्षणाची संधी मिळून त्यांच्या व्यक्तिमत्वाची निकोप वाढ व्हावी या भूमिकेतून सहशिक्षणाच्या शाळा चालवणे कालसुसंगत आहे, असे शिक्षण विभागाने नमूद केले आहे.

उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने याचिका क्रमांक ३७७३/२०००च्या निकालपत्रात यापुढे कन्या शाळांना स्वतंत्रपणे परवानगी देण्यात येऊ नये, असे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर आता काळाच्या ओघात झालेला बदल विचारात घेऊन कन्या शाळांचे सहशिक्षणाच्या शाळेमध्ये रूपांतरण करण्यासाठी २००३ आणि २००८मधील शासन निर्णय अधिक्रमित करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. तसेच एकाच आवारात मुले आणि मुलींच्या स्वतंत्र शाळा असल्यास त्यांचे तत्काळ एकत्रीकरण करून स्वतंत्र शाळांचे रूपांतरण सहशिक्षणाच्या शाळेत करावे, या अनुषंगाने अंमलबजावणीचे अधिकार शिक्षण आयुक्तांना देण्यात येत आहेत. संबंधित शाळेला एकच युडायस क्रमांक लागू राहील. त्याशिवाय कार्यरत असलेल्या स्वतंत्र शाळांनी संयुक्त शाळेला मान्यता देण्याचे प्रस्ताव सादर केल्यास त्या प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकारही शिक्षण आयुक्तांना देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## जिल्हा परिषद निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी जाहीर

कार्यालयात उपलब्ध असेल. त्याचबरोबर नगरपरिषद व नगरपंचायतीची प्रारूप मतदार यादीची छायांकित प्रत संबंधित नगरपरिषद व नगरपंचायतीच्या कार्यालयात उपलब्ध असेल. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपरिषदा, नगरपंचायती इत्यादींच्या मतदार यादीसाठी प्रतिपृष्ठ दोन रुपयेप्रमाणे शुल्क भरावे लागेल. प्रारूप व अंतिम मतदार यादीची विनाछायाचित्राची पीडीएफ प्रत https://mahasecvoterlist.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

## पंचायत समितींवर महिलाराज

अनुसूचित जाती (महिला), तळा सभापतीपदासाठी अनुसूचित जमाती, श्रीवर्धनसाठी अनुसूचित जमाती (महिला),कर्जत आणि माणगांव पंचायत समिती सभापतीसाठी नागरिकांचा मागासप्रवर्ग, महाड व अलिबाग पंचायत समिती सभापतीपदासाठी नागरिकांचा मागासप्रवर्ग (महिला), खालापूर, उरण, मुरूड आणि पोलादपूरसाठी सर्वसाधारण तसेच पेण, रोहा, सुधागड, आणि पनवेल पंचायत समिती सभापतीपदासाठी सर्वसाधारण (महिला) आरक्षण काढण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील पंधरा तालुक्यांपैकी ८ तालुक्यांवर महिलाराज असणार असल्याचे चित्र आहे.

जिल्हा परिषदेसह पंचायत समितीवर गेल्या तीन वर्षापासून प्रशासकिय राजवट सुरु आहे. जिल्ह्यातील पंचायत समितीचा कारभार गटविकास अधिकारी यांच्या मार्फत चालविला जात आहे. प्रशासकीय अधिकारी असताना ग्रामीण विकास झाला नसल्याची ओरड नागरिकांची कायमच राहिली आहे. त्यामुळे निवडणूका कधी लागणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर ही उत्कंठा संपली असून लवकरच पंचायत समितीच्या निवडणुकांचे बिगूल वाजणार आहे. प्रशासनामार्फत निवडणुकांच्या हालचाली सुरु झाल्याचे चित्र दिसून आले आहे. अलिबागसह अनेक पंचायत समितीवर महिला आरक्षण लागल्याने काही इच्छुकांची मोठी निराशा झाली आहे. सभापती पदासाठी काही राजकीय कार्यकर्त्यांनी गाव पातळीवर आपला दबदबा निर्माण केला होता. परंतु महिला आरक्षण लागल्याने त्यांची मोठी हिरमोड झाली असल्याची चर्चा आहे. तसेच महिला आरक्षण लागल्याने काही ठिकाणी आनंदही साजरा करण्यात आला आहे.

## बोर्ली ग्रामपंचायतीवर महिलांचा हंडा मोर्चा

दरवर्षी गावाकरीता राज्य आणि केंद्र सरकार तसेच विविध योजनांतून लाखो रुपयांचा निधी प्राप्त होत असतो. मात्र हा निधी फक्त कागदोपत्री खर्च झाल्याचे दाखवले जाते. प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारची कामे होत नसल्याने ग्रामस्थांना आजही पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. विकासकामांमध्ये पारदर्शकतेचा अभाव आणि निधीचा अपुरा वापर हा ग्रामस्थांच्या समस्यांचा मूळ कारण ठरत आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाने तातडीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी व संबंधित निधीच्या वापराबाबत चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## रुग्णांना तातडीने मिळणार उपचार

चालवण्यात येणार आहे त्यांनी खर्च करावयाची आहे.

राज्यात सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच एमएसआरडीसी, एनएचएआय, अशा अनेक संस्थाच्या वतीने रुग्णवाहिका सेवा देण्यात येतात. या सर्व रुग्णवाहिकांचे एकत्रित नेटवर्क व संचलन, मॉनिटरींग करण्याचा प्रस्तावही आरोग्य विभागाच्या विचाराधीन आहे. सध्या आरोग्य विभागाअंतर्गत १०८ रुग्णवाहिकेसोबतच १०२, १०४ व ११२ या क्रमांकाच्या रुग्णवाहिकाही कार्यरत आहेत. नव्याने खरेदी करण्यात येणाऱ्या सतराशे रुग्णवाहिकांमध्ये काही रुग्णवाहिका या नवजात अर्भकांसाठी असतील तर नंदुरबारसारख्या भागाचा विचार करून बोट रुग्णवाहिका घेण्यात येणार आहेत.

**जाहीर नोटीस**
सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक राणी संदेश म्हसे उर्फ राणी बंधु खडे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १७८/३/अ | ०-२७-८० | ४-१२ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १०/१०/२०२५
**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत,जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

**जाहीर नोटीस**
सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री. सुरजितसिंग बी कालो यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे -गुढवण तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ६३/१ | एकुण क्षेत्र ०-५३-१० हे आर पाँ | ६-०० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १०/१०/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर. अमराई रोड, कर्जत ता.कर्जत,जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर. अमराई रोड. कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**जाहीर नोटीस**
तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.अरविंद मोहनलाल जैन रा. रूम नंबर ३०४, विश्वनाथ नगर, डी विंग, तिसरा मजला, गांधी चौक, बदलापुर, ठाणे- ४२१५०३ यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक यांचेकडुन कायमच्या विकत घेण्याच्या निश्चित केलेल्या आहेत. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**१) मिळकत परिशिष्ठ अ-मौजे नागेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| खातेदार नाव | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| सुशिला किशोर खतरी व इतर | ४४/६ | १०.०८.०० | ५.४६ |

**२) मिळकत परिशिष्ठ ब-मौजे आंबिवली त. कोतलखलाटी, ता. कर्जत, जि.रायगड**

| खातेदार नाव | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे आर प्रति | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| काळुराम नारायण सावंत | ९/५ब | ०.४०.०० | ४.०० |

तरी सदर मिळकतींबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, कुळ वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत दयावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम, रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत, जि.रायगड. मो.नं.७७९८४३३८८८

सही /
**ॲड कैलास अनंत बासरे**

# बाळभूक मराठी कादंबरीचे प्रकाशन

**पनवेल :** मालवणी भाषेत काव्यसंग्रह प्रकाशित झालेल्या साहित्यिका डॉ. स्नेहा राणे यांच्या बाळभूक या पहिल्या मराठी कादंबरीचा प्रकाशन सोहळा ८ ऑक्टोबर २०२५ रोजी बॅलार्ड पिअर येथील मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या सभागृहात ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी त्यांच्या स्वतःच्या आणि डॉ. स्नेहा राणे यांच्या कवितांचे खुमासदार शैलीत वाचन करून आपल्या मार्गदर्शनपर भाषणात मालवणी भाषेचे गोड कौतुक केले.

**Government of Maharashtra**
**Forest Department**
**Mangrove Division- South Konkan**
Swapanapurti Bungalow, Behind Horizon Hall, Laxmi Nagar, Post Varsoli, Tal. Alibag, Dist Raigad-402 209. Email- dfom.southkonkan@gmail.com
**Parent Portal:** http://mahatenders.gov.in
**E-Tender Notice**
**Tender Notice No. DFO/MDSK/01/2025-26.**

Online Tender Forms in B-1 Format, for the following work are invited by the Divisional Forest Officer, Mangrove Division- South Konkan, Swapanapurti Bungalow, Behind Horizon Hall, Laxmi Nagar, Post Varsoli, Tal. Alibag, Dist Raigad-402 209. from the contractors registered with the Government of Maharashtra in appropriate class of Tender Notice.

The blank tender documents should be downloaded from Government website http://mahatenders.gov.in from 10/10/2025 at 5.00 pm to 17/10/2025 at 5.00 pm! Blank Tender documents will not be sold by this office; interested contractors have to download tender documents from the website. For any queries in this regard the interested contractors can contact on telephone no./Mobile no. 9960802320/8149737146 during office hours.

All requisite information required for the submission of Bid Capacity documents is available on the above said website. If any assistance is required regarding e-Tendering (uploading/downloading) please contact NIC Help Desk number: 1800 3070 2232.

| Sr. No | Name of work | Estimated cost | Earnest Money Deposit (Rs.) | Time limit for completion | Cost of Blank Tender Form (Non-Refundable) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | Providing & Erecting 1.6mt height Chain Link Fencing over UCR wall in Survey No-509/1,Mouje Akshi under Revdanda Beat, Alibag Round in Alibag- Raigad Range of Mangrove Division South Konkan. | 82,44,154/- | 82,441/- | 4 Months. | Rs. 1180/- (Including GST) |

1) No changes are to be made by the contractor in the tender documents published on the website. If any changes are made the tender documents will be rejected & action accordingly will be taken against the contractor. Information published on the government website will be final.
2) Right to reject any or all the tenders without assigning any reason there of is reserved.

sd/-
**Divisional Forest Officer,**
**Mangrove Division- South Konkan**

**अलिबाग नगरपरिषद**
**विज विभाग**
दुरध्वनी क्र ९१५६८९६१२३ ई-मेल-nagparishadalibag@gmail.com
-जा.क्र. दिनांक
**फेर निविदा सुचना**
**सन २०२५-२६**
अलिबाग नगरपरिषदेच्या वतीने मुख्याधिकारी अलिबाग नगरपरिषद खालील नमुद कामांकरिता नोंदणीकृत पुरवठादारांकडुन/ परवानाधारकांकडुन फेर निविदा मागवित आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | निविदा फॉर्म मिळणेची अंतिम दिनांक व वेळ | सिलबंद निविदा सादर करणेची अंतिम तारीख वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | अलिबाग नगरपरिषदेस सन २०२५-२६ करिता न.पा.चे विविध कार्यक्रमांस व्हीडीओ शुटींग व फोटोग्राफी सीडीसह पुरविणे | ४०० | ४००० | दि. १०/१०/२०२५ ते १६/१०/२०२५ वेळ ११-०० ते ४-०० वाजेपर्यत | दि. १७/१०/२०२५ रोजी संध्याकाळी ४-०० वाजेपर्यंत |
| २) | अलिबाग नगरपरिषदेस सन २०२५-२६ करीता फलेग्ज होडींग्ज तयार करणे वगैरे साहित्य पुरविणे | ४०० | ४००० | दि. १०/१०/२०२५ ते १६/१०/२०२५ वेळ ११-०० ते ४०० वाजेपर्यंत | दि. १७/१०/२०२५ रोजी संध्याकाळी ४-०० वाजेपर्यत |

सदर बाबत अधिक माहिती कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) विज विभागात मिळेल.
निविदा स्विकारणेच्या संबंधी सर्वसाधारण अटी व शर्ती
१) निविदा फॉर्म मधील सर्व तपशिल पूर्ण भरलेला असला पाहिजे. दर हे अक्षरी व अंकामध्ये नमुद करावे.
२) अपूर्ण भरलेले व खाडाखोड केलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.
३) मुदतीनंतर निविदा फॉर्म दिला जाणार नाही व सिलबंद निविदा स्वीकारल्या जाणार नाही.
४) लिफाफा द्विलिफाफा पद्धतीने स्वीकारल्या जातील. लिफाफा क्र.१ मध्ये सर्व पात्रता विषयक कागदपत्र तसेच लिफाफा क्र.२ मध्ये बोलीचा निविदा फॉर्म सादर करणेचा आहे.
५) लिफाफा क्र.१ इसारा रकमेच्या डी.डी. निविदा फॉर्म फी भरल्याची पावती (साहित्य पुरवठा निविदा कामी) पॅन कार्ड, अधिकृत विक्रता, शॉप ॲक्ट, यासंबधीत कागदपत्राच्या छायांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे लिफाफा क्र.२ मध्ये वित्तीय बोलीचा निविदा फॉर्म सादर करणेचा आहे.
६) इसारा रक्कम फक्त धनाकर्षद्वारे स्विकारण्यात येतील. पतसंस्थेकडील धनाकर्ष स्विकारण्यात येणार नाही. सिलबंद लिफाफा क्र.१ सोबत इसारा रक्कमेचा धनाकर्ष स्वतंत्र सिलबंद न करता देण्याचा आहे.
७) लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.२ वर कामाचे नाव स्पष्टपणे नमुद करावे. तसेच लिफाफा क्र.२ वर पात्रता विषयक कागदपत्र लिफाफा क्र.२ वर वित्तीय बोलीचे निविदापत्र असा स्पष्ट उल्लेख असावा.
८) कोणते ही कारण न देता एक किंवा सर्व निविदा स्वीकरणे अथवा नाकारणे याचा अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवले आहेत.
९) निधी उपलब्धते नुसार कामाची देयके अदा केली जातील.

सही/-
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**अलिबाग नगरपरिषद**

**जाहीर सूचना**
याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत गट क्र.१९६ धारक जमीन, गाव सोगाव, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड या मालमत्तेसंदर्भात (यापुढे मालमत्ता म्हणून उल्लेखित) सादीप नझीर कूर (**मालक**) यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.
सर्व व्यक्ती/घटक/व्यक्ती, यांमध्ये कोणतीही बँक वा वित्तीय संस्था यांचा समावेश असेल यांचा सदर मालमत्ता वा तिच्याकोणत्याही भागासंदर्भात किंवा त्यावरील बांधकामासंदर्भात, यामध्ये कायद्याच्या कार्यान्वयनाअंतर्गत विकास हक्क, एफएसआय/टीडीआर यांद्वारे वा अन्य कोणत्याही स्वरूपातील हक्कांचा समावेश असेल, यामध्ये उत्तराधिकार, विनिमय, हिस्सा, संपादन, विभाजन, हस्तांतरण, करार, विक्री, अभिहस्तांकन, मृत्यूपश्चात वारसा, प्रभार, गहाण, तारणगहाण, परवानगी, उप-परवानगी, भाडेकरार, उप-भाडेकरार, धारणाधिकार, सुविधाधिकार, विचाराधीन विवाद, अनुज्ञप्ती, गहाण, हमी, सुविधाधिकार, भेट, न्यास, देखभाल, ताबा, निषेधाज्ञा, कर्जे, आगाऊ रकमा, जप्ती वा भार, निषेधाज्ञा वाकोणत्याही न्यासाअंतर्गत लाभ हितसंबंध, पूर्व क्रय अधिकार वा जुना वहिवाट हक्क वा कोणतेही कंत्राट / विक्री करार वा अन्य कोणत्याही स्वरूपात वा प्रलंबित दावाखटला, भागीदारी, संयुक्त उद्यम, कुटुंब व्यवस्था/तडजोड वा कोणतेही न्यायालय वा न्यायाधिकरणाद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूम वा कायद्याच्या अंमलबजावणीअंतर्गत अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा, हिस्सा, हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित सत्यापित प्रतींसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत त्यांचा हिस्सा वा दाव्याची, काही असल्यास, सूचना खालील निर्देशित पत्त्यावर द्यावी. सदर प्रसिद्धी दिनांकापासून ७ दिवसांच्या आत आम्हाला सहाय्यक दस्तावेजांसमवेत अशी कोणतीही सूचना/दावा प्राप्त न झाल्यास, मालमत्तेमध्ये मालकांचा संपूर्ण हक्क आहे असे समजण्यात येईल व सदर मालमत्तेसंदर्भात कोणत्याही स्वरूपातकोणतेही विपरीत हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी नाही असे समजण्यात येईल तसेच सदर मालमत्ता भारांपासून मुक्त समजण्यात येईल व आमचे अशील हे असा दावा वा मागणीच्या कोणत्याही संदर्भाविना सदर मालमत्तेसंदर्भात मालाकंसमवेत व्यवहार पूर्ण करण्यास मुक्त असतील व अशा व्यक्तींचे दावे, काही असल्यास, ते अधित्यागित वा परित्यागित समजण्यात येतील व आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.
**अनुसूची**
**(मालमत्तेचे विवरण)**
पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. १९६, मोजमापित ३४ आर अर्थात ३४०० चौरस मीटर, गाव सोगाव, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड येथील.
दिनांक : १० ऑक्टोबर, २०२५
मेहेरनोश जे. हुमरानवाला
भागीदार
TATVALEGAL
वकील व सॉलिसिटर्स
१०१,१ ला मजला, जन्मभूमी भवन, जन्मभूमी मार्ग,फोर्ट-४०० ००१.

# निवडक



## शेतकऱ्यांसाठी शिवसेनेचे आंदोलन

**उरण** : अतिवृष्टीमुळे उरण तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शासन अद्यापही झोपेत असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्यावतीने उरण तहसिल कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसिलदार कार्यालय 'शेतकऱ्यांना न्याय द्या, कर्जमाफी करा, ५० हजार हेक्टरी मदत द्या' अशा घोषणांनी दणाणून गेले होते. शासनाने तात्काळ निर्णय घेतला नाही, तर शिवसेना रस्त्यावर उतरून अधिक तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनाचे नेतृत्व शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख माजी आमदार ममनोहर भोईर यांनी केले. यावेळी उपजिल्हाप्रमुख नरेश रहालकर, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, संपर्क प्रमुख दीपक भोईर, संघटक बी.एन. डाकी, गणेश म्हात्रे, एस. के. पुरो, ममता पाटील, वंदना पवार व आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला आघाडी व युवासेना पदाधिकारी सहभागी झाले होते.

## पनवेलची प्रारूप मतदार यादी जाहीर

**पनवेल** : सार्वत्रिक निवडणूक २०२५ अन्वये पंचायत समिती पनवेलची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही प्रारूप मतदार यादी पनवेलच्या तहसीलदार, अप्पर तहसीलदार, गटविकास अधिकारी कार्यालय व पंचायत समिती येथे तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना अवलोकनार्थ ठेवण्यात आली आहे. या प्रारूप मतदार यादीवर हरकत असल्यास तशी लेखी हरकत व सूचना १४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत तहसील व अप्पर तहसील कार्यालयात सादर करावेत. दि. १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजेनंतर कोणत्याही लेखी हरकती आणि सूचना कार्यालयात स्वीकारल्या जाणार नाहीत याची पनवेल पंचायत समिती हद्दीतील सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन प्रभारी तहसीलदार जितेंद्र इंगळे-पाटील यांनी केले आहे.

## शेकापतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन

**पाली/गोमाशी** : सुधागड तालुक्यात शेतकरी कामगार पक्ष व शेकाप खजिनदार महाराष्ट्र राज्य अतुल म्हात्रे यांच्या संकल्पनेतून पाली येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा शनिवारी (दि.११) सकाळी साडेदहा वाजता शिलोशी रोड येथील मराठा समाज हॉल येथे शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे व तालुका चिटणीस अतिष सागळे यांच्यावतीने करण्यात आले आहे. रोजगाराच्या शोधात असणाऱ्या रायगड जिल्ह्यातील युवक आणि युवतींनी या मेळाव्यात सहभाग घेऊन आपले नोकरीचे स्वप्न साकार करा. यासाठी शैक्षणिक पात्रता ८ वी ते पदवीधर असून वयोमर्यादा १८ ते ३५ अशी आहे. अधिक माहितीसाठी ७७१०८१९६८१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## एनएमआयएएल नावामुळे संभ्रमात वाढ

**पनवेल** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या लोकार्पणाचा सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी (दि.८) पार पडला. यावेळी प्रकल्पातग्रस्तांच्या मागणीची दखल घेत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिबा पाटील यांचे नाव




देण्यात येणार असल्याची घोषणा पंतप्रधान करतील, अशी आशा प्रकल्पग्रस्तांना होती. मात्र, अशी कोणतीही घोषणा न करता पंतप्रधान मोदी परतल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये नाराजीचे सुर उमटू लागले आहे. त्यामुळे अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम आदाणी यांना पंतप्रधान मोदी यांचे नाव विमानतळाला द्यायचे असल्यामुळेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांचे नाव देण्यास विलंब होत असल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. त्यातच भर म्हणून विमानतळाच्या संरक्षक भिंतीवर इंग्रजी अक्षरात लिहिण्यात आलेली एनएमआयएएल अक्षराचा अर्थ देखील नरेंद्र मोदी इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड असा लावून काही जण संभ्रमात भर टाकत असल्याने प्रकल्पग्रस्तामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच, संरक्षक भिंतीवर टाकण्यात आलेली ही अक्षर हेतू पुरस्कार टाकण्यात आल्याचा आरोप देखील काही जणांकडून केला जात आहे.

## 'नुकसानभरपाईच्या नावाने फसवणूक'

**उरण** : अतिवृष्टी व पुराने राज्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. खरीप हंगाम तर पूर्ण वाया गेलाच आहे, रब्बीचा हंगामही हाती लागणार नाही, अशी अवस्था आहे.



शेतीच्या नुकसानासोबत शेतकऱ्यांचे घरदार व संसार उघड्यावर पडले आहेत. परंतु, महायुती सरकारने मात्र नुकसानभरपाईच्या नावाने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. लाखोंचे नुकसान झाले असताना सरकारने जाहीर केलेली मदत ही अत्यंत तुटपुंजी असून उद्ध्वस्थ झालेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. त्यामुळे सरकारने सरसकट नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी व आश्वासन पाळून कर्जमाफी करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. पनवेल येथे गुरूवारी (दि.९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकापर्यंत संविधान संवाद यात्रा काढण्यात आली. त्यानंतर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'कामगार मेळावा' आणि 'संविधानाचा जागर २०२५' हे कार्यक्रम संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

# आरक्षणासाठी बंजारा समाज एकवटणार

### समाज बांधवांना मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी बंजारा समाज एकवटवणार आहे. रायगड जिल्हा सकल बंजारा आरक्षण समितीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर शुक्रवारी (दि.१०) दुपारी दोन वाजता भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. त्याची तयारी करण्यात आली असून ठिकठिकाणी बैठका घेऊन मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या मोर्चात ५ हजारहून अधिक बंजारा समाज सहभागी होणार असल्याचे प्रकाश राठोड यांनी सांगितले आहे.



सध्या बंजारा समाज विमुक्त जाती, काही राज्यांमध्ये अनुसूचित जमाती व काही राज्यांमध्ये इतर मागासवर्ग या प्रवर्गात समाविष्ट आहे. अनेक राज्यांमध्ये या समाजाचा समावेश अनुसूचित जमाती (एसटी) या वर्गात करण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षण टक्केवारीत स्वतंत्रपणे समावेश करण्यात यावे, या मागणीसाठी बंजारा समाजामार्फत मोर्चा काढण्यात येणार आहे. बंजारा समाजातील महिला-पुरुष, युवक व युवती असे असे ५ हजारहून अधिक नागरिक या मोर्चात सहभागी होणार आहेत. या मोर्चाला दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास सुरूवात होणार आहे. सकल बंजारा आरक्षण समिती रायगड जिल्हा यांच्यावतीने मोर्चा निघणार आहे. हा मोर्चा अलिबागमधील सेवालाल महाराज नाका कामगार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महावीर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बालाजी नाका, मारुती नाका ते जिल्हाधिकारी कार्यालय असा असणार आहे. सुरुवातीला सेवालाल महाराज तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केले जाणार आहे. त्यानंतर खऱ्या अर्थाने मोर्चाला सुरुवात होणार आहे.

या मोर्चाचे नेतृत्व प्रकाश राठोड, शंकर जाधव, अनिल राठोड, गोराम राठोड, लक्ष्मण पवार, माणिकशेठ, नारायण पवार, शिवराम राठोड, किशोर जाधव, रमेश जाधव, पांडू राठोड, राजू जाधव, भगवान पवार, मधुकर जोठात, रुपेश चव्हाण, विश्राताई जाधव, कुशाल राठोड, छगन राठोड, विजय चव्हाण, जगन्नाथ चव्हाण, भाऊसाहेब राठोड यांच्या मार्फत केले जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

## शेकापकडून यू टर्न रॅम्पची मागणी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

सायन-पनवेल महामार्गावरील खारघर कोपरा जंक्शनवर होणाऱ्या वाहतूककोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या ठिकाणी यु टर्न बांधकाम करण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या पनवेल पालिका महिला जिल्हाध्यक्ष हर्षला तांबोळी यांनी पत्राद्वारे पालिकेकडेकेली आहे. तसेच, दुसरा पर्यायी मार्ग म्हणजे मुंबईवरून येणारी वाहतूक नवीन उड्डाण पुलाद्वारे खारघरमधील कोपरा पुलाच्या आधी पर्यायी रस्त्याने फिरवली जावी, अशी मागणी देखील करण्यात आली आहे. कोपरा गावातून आणि खारघरमध्ये प्रवेश करणाऱ्या व बाहेर पडणाऱ्या वाहनांना या ठिकाणी थेट वळण्याची सुविधा नसल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी सायन-पनवेल महामार्गापासून खारघरच्या आत थेट कोपरा रस्त्यावर जाणाऱ्या यु टर्न रॅम्पचे बांधकाम केल्यास येथे रोज होणारी वाहतूक कोंडी सुटणार आहे. त्यामुळे महामार्गावर अडथळे निर्माण न करता वाहने थेट खारघरमध्ये सुरळीत वळवता येतील. तसेच, कोपरा गावाच्या प्रवेशद्वाराजवळ होणारी वाहतूक कोंडी कमी होईल. स्थानिक रहिवाशांसाठी वाहतूक व्यवस्थापन सुरक्षित होईल. त्यामुळे दररोज हजारो प्रवाशांना त्याचा फायदा होणार असल्याचे हर्षला तांबोळी यांनी म्हटले आहे.



काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली असून जिल्ह्यातील भातपीक कापणी योग्य झाले आहे. अलिबाग तालुक्यातील घोटवडे परिसरातील शेतकरी व कामगार भात कापणीत व्यस्त झाले आहेत. (छायाचित्र : प्रमोद जाधव)

## २१ तासानंतर विद्युत पुरवठा सुरळीत

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातील जवळपास ४० हुन अधिक गावांचा विद्युत पुरवठा तब्बल २१ तासानंतर सुरळीत करण्यात आला. मध्यरात्री वीज गायब झाल्याने अनेकांना भयंकर त्रास सहन करावा लागला. विद्युत अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीवर फोन केला असता त्यांचे फोन फॉरवर्ड केले असल्याचे वीज ग्राहकांनी सांगितले.

पनवेल तालुक्यातीली ४०हुन अधिक गावांतील विद्युत पुरवठा मंगळवारी (दि.७) मध्यरात्री बारा वाजता खंडित झाला होता. अनेकांची झोपमोड झाली. तसेच, वीज नसल्याने अनेकांचे पाण्याविना हाल




झाले होते. त्यामुळे कित्येकांना पाण्याचे जार विकत घ्यावे लागले. त्यातच दुग्धजन्य पदार्थ, आईस्क्रीम इत्यादी पदार्थ खराब झाल्याने अनेकांनी संताप व्यक्त केला. महावितरणच्या भोंगळ कारभाराचा फटका अनेकांना बसला. मात्र, हा विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरण विभागाला तब्बल २१ तासांचा कालावधी लागला. यादरम्यान, नागरिकांकडून वीज कधी येईल, यासाठी वितरणच्या अधिकाऱ्यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला

> **विद्युत पुरवठा ८ ऑक्टोबर रोजी रात्री नऊच्या दरम्यान सुरळीत करण्यात आला. आकुर्ली उपकेंद्रातील २२ केवी एचटी केबलमध्ये फॉल्ट झाल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला होता. लोड डायव्हर्ट करून काही ठिकाणी वीजपुरवठा रात्रीच सुरू करण्यात आला होता. २.५ किमी लांब केबल असल्यामुळे फॉल्ट आइडेंटिफाय केल्यानंतर केबल जोडण्याचे काम सुरु होते.**
> **- ममता पांडे, जनसंपर्क अधिकारी, महावितरण**

असता त्यांनी मोबाईल फोन फॉरवर्ड केले होते. त्यामुळे कोणाशी संपर्क साधायचा हेच समजत नव्हते. त्यामुळे अनेक जणांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## महिंद्रा पिकअप गाडीची चोरी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल जवळील चिंचपाडा येथे विठ्ठल मंदिराच्या बाजूला असलेल्या चारचाकी वाहनांच्या बॉडी शॉपच्या दुकानातून महिंद्रा कंपनीच्या पिकअप गाडीची चोरी झाल्याची घटना घडली आहे. अशोक कुमार शर्मा यांच्या दुकानात काम करण्यासाठी आलेल्या २ लाख रुपये किमतीच्या सफेद रंगाच्या महिंद्रा कंपनीची पिकअप (एमएच-४६-एएफ-४६४८) गाडीची एका अज्ञात चोरट्याने केली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## कोणत्या निकषावर दुकानांचे वितरण करणार?

### आदित्य जानोरकर यांचा आयुक्तांना सवाल

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकेने चारही प्रभागांमध्ये दैनिक बाजार बांधण्याचे प्रस्तावित केले आहे. नागरिकांच्या सेवेत सर्व सोयी सुविधानियुक्त असे प्रशस्त दैनिक बाजार उपलब्ध होणार असल्याचे महानगरपालिकेने सांगितले आहे. मात्र, कोणत्या निकषावर बाजारातील दुकाने वितरण करणार आहात, असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश युवक सचिव आदित्य जानोरकर यांनी पालिकेला विचारला आहे.

दैनिक बाजारातील दुकानांमध्ये स्थानिक बेरोजगार तरुण आणि महाराष्ट्र राज्याचे डोमासाईल प्रमाणपत्र असणाऱ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. ही दुकाने ३० ते ६० वर्षांच्या करारावर देण्यात यावी. जी व्यक्ती स्वतः या दुकानात व्यवसाय करेल त्यांना ही दुकाने वितरित करावीत. दुकानांचे होणारे वितरण स्वतः महापालिकेकडून काढण्यात यावे, अशी मागणी आदित्य जानोरकर यांनी पालिका उपायुक्त वैभव विधाते यांच्याकडे केली आहे.

## पनवेलमध्ये संविधान संवाद यात्रा

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल येथे मंगळवारी (दि.७) ज्येष्ठ कामगार नेते श्याम म्हात्रे यांच्या ७०व्या जयंतीनिमित्त 'संविधान संवाद यात्रा' आणि 'कामगार मेळावा' आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाची सुरुवात भारत देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या जाहीर निषेधाने झाली. या संविधान संवाद यात्रेची सुरूवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून झाली. या यात्रेचा उद्देश संविधानाची मूल्ये आणि तत्त्वे सर्वसमावेशक पद्धतीने पोहोचवणे हा होता. पनवेलमधील संविधानप्रेमी नागरिक, संस्था आणि संघटनांनी मोठ्या संख्येने यात्रेत सहभाग घेतला. होता त्यानंतर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात कामगार मेळावा आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे हर्षवर्धन सपकाळ, लोकशाहीर संभाजी भगत, राष्ट्र सेवा दलाचे अध्यक्ष श्राजा कांदळकर आणि डॉ. श्रीरंजन आवटे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

## पनवेलमध्ये बेवारस मृतदेह

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल परिसरात एका बेवारस व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या मृत व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ५० वर्षे असून डोक्याचे केस काळे, दाढी मिशी सफेद-काळी असून वाढलेली, बांधा सडपातळ, उंची अंदाजे ५ फुटापेक्षा जास्त आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## रोह्यातील वीज कर्मचाऱ्यांचा संप सुरू

**| रोहा | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या मनमानी कारभारा विरोधात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कृती समितीच्या नेतृत्वाखाली रोह्यातील वीज कर्मचारी, अभियंता अधिकारी कृती समितीच्यावतीने ७२ तासांचे लाक्षणिक संप पुकारले आहे. या संपला कर्मचारी अधिकारी वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. वीज कर्मचारांच्या या संपाला रोहे अष्टमीकर जनतेने पाठिंबा दर्शवीला आहे.

वीज वितरण कंपनीने खासगीकरणाचे धोरण अवलंबविले आहे. कंपनी खासगीकरण हे कामगार हिताचे नसून या निर्णयामुळे कर्मचारी आणि ग्राहक



वर्ग देशोधडीला लागतील. देशात सर्वत्र हुकूमशाही सुरु होईल. म्हणून रोहा वीज वितरण कंपनीचे उप अभियंता जतीन पाटील व अध्यक्ष रोशन धनवीज यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी (दि.९) सकाळपासून महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी व अभियंता अधिकारी कृती समितीच्यावतीने लाक्षणिक संपाला सुरुवात झाली आहे. हा संप शनिवार दि.११ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. यावेळी उप अभियंता योगेश आभाळे, निलेश खैरनार, रोशन धनवी, किशोर जाधव, मानसी क्षीरसागर, गुणाजी ठाकूर, मयूर बंगळे, करुणा माळी आदी कर्मचारी व अभियंता वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### बचत गटांकडील फराळाला मागणी | ऑर्डर देऊन विकत घेण्याकडे कल

# घरगुती फराळाला सुगीचे दिवस

**| पनवेल | प्रतिनिधी |**

दिवाळी हा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून दिवाळीमध्ये फराळाला अनन्य साधारण महत्व असते. सध्याच्या महागाईच्या काळामध्ये देखील घरगुती फराळाला सुगीचे दिवस आले असून मोठ्या प्रमाणात या फराळाकडे ग्राहकांची वाढती मागणी दिसून येत आहे.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात सर्वांनाच दिवाळीचा फराळ बनवायला मिळत नाही. त्यामुळे काही जण फराळ बाहेरून विकत घेतात. परंतु, दुकानातून विकत घेतलेला फराळ चविष्ठ असेलच असे नाही, किंवा कधी कधी त्याचा दर्जा देखील खालावलेला असतो. त्यामुळे दुकानात ठेवलेला फराळ विकत घेण्यापेक्षा ऑर्डर देऊन घरगुती फराळ विकत घेण्याकडे अनेकांनाचा कल असतो. उत्तम दर्जा आणि चव या दोन्ही गोष्टींची हमी असल्यामुळे महिला बचत गटांकडील फराळाची मागणी वाढली आहे.

दिवाळीच्या दरम्यान घरगुती फराळाची लाखोंची उलाढाल होते. पनवेलमध्ये तळागळातल्या महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सुरू झालेल्या बचतगटाच्या चळवळी बरोबरच घरगुती व्यवसाय म्हणून आता वटवृक्ष झाला आहे. पनवेल शहरी भागात तयार फराळाला मोठ्या प्रमाणात



मागणी असून ग्रामीण भागात अजूनही घरीच फराळ बनवण्याकडे कल दिसून येत आहे. दिवाळी म्हटली की, लाडू, करंजी, खमंग चिवडा अशा नानाविध पदार्थ बनविण्याची लगबग घराघरात सुरू होते. मात्र, अलीकडे धकाधकीच्या जीवनात फराळ बनविण्यासाठी वेळ मिळत नसल्याने तयार फराळालाही चांगली मागणी वाढली आहे. काही दिवसांवर दिवाळी येऊन ठेपल्याने बाजारपेठेत स्वीट मार्ट, किराणा व्यवसायिक, घरगुती पदार्थ बनविणारे उत्पादक यांनी आपल्या ग्राहकांना विविध फराळाचे पदार्थ देण्यासाठी आगाऊ बुकींग सुरू केली आहे. दरवर्षीच्या तुलनेत सुकामेवाच्या किमतीत वाढ झाली असून त्याचा परिणाम फराळाच्या किमतीवर झाला आहे. तरीही दिवाळी म्हटले की, किंमतीपेक्षा जीभेचे लाड पुरविण्याकडे अधिकचे लक्ष दिले जाते.

### फराळाचे पदार्थ बनविण्यासाठी धडपड

शाळेतील मुलांना लवकरच सुट्ट्या लागणार आहेत. प्रत्येकाची आपल्या मामाच्या गावी तथा मुळ गावी जाण्याकडे धडपड सुरू आहे. त्यातच फराळाचे पदार्थ बनविण्यासाठी किराणासह अन्य वस्तु घरामध्ये येत आहेत. त्यात भडंग मुरमुरे, शेंगदाणा, रवा, दालव, मका पोहे, मैदा, रवा, बॉम्बे बेसण, हरभरा पीठ, दालडा, गावरान तूप, फरसान यासोबतच मिठाई, गिफ्ट पॅक, चिवडा बनविण्याचा तयार मसाला याकडे ग्राहकांचा अधिक ओढा आहे. दरवर्षी साधारणतः २ ते ३ हजारांमध्ये बसणारे बजेट ४ हजारांवर जाऊन पोहोचले आहे. पालक शेव, लसून शेव, मसाला शेव, चिवडा, खारी बुंदी, चकली भाजणी, खारे शंकरपाळे, लाडू, बूंदी, शंकरपाळे, अनारसे, करंजी, अनारसे पीठ या पदार्थांना ग्राहकांची अधिकची मागणी आहे.

# राजकीय उड्डाणासाठी

नवी मुंबई विमानतळाचे राजकीय उद्घाटन आणि नरेंद्र मोदी यांचे तितकेच जंगी राजकीय भाषण असा कार्यक्रम बुधवारी पार पडला. वास्तविक मोदी आलेच होते तर त्यांना मुंबई-गोवा महामार्गावरही पाच-दहा मिनिटे हिंडवायचे होते. त्यामुळे तरी किमान पुढच्या पाच वर्षात हा मार्ग पूर्ण झाला असता. असो. याच परिसरातल्या मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे अशा तमाम पालिका निवडणुका लवकरच होणार आहेत. त्यांची आचारसंहित लागली तर पंचाईत नको या उद्देशाने विमानतळाचे उद्घाटन उरकून घेण्यात आले. त्यातही राजकीय क्षुद्रपणा करण्यात आलाच. दि.बा. पाटील यांच्या नावासहितच हे उद्घाटन होईल अशी सर्वांची अपेक्षा असताना त्याचा फायदा विरोधकांना होईल की काय या भीतीने बहुदा ते टाळण्यात आले. प्रत्यक्षात विमानसेवा सुरू व्हायला अजून दोन महिने बाकी आहेत. पण भाजप युतीचे राजकीय विमान उडवायला अदानीशेटच्या कृपेने आणि खर्चाने एक मौका मिळाला. या विमानतळामुळे मुंबईसोबतच नवी मुंबई, पनवेल, रायगडवासियांना थोडाफार फायदा होईल. मात्र या प्रकल्पाचा हा पहिलाच टप्पा आहे. पूर्ण विमानतळ पूर्ण होण्यास अजून दोन वर्षे लागणार आहेत. गंमत अशी की, मोदींनी कालच्या कार्यक्रमात आपल्या नेहमीच्या सवयीनुसार काँग्रेसने या विमानतळाला उशीर केल्याच्या दुगाण्या झाडल्या. पण ते स्वत: अकरा वर्षे सत्तेत असूनही हा विमानतळ उभारायला इतकी वर्षे का लागली आणि तो अपूर्ण का आहे याचे उत्तर त्यांनी दिले नाही. असो. तूर्तास या विमानतळावर दोनच धावपट्ट्या आहेत. इथे ४२ विमाने थांबू शकतील व दोन कोटी प्रवासी वाहतूक होईल. दुसरा टप्पा पूर्ण झाल्यावर हीच वाहतूक साडेसहा कोटी होईल. याचा अर्थ आता केवळ एकतृतियांश काम झालेले असतानाच मोदींच्या सोईसाठी व भाजपच्या राजकारणासाठी याचे उद्घाटन उरकण्यात आले आहे. मुंबईच्या मुख्य शहरात असलेला विमानतळ अर्थातच अपुरा पडू लागला होता. शिवाय खूप पूर्वी तो मध्यवस्तीच्या बाहेर म्हणून उभारण्यात आला असला तरी आता अगदी ऐन शहराच्या केंद्रस्थानी आला आहे. त्यामुळे एकूणच वाहतुकीवर ताण येणे व इतर समस्या येत होत्या. सर्वात मोठी अडचण जागेची व त्याच्या विस्तारावर असलेल्या मर्यादांची. त्यामुळे विमानांची संख्या वाढवता येत नव्हती. नवी मुंबई विमानतळामुळे हा प्रश्न काही अंशी सुटेल.

### पोचणार कसे?

अर्थात, या विमानतळापर्यंत पोचणे हे कोणासाठीही फारसे सोईचे नसेल. मुंबईतील सध्याच्या विमानतळापर्यंत अगदी लोकलने प्रवास करूनही जाता येते. नवी मुंबई विमानतळापर्यंत पोचण्यासाठी मात्र अशी कोणतीही सुविधा सध्या उपलब्ध नाही. म्हणजेच खासगी वा भाड्याची गाडी करूनच तेथे जावे लागेल. याचाच अर्थ सामान्य नागरिकासाठी हा प्रचंड खर्च असेल. शिवाय मुंबईच्या विविध भागातून येण्यासाठी इथे दोन ते अडीच तास लागतील. म्हणजे आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी व्हिसा, पासपोर्ट तसेच सामानाच्या तपासणीसाठी बराच वेळ लागतो. त्यामुळे विमानतळावर किमान तीस तास अगोदर यावे अशी सूचना केली जाते. याचाच अर्थ परदेशासाठीचे विमान पकडायचे असेल तर घर वा कार्यालयातून किमान सहा ते सात तास आधी निघावे लागेल. अमेरिकेचा प्रवास किमान १५-१८ तासांचा असतो. म्हणजेच बोरीवलीहून न्यूयॉर्कला जाण्याच्या प्रवासाला एकूण २४ तास लागू शकतात. देशांतर्गत प्रवासात याच्या बरोबर विरुध्द अडचण आहे. मुंबई ते हैदराबाद हा विमान प्रवास एक तासांचा आहे. मात्र विमानतळापर्यंत पोचण्यासाठी अडीच तास, विमानतळावरचे दोन तास असे चार-पाच तास नुसते यातच खर्च होतील. हा नवा विमानतळ मेट्रोने व इतर साधनांनी जोडण्याच्या घोषणा जरूर झाल्या आहेत. पण त्या प्रत्यक्षात येण्यासाठी किती कालावधी लागेल कोणीही सांगू शकत नाही. वास्तविक या सुविधा आधीच किंवा किमान विमानतळाच्या जोडीनेच सुरू होणे अपेक्षित होते. त्या का झालेल्या नाहीत याचा जबाब मोदी, फडणवीस, अदानी यांनी द्यायला हवा. मोदी यांनी आपल्या भाषणात प्रगतीच्या बऱ्याच भराऱ्या मारल्या. गेलया दहा वर्षात देशातील विमानतळांची संख्या ७४ वरून १६० वर गेली असे ते म्हणाले. या विमानतळांपैकी किती चालू स्थितीत आहेत व किती ठिकाणांहून नियमित उड्डाणे होतात हे त्यांनी सांगायला हवे. महाराष्ट्रात नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी अशा ठिकाणीही विमानतळ आहेत. पण इथे एकही विमानसेवा धडपणे चाललेली नाही. अदानीला कंत्राटे द्यायची आहेत, सरकार पैसे उधळते आहे, म्हणून आणखीही दोनशे विमानतळ उभे राहतील. पण विमानांनी प्रवास करणार कोण हाही महत्वाचा प्रश्न आहे.

### 'दिबां'चे नाव का नाही?

विमानांचा प्रवास परवडण्यासाठी त्या भागात तितके उत्पन्न देणारे व्यवसाय, उद्योग व नोकऱ्या असाव्या लागतात. कोल्हापूरसारख्या संपन्न शहरातूनही दर दिवशी तितके प्रवासी विमानांना मिळू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. विमानतळ व विमान प्रवासाची गरज आहेच. मालवाहतुकीसाठीही विमानांची गरज आहे. जेएनपीटी बंदराच्या शेजारी व मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेच्या लगत नवीन विमानतळ उभा राहिल्याने त्याचा मालवाहतुकीला नक्कीच फायदा होईल. पण याच रीतीने सामान्य माणसाच्या वाहतुकीची साधने मजबूत करणे हेही गरजेचे आहे. मोदी किंवा फडणवीस सरकार त्याला प्राधान्य देताना दिसत नाही. मुंबईतल्या मेट्रो सेवेचे काल उद्घाटन झाले. पण गरीब, कष्टकरीच नव्हे तर संपन्न व्यापारीवर्ग देखील ज्याने प्रवास करतो त्या लोकल सेवेकडे या सरकारने दुर्लक्ष केले आहे. एसी लोकलची संख्या वाढवली जात आहे. पण त्याचे भाडे रोज प्रवास करणाऱ्याला परवडत नाही. याचमुळे मुंबईतल्या मेट्रो रेल्वेत तुरळक गर्दी असते व ती तोट्यात चालते. मोनो रेल्वे तर जवळपास बंदच करावी लागली. बेस्ट, लोकल, एसटी हे सामान्य माणसासाठीचे पर्याय बाद करून टाकायचे आणि एसी गाड्या आणि विमाने तुमच्यासाठी आणली आहेत म्हणून सांगायचे हे या सरकारचे धोरण आहे. विमानाच्या सोयी जरूर करा, पण सामान्यांच्या एसटीला मारून नव्हे. तिथे एसटी ड्रायव्हरचा पगार १० नि १५ हजार आणि प्रवाशांसाठी भाडे भरमसाठ. गाड्या सतत बंद पडणाऱ्या. आगगाड्यांमध्ये वंदे भारतवर कोट्यवधींचा खर्च, पण सामान्यांसाठीच्या जनरल डब्यांमध्ये कपात असे चालणार नाही. दरम्यान नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी कित्येक दिवसांपासून चालू आहे. विमानतळासाठीच्या दहा परवानग्या मोदींमुळे कशा एका दिवसात मिळाल्या याचे कौतुक काल फडणवीसांनी आपल्या भाषणात सांगितले. त्याच मोदी व फडणवीसांना दिबांच्या नावाचा प्रस्ताव काही संमत करणे जमलेले नाही. स्थानिक भूमिपुत्रांच्या जमिनी आम्ही वाटेल तेव्हा वाटेल तशा काढून घेणार, पण त्यांच्या नेत्याचे नाव मात्र नको असा हा व्यवहार आहे. जनता यांना धडा शिकवल्याखेरीज राहणार नाही.

विचार

# आता प्रतिभेला भारतातच उत्तम संधी

***अमेरिकेने लादलेले निर्बंध आणि नोकरीसाठी आकारलेले भरमसाठ व्हिसा शुल्क या ट्रम्प सरकारने भारतावर लादलेल्या संकटाकडे बघून हताश होणार की आव्हान म्हणून संकटाला सामोरे जाणार हाच खरा प्रश्न आहे. आता कुशल तंत्रज्ञ आणि बुध्दीवंताना भारतातच नोकरी शोधावी लागेल किंवा स्टार्ट अप क्षेत्रामध्ये उतरावे लागेल. अमेरिकन कंपन्यांनी भारतातूनच आयटी सेवा घ्यायचे ठरवल्यास आयटी क्षेत्रात भारताची प्रगती होऊ शकते.***




डॉ. सुकृत खांडेकर

स्वत:ला सिध्द करण्यासाठी एखाद्या माणसाकडे रास्त गुणवत्ता किंवा तात्विक आधार नसेल तर तो 'शॉर्ट कट'चा अवलंब करतो. रास्त काय आणि चुकीचे काय, याचा सारासार विचार न करता विचित्र कृती करायला लागतो. भारतीय औषध उद्योग, भारतीय चित्रपट यावर आयात शुल्क लादल्या किंवा वाढवल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणखी काय करणार, याची खात्री कोणालाही नाही. एव्हाना ते हात धुवून भारताच्या मागे लागले आहेत. भारत-पाकिस्तान युध्द आपण थांबवले, असा खोटा दावा करण्यापासून भारतावर ५० टक्के आयात कर लादण्यापर्यंत त्यांनी भारतविरोधी निती राबवायला सुरूवात केली. 'अमेरिका फर्स्ट' हे त्याचे धोरण आहे. पण ते राबवताना भारताला अनेक परिणाम भोगावे लागत आहेत. ट्रम्प यांनी एका आदेशावर स्वाक्षरी करून अमेरिकेत नोकरीसाठी येणाऱ्या कुशल आणि तज्ञ भारतीयांना जबरदस्त झटका दिला. नव्या आदेशानुसार एच वन बी व्हिसाचे पूर्वी सहा लाख रूपये असलेले शुल्क आता एक लाख़ डॉलर्स म्हणजेच ८८ लाख रूपये झाले आहे. हा आदेश अमेरिकेत जाऊन नोकरी करू इच्छिणाऱ्या तरूणांवर मोठा आघात ठरला. भारतातील डॉक्टर्स, वैज्ञानिक, तंत्रज्ञ, आयटी क्षेत्रातील इंजिनिअर्स आणि तज्ञ वर्षानुवर्षे मोठ्या संख्येने एचवनबी व्हिसा मिळवून नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेत जात आहेत. ट्रम्प सरकारचा नवा आदेश म्हणजे त्यांच्या भविष्यावर अमेरिकेने चालवलेली कुऱ्हाड आहे. या सर्व हजारो बुध्दीमान भारतीय तरूणांच्या अमेरिकेत जाऊन करिअर करण्याच्या स्वप्नावर ट्रम्प सरकारने पाणी ओतले. या निमित्ताने अमेरिकेच्या या नीतीची आणि परिणामांची जोरदार चर्चा सुरु झाली.

अमेरिका दर वर्षी जेवढे एचवनबी व्हिसा मंजूर करते, त्याचा सर्वाधिक म्हणजेच ७० ते ७३ टक्के लाभ भारतीय नागरिकांना मिळत आला आहे. २०२४ मध्ये एक लाखापेक्षा जास्त भारतीय नागरिकांना अमेरिकेने एच वन बी व्हिसा मंजूर केला होता. २०२४ मध्ये ही संख्या घटली आणि ७१,२१९ भारतीयांना एच वन बी व्हिसाचा लाभ मिळाला. २०२५ मध्ये आजवर ६४ हजार भारतीयांना एचवनबी व्हिसा मंजूर झाला आहे. गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये नोकरीसाठी अमेरिकेत येणाऱ्या भारतीयांना व्हिसा देण्याचे प्रमाण अगोदरच घटले आहे. आता या व्हिसाचे शुल्क भरमसाठ वाढवल्यामुळे नोकरीसाठी अमेरिकेत जाणाऱ्या भारतीयांचा ओघ निश्चितच थांबेल किंवा खूपच कमी होईल.

व्हिसा शुल्कात सहा लाखावरून थेट ८८ लाख अशी भरमसाठ वाढ केल्याने भारतीय तरूणांचे व्हिसा शुल्क भरणाऱ्या अमेरिकन कंपन्याही हबकल्या आहेत. यापुढे ते एवढे मोठे शुल्क ते भरण्याची तयारी दाखवतील का, हा कळीचा मुद्दा आहे. भारतीय कुशल तज्ञांची, तंत्रज्ञांची आणि इंजिनिअर्सची संख्या घटली तर अमेरिकन कंपन्यांच्या कारभारावरही परिणाम होईल आणि या व्हिसा शुल्कवाढीचा अर्थव्यवस्थेवरही परिणाम होईल. कमी वेतनात कुशल तंत्रज्ञ म्हणून भारतीय नागरिक उपलब्ध होतात म्हणून अमेरिकेत भारतीय तरूणांना मोठी संधी मिळत होती. गेली काही दशके भारतीय नागरिकांनी सिलिकॉन व्हॅलीमधे मोठे स्थान निर्माण केले. आता भरमसाठ व्हिसा शुल्कामुळे हे तरूण देशात राहूनच विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय, आयटी क्षेत्रात सेवा करणार की ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि युरोपकडे धावणार, असा प्रश्न चर्चिला जात आहे.

अमेरिकेने लादलेले निर्बंध आणि नोकरीसाठी आकारलेले भरमसाठ व्हिसा शुल्क हे ट्रम्प सरकारने भारतावर लादलेले संकट आहे. या संकटाकडे बघून हताश होणार की आव्हान म्हणून संकटाला सामोरे जाणार हाच खरा प्रश्न आहे. कुशल तंत्रज्ञ आणि बुध्दीवंताना भारतातच नोकरी शोधावी लागेल किंवा स्टार्ट अप किंवा मेक इन इंडियामध्ये उतरावे लागेल. भारतीय सॉफ्टवेअर सेवेची निर्यात सध्या १५८ अब्ज अमेरिकन डॉलर्स आहे. येत्या पाच वर्षांमध्ये ती २०० अब्ज डॉलर्सच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. अमेरिकेत बोलावून नोकऱ्या देण्याऐवजी भारतातूनच आयटी सेवा घेणे अमेरिकन कंपन्यांनी ठरवल्यास आयटी आणि सॉफ्टवेअर सेवा क्षेत्रात भारताची मोठी प्रगती होऊ शकते. अमेरिकेतील कंपन्यांना भारतात राहून सेवा देणाऱ्या इंजिनिअर्स आणि तंत्रज्ञांची कमी खर्चात चांगली सेवा मिळू शकेल आणि भारताचीही वेगाने भरभराट होऊ शकेल. पूर्वी नोकरीसाठी भारतीय तरूण अमेरिकेत गर्दी करत होते, पण व्हिसाच्या भरमसाठ शुल्कामुळे ते भारतात राहुनच स्टार्ट अप सेवा सुरू करू शकतील. भारतात रोजगार वाढेल आणि भारतात राहून जागतिक स्तरावर सेवा देऊन भारतातील तरूणांना चांगले उत्पन्न मिळू शकेल. जागतिक सेवा देण्यासाठी उत्तम प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांनाही देशात चांगली संधी मिळू शकेल.

भारतातून जागतिक स्तरावर आयटी आणि सॉफ्टवेअर सेवा देण्यासाठी उत्तम वातावरण असले पाहिजे. स्वच्छ आणि निरोगी परिसर पाहिजे. उत्तम वेतन आणि दर्जेदार सेवा देता आली तरच भारतीय तरूणांना स्पर्धेत टिकून राहता येईल. सरकारी कामातील लाल फितीचा कारभार आणि सर्व स्तरावर बोकाळलेला भ्रष्टाचार आणि काम चुकारपणा असेल तर जागतिक स्पर्धेत आपण कसे टिकाव धरू शकाणार? काम न करता वेतन किंवा मोबदला मिळाला पाहिजे आणि जास्तीत जास्त सेवा फुकट मिळाल्या पाहिजेत, ही मानसिकता दूर होणे सर्वात महत्वाचे आहे. राजकीय नेत्यांच्या मागे चकरा मारणे आणि सरकारी नोकरशहांची मनधरणी करणे या गोष्टी कायमच्या बंद होणे गरजेचे आहे. विदेशात जशी सुसज्ज व अद्ययावत असतात, तशी कार्यालये देशात राज्याराज्यांमध्ये उपलब्ध झाली पाहिजेत. महत्वाच्या मोठ्या शहरांमध्ये सुसज्ज ग्रोथ सेंटर्स उभारली पाहिजेत. वीज आणि पाणी पुरवठा अखंड पाहिजे, इंटरनेट सेवा उत्तम असली पाहिजे. संशोधनासाठी सुविधा आणि कॉर्पोरेट वातावरण स्पर्धेसाठी गरजेचे आहे. करआकारणी आणि कंपन्यांसाठी असलेले कायदे आणि नियम गुंतागुंतीचे नसावेत याची सरकारने काळजी घेतली पाहिजे. अन्य कोणत्याही देशांपेक्षा भारतात टॅलेंट मुबलक आहे, भारतीय नागरिक प्रामाणिकपणे आणि चांगली गुणवत्ता देणारे काम करतात हे जगाला ठाऊक आहे. भारतीय कंपन्यांकडे विदेशातून अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित होईल असे वातावरण निर्माण झाले तर भारत जागतिक पातळीवर आयटी आणि सॉफ्टवेअर सेवा देण्यात अग्रेसर राहिल हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा स्वदेशीचा पुरस्कार करायला सुरूवात केली आहे. मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, कौशल्य विकास योजनांना आता गती देणे गरजेचे आहे. नोकरशहा आणि सरकारी फायलींच्या विळख्यात या योजना अडकून राहणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. उद्योग, तंत्रज्ञान आणि आयटी सारखी मंत्रालये त्याची माहिती तसेच ज्ञान व कामाची आवड असलेल्या मंत्री व सचिवांकडेच दिली पाहिजेत. संशोधन, विकास आणि उद्यमशीलता यांना प्रोत्साहन दिले तर आपला देश आंतरराष्ट्रीय पातळीवर टॅलेंट हब म्हणून ओळखला जाईल. अमेरिकेत जाऊन 'अब की बार ट्रम्प सरकार' अशा घोषणा देऊनही भारताच्या काय पदरी पडले हे सर्व जगाने बघितले आहे.

आता हळहळ करण्याऐवजी ट्रम्प सरकारने लादलेल्या संकटातून सोने कसे निर्माण करता येईल यावर सरकार आणि खाजगी क्षेत्राने लक्ष्य केंद्रीत करायला हवे. भारतीय युवकांमधील नैराश्य दूर करण्यासाठी कालबध्द योजनापूर्वक प्रयत्न करायला हवेत. अन्यथा, हा बुध्दिजीवी तरूण आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी अमेरिकेला पर्याय म्हणून युरोप, युके, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि आखाती देशांकडे मोठ्या संख्येने जाईल आणि भारत ताज्या संकटातून संधीकडे मार्गक्रमणा करण्यावाचून वंचित राहील.

चर्चा आजची


# तंबाखूजन्य पदार्थांच्या विळख्यात शाळा

वैभव पाटील

शाळा, महाविद्यालयांच्या शंभर मीटर परिसरात तंबाखू, गुटखा, पानमसाला, मावा, सिगारेट, सुगंधित सुपारी विक्रीवर बंदी आहे. तरीदेखील शाळांच्या गेटवर, शाळांजवळच पानटपऱ्यांचा व्यवसाय तेजीत सुरू आहे. शाळा परिसर तंबाखूमुक्त करण्यासाठी राज्य सरकार ङ्गतंबाखूमुक्त शाळा अभियानफ्राबवत आहे. दुसरीकडे शिक्षण विभाग आणि पोलीस यंत्रणेच्या अनास्थेमुळे वर्षभरात ६७८ पैकी केवळ ९४ शाळाच ङ्गतंबाखूमुक्तफ झाल्याची माहिती समोर आली आहे. लहान वयातील तंबाखू, सिगारेटचे व्यसन विद्यार्थ्यांसाठी जीवघेणे ठरत असताना चहाच्या टपरीवरच सर्रास तंबाखूजन्य पदार्थ मिळत आहेत, तर शिक्षण विभाग मात्र कागदी घोडे नाचविण्यात मग्न असल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील काही शाळांच्या परिसराचा फेरफटका मारला असता १०० यार्ड आतील परिसरात सर्रास तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्याचे दिसून आले. एवढेच नव्हे, तर व्यसनमुक्तीविषयक जनजागृती, तसेच प्रतिबंधात्मक फलकही तेथे दिसले नाहीत. शालेय परिसरात तंबाखू, गुटख्याच्या पुड्या आढळून येतात. शाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ तंबाखूमुक्त शाळा असा फलक लावलेले नाही. त्यामुळे यांच्यावर कारवाई कोण करणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

परिणामी नवीन पिढी व्यसनांच्या विळख्यात अडकत आहे. शाळा सुटल्यावर गुटख्याचे पाऊच तोंडात रिकामे करत, सिगारेटच्या धुरात हरवून जाणारे अनेक कर्मतारी ठिकाणी बघायला मिळत आहेत. भावी पिढी घडवण्यासाठी शाळा आणि महाविद्यालये जरी अथक प्रयत्न करत असले तरी प्रशासनच भावी पिढीबाबत सजग नसल्याचे दिसून येते.

तंबाखूच्या सेवनाचे दुष्परिणाम शालेय स्तरापासून विद्यार्थ्यांना मिळावे, यासाठी शाळांमध्ये तंबाखूमुक्त शाळा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. मोठा गाजावाजा करीत तंबाखू मुक्त शाळा म्हणून फलक लावले जातात. परंतु हा सर्व खर्च पाण्यात जात असल्याचे चित्र आहे. तंबाखू मुक्त शाळेतील काही कर्मचारी गुटखा व अन्य तंबाखूजन्य पदार्थ खातात. तसेच शाळेच्या शंभर मीटर परिसरात किराणा, पान टपरी दुकानात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ खुले आमपणे विकले जातात. याकडे मात्र शाळेतील समितीचे दुर्लक्ष असल्याचे बोलले जात आहे. संबंधितांविरोधात कोणतीही कारवाई केली जात नाही. ही मोठी चिंतेची बाब आहे. तंबाखूच्या सेवनाने कर्करोगासह अनेक आजार उद्भवण्याची शक्यता आहे. गुटखा व अन्य तंबाखूजन्य पदार्थांच्या आहारी तरुणाची जात आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यातील तंबाखू व गोवा गुटखा, विमल सारखे तंबाखूजन्य पदार्थ विक्रीला बंदी घालण्यात आली आहे. मात्र आजही जिल्ह्यातील काही भागांमध्ये ३५ ते ४० रुपयांनी विमल, गुटखा या तंबाखूजन्य पदार्थांची विक्री छुप्या पध्दतीने केली जात आहे. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या आहारी तरुणाई जाण्याची भिती निर्माण झाली आहे. काही शाळा, महाविद्यालयातील मुले फॅशन म्हणून तंबाखूजन्य पदार्थ खाण्यावर भर देतात. त्यामुळे हे संकट दूर करण्यासाठी जिल्ह्यात तंबाखू नियंत्रण कार्यक्रम ही स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात आली आहे. शाळा महाविद्यालयात जाऊन या यंत्रणेच्या मदतीने जनजागृती केली जाते. सरकारी कार्यालांमध्येदेखील याबाबत प्रचार व प्रसार करून तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ खाऊ नका असे आवाहन केले जाते. जिल्ह्यात आतापर्यंत ४०१ शाळा तंबाखू मुक्त झाल्या आहेत. ७६ शाळा तंबाखू मुक्त शाळेच्या प्रगती पथावर आहे. तंबाखू मुक्त शाळांच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस बंदी असून शाळांमधील कर्मचाऱ्यांनी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन न करणे अशा सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच शाळेच्या आवारात तंबाखूमुक्त शाळेचा फलक लावण्यात आला आहे. मोठा जागावाजा करीत तंबाखूमुक्त शाळेचा दिवाखावा केला जात असल्याचे चित्र काही शाळांमध्ये समोर आले आहे. तंबाखूमुक्त शाळेची नोंद फक्त कागदावर असते. नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे कारभार चालला जातो. त्यानंतर जैसे थे अशी अवस्था पहावयास मिळत आहे. तंबाखू मुक्त शाळेचा उपक्रम कौतूकास्पद आहे. मात्र त्यामध्ये सातत्य राखण्यास काही शाळा उदासीन ठरत आहे. भारतात दरवर्षी ५५०० विद्यार्थी तंबाखू सेवनाला सुरुवात करतात. तंबाखू उत्पादक कंपन्यांतर्फे विद्यार्थ्यांना लक्ष्य केले जाते. भारतात आठ वर्षे वयापासून मुलांमध्ये तंबाखू सेवनाची सुरुवात होते. विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थांच्या आहारी जाण्यापासून वाचवणे ही समाज, पालक, शिक्षक आणि शासन यांची एकत्रित जबाबदारी आहे.



लोकसंसद

# पादचाऱ्यांची सुरक्षा ही सर्वात महत्वाची



देशभरातील वाढते रस्ते अपघात आणि त्यात होणारे निष्पाप नागरिकांचे मृत्यू याची गंभीर दखल घेवून पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी, पदपथांसाठी मोटार वाहन कायद्यांतर्गत सहा महिन्यांच्या आत रस्ता सुरक्षा नियम तयार करण्याचे निर्देश एका जनहित याचिकेच्या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना नुकतेच दिले. एका सरकारी अहवालानुसार, २०२३ मध्ये देशभरात रस्ते अपघातात १ लाख ७२ हजार ८९० लोक मृत्यू पावले. त्यामध्ये ३५ हजार पादचारी नाहक मृत्युमुखी पडले. हेल्मेट न वापरल्याने ५४ हजार दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला. देशातील एकूण रस्ते अपघातांपैकी १६.६ टक्के अपघात आणि १०.१ टक्के मृत्यू हे देशातील ५० प्रमुख शहरांमध्ये झाले. या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने पुढील एका वर्षात देशातील ५० प्रमुख शहरांतील अपघातप्रवण व जास्त रहदारीच्या किमान २० टक्के रस्त्यांवर पादचाऱ्यांसाठी सुविधा उभारण्याचे निर्देश दिले आहेत. त्याचबरोबर दुचाकीस्वार आणि मागे बसणाऱ्यांनर हेल्मेटची सक्ती करणे, उलट दिशेने वाहन चालवणाऱ्यांवर व लेन तोडणाऱ्यांवर कारवाई करणे, बेकायदेशीर सायरनविरुद्ध वाहन जप्तीची कारवाई करणे इत्यादी निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. पादचाऱ्यांची सुरक्षा ही सर्वात महत्वाची असून पादचाऱ्यांना सुरक्षित पदपथ बांधून देणे हे सरकारचे कर्तव्य असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# टपाल सेवांचा प्रवास; जुने दिवस व डिजिटल युगातील क्रांती

मानसिक आरोग्याच्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि मानसिक आरोग्याच्या समर्थनार्थ प्रयत्नांना चालना देण्यासाठी दरवर्षी १० ऑक्टोबर रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा केला जातो. जागतिक मानसिक आरोग्य फेडरेशनद्वारे १९९२ मध्ये पहिल्यांदा हा दिवस साजरा करण्यात आला, जो जगभरात मानसिक आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी समर्पित एक जागतिक संस्था आहे. गेल्या काही वर्षांत, या दिवसाचे महत्त्व वाढले आहे, मानसिक आरोग्याच्या सम स्यांभोवतीचा कलंक दूर करण्यासाठी अधिकाधिक देश आणि संघटना मोहिमांमध्ये सहभागी होत आहेत.

जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे महत्त्व मानसिक आरोग्याला जागतिक प्राधान्य देण्याच्या त्याच्या ध्येयात आहे. हा दिवस मानसिक आरोग्याबद्दल खुल्या संभाषणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी पुढाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करतो. दरवर्षी, मानसिक आरोग्याच्या स्थितीबद्दल जागरूकता वाढवण्यापासून ते मानसिक आरोग्यसेवेच्या उपलब्धतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी मानसिक आरोग्याच्या विशिष्ट पैलूचे प्रतिबिंबित करण्यासाठी एक थीम निवडली जाते. कलंक कमी करण्यात आणि गरज पडल्यास लोकांना मदत घेण्यास प्रोत्साहित करण्यात हा दिवस महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. मानसिक आरोग्य हे आपल्या एकूण आरोग्याचा एक महत्त्वाचा भाग आहे, जे आपण कसे विचार करतो, अनुभवतो आणि दैनंदिन जीवन कसे हाताळतो यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. दुर्दैवाने, काम, नातेसंबंध किंवा जीवनशैलीतील बदलांमुळे तसेच अचानक येणाऱ्या संकटांमुळे किंवा आपत्तींमुळे उद्भवणाऱ्या दैनंदिन आव्हानांमुळे त्यावर परिणाम होऊ शकतो. आपत्कालीन परिस्थितीत, मानसिक आरोग्य आणखी महत्त्वाचे बनते कारण ताण, भीती आणि अनिश्चितता सामना करण्याच्या क्षमतेवर परिणाम करू शकते, ज्यामुळे निर्णय घेणे, स्वत:ची काळजी घेणे किंवा इतरांना आधार देणे कठीण होते. मानसिक आरोग्याभोवती असलेल्या व्यापक जागरूकतेचा अभाव आणि कलंक लक्षात घेता, मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी, कलंक कमी करण्यासाठी आणि सर्वांना आठवण करून देण्यासाठी जागतिक मानसिक आरोग्य दिनाची स्थापना करण्यात आली.


मानसिक तणाव, चिंता आणि डिप्रेशनमुळे जगभरातील लोकांमध्ये सोशल स्टिग्मा, डिमेंशिया, हिस्टिरिया, एग्जाइटी, आत्महीनता यांसारख्या अनेक प्रकारच्या समस्या आणि मानसिक आजाराला सामोरे जात होते. या समस्येकडे लोकांचे लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये जागरुकता पसरवण्याच्या उद्देशाने जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा केला जातो. ज्यामुळे लोक मानसिक समस्या आणि आजारांप्रती जागरुक होतील आणि त्यावर वेळीच उपचार घेतील. एखाद्या व्यक्तीच्या मानसिक आरोग्याची स्थिती दैनंदिन जीवनातील अनुभवांशी आणि आव्हानांशी जवळून जोडलेली असते. अनेक घटक मानसिक आरोग्यावर सकारात्मक किंवा नकारात्मक प्रकारे प्रभाव टाकू शकतात ज्यामध्ये हे समाविष्ट आहे. पैशांबद्दलच्या चिंता मनावर खूप जास्त असू शकतात. कर्जे सांभाळण्यासाठी, घर सुरक्षित करण्यासाठी किंवा कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी संघर्ष केल्याने अनेकदा सतत चिंता आणि ताण निर्माण होतो. असे दबाव नेहमीच दिसून येत नाहीत परंतु भावनिक आरोग्यावर लक्षणीय परिणाम करू शकतात. मानसिक आरोग्यामध्ये राहणीमानाची देखील भूमिका असते. असुरक्षित परिसर, हिंसाचाराचा संपर्क किंवा समुदायाच्या समर्थनाचा अभाव असलेले वातावरण यामुळे भीती किंवा असुरक्षिततेच्या भावना वाढू शकतात. डिजिटल वातावरणाचा देखील परिणाम होतो, कारण सोशल मीडियाच्या सतत संपर्कात राहिल्याने तुलना, आत्म-शंका किंवा एकटेपणा येऊ शकतो.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१० ऑक्टोबर**

१) श्री.सुधाकर विश्वनाथ रानवडे चेंढरे-अलिबाग, १०-१०-१९३६
२)श्रीम.शैलजा प्रभाकर शिंदे कुरूळ-अलिबाग, १०-१०-१९४५
३)श्रीम. जयश्री किसन वेळे अलिबाग, १०-१०-१९५०
४)श्री.नरेंद्र विठ्ठल पाडावे. चेंढरे, अलिबाग १०-१०-१९४५

## सुवर्णकण



मन आणि बुद्धी देवावरील असीम प्रेमाने भरून गेली पाहिजेत. केवळ मन नव्हे तर बुद्धीसकट मन भगवंताकडे लागले पाहिजे आज विज्ञानाच्या प्रचंड झेपेमुळे देवा विषयी विचार करायला माणसाला वेळच नाही.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

# उड्डाणपुलाचे काम रखडले

## • दिवा रेल्वे फाटकामधून जीवघेणा प्रवास सुरु

| ठाणे | प्रतिनिधी |

**मध्य रेल्वे मार्गावरील दिवेकरांच्या मृत्यूचा सापळा ठरलेला आणि रेल्वे वाहतुकीस अडथळा ठरणारा सर्वात महत्त्वाचा दिवा रेल्वे फाटक मागील अनेक वर्षांपासून जागेच्या वादामुळे बंद झालेला नाही. फाटकावरील दिवा रेल्वे उड्डाणपूलाच्या बांधकामासाठी भूमी अधिग्रहणातील मार्ग निघत नसल्याने पूलाचे काम रखडले आहे. त्यामुळे आजही फाटकामधून जीवघेणा प्रवास सुरु आहे. २०१९ मध्ये रेल्वे पूल तयार करण्याच्या कामास सुरुवात झाली होती. आता २०२६ उजाडत असतानाही हा प्रकल्प पूर्ण झालेला नसल्याने दिवेकर चिंतेत आहेत.**



मध्य रेल्वे मार्गावर अनेक रेल्वे फाटक आहे. त्यापैकी दिवा रेल्वे फाटक हे सर्वात मोठ्या फाटकांपैकी एक आहे. या फाटकातून शेकडो वाहने पूर्वेकडून पश्चिमेकडे किंवा पश्चिमेकडून पूर्वेकडे जातात. तसेच रेल्वे प्रवासीदेखील अनेकदा रेल्वे स्थानकात प्रवेश करण्यासाठी फाटकातूनच प्रवेश करण्याचा प्रयत्न करतात. पूर्वी रेल्वे रुळ ओलांडताना फाटकामध्ये अनेक प्रवाशांनी जीव गमावला होता. सध्या येथे पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलाचे अधिकारी, कर्मचारी असल्याने हे प्रमाण घटले आहे.

२०१३ मध्ये ठाणे महापालिका आणि रेल्वेने दिवा रेल्वे फाटक बंद करुन तेथे उड्डाणपूल बांधण्याचा निर्णय घेतला होता. २०१९ मध्ये या पूलाच्या प्रत्यक्ष बांधणीला सुरुवात झाली. रेल्वेकडून रेल्वेच्या हद्दीतील तर महापालिकेकडून स्थानक परिसरातील मार्गिका निर्माण केली जात आहे. परंतु, भूमी अधिग्रहण होत नसल्याने मागील अनेक वर्ष हा प्रकल्प रखडला आहे. ११ ते १२ जमीन मालकांचा वाद प्रलंबित असून त्यांच्यासोबत लवकरच बैठक घेणार असल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

दिवा स्थानकाच्या पूर्वेकडील काम सुरु आहे. परंतु, पश्चिमेकडील काम भूमी अधिग्रहणामुळे थांबले आहे. भूमी अधिग्रहनाचा प्रश्न अंतिम टप्प्यात आला आहे.

लवकरच संबंधित जमीन मालकांसोबत बैठक घेतली जाणार आहे. भूमी अधिग्रहण झाल्यास वर्षभरात काम पूर्ण करणे शक्य असल्याचे महापालिकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

### रेल्वे वाहतुकीवरही होतोय परिणाम

दिवा रेल्वे फाटकातील रेल्वेच्या हद्दीतील पूल सुमारे दीड वर्षांपूर्वीच बांधून झाला आहे. महापालिकेकडून सुरु असलेल्या कामाविषयी आम्ही त्यांच्यासोबत पत्रव्यवहार करत आहोत. रेल्वे उड्डाण पूलाचे काम रखडल्याने रेल्वे वाहतुकीवरही त्याचा परिणाम होत असतो, असे मध्य रेल्वेकडून स्पष्ट करण्यात आले.

# भातशेतीवर करपा रोगाचे संकट

## • कृषी विभागाचे दुर्लक्ष • शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

राजापूर तालुक्यातील दळे परिसरातील भातशेतीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे भातशेती धोक्यात आली असून, शेतकरी चिंतेत पडला आहे. करपा रोगाच्या प्रादुर्भावामुळे नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करण्याची वारंवार मागणी करूनही त्याकडे कृषी विभागाकडून साफ दुर्लक्ष करण्यात आले आहे. भातशेतीच्या नुकसानीचा तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी दळे येथील शेतकरी स्वप्नील सोगम यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी आमदार किरण सामंत यांना दिले आहे.

भातलावणीच्यावेळी पावसाने दडी मारली असली तरी उपलब्ध पाण्याचा सदुपयोग करत शेतकऱ्यांनी वेळेमध्ये भातशेतीच्या लावणीची कामे उरकली. त्यानंतर पावसाने सातत्य ठेवल्यामुळे भातशेती समाधानकारक झाल्याचे चित्र आहे. मात्र, आता कापणीवेळी पावसाने पुन्हा एकदा धुमाकूळ घातला आहे. गेल्या काही दिवसांपासून सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे कापणीत व्यत्यय येत आहे. पावसाबरोबरच आता करपा रोगाच्या प्रादुर्भावामुळे होणाऱ्या नुकसानीमध्ये भर पडली आहे. तालुक्यातील दळे परिसरातील गावांमध्ये भातशेतीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे यावर्षी समाधानकारक झालेली भातशेती संकटात सापडली आहे. त्याचा पंचनामा करण्याची मागणी सातत्याने कृषी विभागाशी संपर्क साधून करण्यात आली; मात्र, त्याकडे कृषी विभागाने दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

> **आधीच पावसाची अवकृपा आणि त्यामध्ये आता करपा रोगाच्या प्रादुर्भावामुळे भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भातशेतीच्या झालेल्या नुकसानीची पाहणी अन् पंचनामे करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे; मात्र, कृषी विभागाकडून त्याकडे साफ दुर्लक्ष होत असून पाहणीसाठी कोणीही नुकसानग्रस्त शेताकडे फिरकलेले नाही.**
> **– संजय लासे, शेतकरी, दळे**

## श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन

**आगरदांडा :** मुरूड जंजिरा नगरपरिषदेच्या कर्मचारी संघटनातर्फे सालाबादप्रमाणे शनिवार दि. ११ ऑक्टोबर रोजी शहरातील नगरपरिषद कार्यालयात श्री सत्यनारायणाची महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे. या पुजेचा मान मुरूड नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर यांना देण्यात आला आहे. तरी शहरासंह पंचक्रोशीतील भागातील सर्व नागरिकांनी सायंकाळी ४ ते ८ वाजेपर्यंत या तिर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संघटनेने अध्यक्ष प्रकाश आरेकर यांनी केले.

## उन्हाच्या झळांमुळे नागरिक त्रस्त

**पनवेल :** ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाने जोर धरला असून पनवेलकर हैराण झाले आहेत. दुपारच्या वेळी उन्हाच्या झळांमुळे नागरिक त्रस्त दिसत आहेत. तरुणींनी उन्हापासून बचावासाठी स्कार्फ, छत्र्यांचा वापर सुरू केला आहे.

# दोन विद्यार्थ्यांनी घेतला गळफास

| पालघर | प्रतिनिधी |

वाडा तालुक्यातील आंबिस्ते खुर्द येथील अनुदानित असलेल्या माध्यमिक आश्रमशाळेतील ९ वी व १० वीच्या वर्गात शिकणाऱ्या दोन अल्पवयीनविद्यार्थ्यांनीगळफासघेवून आत्महत्या केली. ही घटना बुधवारी (दि.८) मध्यरात्रीच्या सुमारास घडली आहे. दोन्ही विद्यार्थ्यांचे मृतदेह शाळेच्या परिसरातील एका झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

मोखाडा तालुक्यातील मनोज सीताराम वड (वय १४, ९वी, रा.दापटी) तर देविदास परशुराम नावले (वय१५, १० वी, रा.बिबळपाडा, दापटी) अशी या गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांची नावे आहेत. हे दोन्ही विद्यार्थी या आश्रमशाळेतच इयत्ता पहिलीपासून शिक्षण घेत होते. या विद्यार्थ्यांच्या आत्महत्याचे कारण अस्पष्ट असले तरीही काही दिवसांवर आलेल्या परीक्षेचे मुलांना ताण आहे की, अजून काही आत्महत्येचे कारण आहे, हे निश्चित कळू शकलेले नाही. गेल्या १५ वर्षातील ही तिसरी घटना असून यापूर्वी एका शिक्षक आणि विद्यार्थी यांनी देखील आत्महत्या केल्याची माहिती आहे. दरम्यान, नुकताच या घटनेबाबत वाडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांनी सुरू केला असुन या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी कुठलीही सुसाईट नोट सापडली नाही.

## सोनोग्राफी मशिनची चोरी

**डोंबिवली :** डोंबिवली पूर्वेतील रामनगरमधील एका रुग्णालयातून सोनोग्राफीची मशिन अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. या मशीनची किंमत चार लाख रूपये आहे. हा चोरीचा प्रकार ३० सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत दुपारी साडेतीन वाजण्याच्या दरम्यान घडला. सोनोग्राफी मशिन ठेवलेल्या खोलीचा मुख्य दरवाजा कुलुपू लावून बंदिस्त होता. तरीही अज्ञात इसमाने दरवाजाचे कुलूप तोडून दिवसाढवळ्या खोलीत प्रवेश केला आणि कोणालाही सुगावा लागणार नाही अशा पध्दतीने ही मशिन चोरून नेली आहे. यासंदर्भात एका डॉक्टरने रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

# ई-बस प्रवाशांसाठी एसटीकडून पास योजना

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी महामंडळाने) प्रवाशांच्या सोयीसाठी आणि ई-बस सेवेला अधिक प्रतिसाद मिळवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता राज्यातील ई-बस प्रवाशांना मासिक व त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध होणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, या पास योजनांचा मुख्य उद्देश नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने दररोज एकाच मार्गावर प्रवास करणाऱ्या नियमित प्रवाशांना ई-बस सेवेकडे आकर्षित करणे हा आहे. सध्या महामंडळाच्या ताफ्यात ई-बस प्रकल्पातील ४४८ बस आणि शिवाई प्रकल्पातील ५० ई-बसेस कार्यरत आहेत. भविष्यात या बसेसची संख्या आणखी वाढवण्याचा मानस आहे.

अनेकप्रवाशांकडूनई-बससेवेत पास प्रणालीची मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर महामंडळाने प्रवाशांना अधिक सोयीस्कर आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारा प्रवास देण्यासाठी ही योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

**पास योजनेच्या प्रमुख वैशिष्ट्ये:**

**उपलब्धता :** ९ मीटर ई-बस, १२ मीटर ई-बस आणि ई-शिवाई सेवेमध्ये हे पासेस उपलब्ध असतील. (ई-शिवनेरी बससेवा वगळून)

**मासिक पास:** २० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ३० दिवसांसाठी पास दिला जाईल.

**त्रैमासिक पास:** (९० दिवस): ६० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ९० दिवसांचा पास उपलब्ध होईल.

**सेवा वर्गातील लवचिकता :** उच्च सेवा वर्गाचा पास (ई-बस) वापरून प्रवासी निमआराम किंवा साध्या बसमध्येही प्रवास करू शकतील.

**फरक भाडे नियम:** निमआराम किंवा साध्या बसच्या पासधारकांना ई-बसने प्रवास करायचा असल्यास, दोन्ही सेवांतील भाड्यातील फरक १००% दराने भरून तिकीट घेऊन प्रवास करता येईल.

महामंडळाच्या या निर्णयामुळे दैनंदिन प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# स्त्रीशक्ती नोंदणी उपक्रमातून मार्गदर्शन

| तळा | प्रतिनिधी |



द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महिला सबलीकरण कक्षातर्फे स्त्रीशक्ती नोंदणी उपक्रम आयोजित करण्यात आला होता. हा उपक्रम बुधवारी (दि.८) राबविण्यात आला. यामध्ये विद्यार्थिनींना या पोर्टलवर नोंदणी करण्यास प्रोत्साहित करण्यात आले. संपूर्ण महाविद्यालयांमध्ये याविषयी जनजागृती करण्यात आली. महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या अधिक सक्षम करणे, महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा त्याचा विस्तार करण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे, महिलांना व्यावसायिक आणि कौशल्य आधारित प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देणे, महिलांना संकटकाळात मदत मिळवण्यासाठी आणि स्वतःची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी मार्गदर्शन करणे, हा उद्देश होता. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्ता कुंटेवाड महिला सबलीकरण कक्ष समन्वयक डॉ. तृप्ती थोरात यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. संपूर्ण कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एम. लोखंडे यांचे सहकार्य लाभले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## पोस्ट ऑफिसमध्ये लाखोंचा अपहार

**चिपळूण :** मुर्तवडे येथील पोस्ट ऑफिसमध्ये २ लाखांचा अपहार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना १८ डिसेंबर २०१७ ते ७ नोव्हेंबर २०१८ तसेच २८ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत घडली. याप्रकरणी सावर्डे पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्ञानेश्वर यशवंत रहाटे (रा.मुर्तवडे) असे संशयित आरोपीचे नाव आहे. याबाबतची तक्रार गुहागर उपविभाग शृंगारतळीचे डाकघर निरीक्षक हिमांशु जोशी यांनी दिली.

# जामसंडेत गुटखा जप्त

| सिंधुदुर्ग | प्रतिनिधी |

सिंधूदुर्ग स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने जामसंडे बाजारपेठ येथील अनिकेत लाड यांच्या किराणा दुकानावर छापा टाकला. यावेळी ३८ हजार रूपये किंमतीचा गुटखा जप्त केला आहे. ही कारवाई बुधवार दि. ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.२५ वा. सुमारास करण्यात आली. या कारवाईमुळे गुटखा व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला मिळालेल्या माहितीच्या आधारे बुधवारी सायंकाळच्या सुमारास जामसंडे बाजारपेठ येथील अनिकेत रामचंद्र लाड (२५) यांच्या दुकानाच्या मागील बाजुस साठा करून ठेवलेल्या गुटख्यावर छापा टाकला. तेथून सुमारे ३७ हजार ८४४ रूपये किंमतीचा गुटखा जप्त केला आहे. यामध्ये विमल पानमसाला, रॉयल दुबई गुटखा, व्हीवन टोबॅको, आरएम्डी पानमसाला, एम् सेटेंड टोबॅको गोल्ड अशा गुटख्याचे २२५ पॅकेट जप्त केले आहेत. शरीरास विघातक पदार्थ विक्री व साठा केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

## खेर्डी ग्रामपंचायतीचा अनोखा निर्णय | फोटो काढून देणाऱ्याला विशेष बक्षीस

# कचरा टाकल्यास हजार रुपये दंड

| चिपळूण | प्रतिनिधी |

**घंटागाडीने कचरा उचलला जात असतानाही अनेक सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला जातो. त्यामुळे आता खेर्डी ग्रामपंचायतीने त्याला चाप लावण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्याला आता १ हजार रुपये दंड केला जाणार आहे. त्याचबरोबर सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्याचा फोटो काढून देणाऱ्याला ५०० रुपयांचे बक्षीस देण्याचा निर्णयही खेर्डी ग्रामपंचायतीने घेतला आहे.**



तालुक्यात सर्वाधिक श्रीमंत ग्रामपंचायत असलेल्या खेर्डी गावात गेल्या काही वर्षापासून घंटागाडीचा उपक्रम राबवला जात आहे. या सुविधेमुळे गावातील अंतर्गत तसेच सार्वजनिकठिकाणीकचऱ्याचेसाम्राज्य अथवा ढीग दिसत नाहीत. गावात घंटागाडीची सुविधा असतानाही काही सार्वजनिक ठिकाणी बिनधास्तपणे रस्त्याच्या कडेला कचरा टाकला जातो. सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकण्याबाबत ग्रामपंचायतीकडून वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबत जनजागृतीही केली आहे. मात्र तरीही काही ठिकाणी कचऱ्याचे ढीग आढळत आहेत. त्याला पायबंद घालण्यासाठी ग्रामपंचायतीने दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. सार्वजनिक ठिकाणी जो कचरा टाकेल, त्याला १ हजार रुपयांचा दंड ठोठावला जाणार आहे. कचरा टाकणाऱ्याचा कोणी फोटो काढून दिल्यास त्याला ५०० रुपयाचे बक्षीस दिले जाणार आहे.

लोकसहभागातून स्वच्छता अभियान आणि दंडात्मक कारवाईच्या बडग्यामुळे गावात नियमित स्वच्छता राहण्यास मदत होणार असल्याचा विश्वास सरपंच सुगंधा माळी, उपसरपंच अभिजीत खताते व सर्व सदस्यांनी व्यक्त केला.

### महिलांचा पुढाकार

सोशल मीडिया तसेच जनजागृती फलकाद्वारे याबाबतची माहिती ग्रामस्थांना दिली जात आहे. गावात नियमित स्वच्छता राहण्यासाठी प्रत्येक वाडीत सामूहिक स्वच्छता मोहीम राबवण्यात येणार आहे. याकामी बचत गटाच्या महिलांनी मोठा पुढाकार घेतला आहे.

### नागरिकांच्या आरोग्याला धोका

घरोघरी ओला आणि सुक्या कचऱ्याचे संकलन केले जाते. मात्र, तरीही काही ठिकाणी नागरिकांकडून सर्रास कचरा फेकला जातो. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते. परिणामी प्रदूषणात भर पडत असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे.

# निवडक

## महिला प्रभाग संघाची वार्षिक सभा

**म्हसळा :** शिवनेरी महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा म्हसळा तालुक्यात मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडली. सभेच्या प्रमुख जिल्हा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे होत्या. तर अध्यक्षस्थानी प्रभाग संघाच्या अध्यक्षा यशोदा कांबळे होत्या. कार्यक्रमाला गटविकास अधिकारी माधव जाधव, महसूल नायब तहसीलदार मृणालिनी शिरसाठ, तालुका कृषी अधिकारी दत्तात्रय शिंदे, जिल्हा अभियान व्यवस्थापक शिरीष पाटील, तालुका अभियान व्यवस्थापक रोहिणी निलेकर-पाटील, बालविकास प्रकल्प अधिकारी रेणुका पाटील, उपअभियंता संजय सूर्यवंशी, उप कृषी अधिकारी संजय शिंदे, आरडीसीसी बँकेचे व्यवस्थापक मंगेश मुंडे, विस्तार अधिकारी अजय खराडे आणि इतर मान्यवरांचा सहभाग होता. सभेत शिवनेरी महिला प्रभाग संघाच्या वर्षभरातील कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सध्या प्रभागामध्ये २६९ स्वयंसहाय्यता बचत गट, १७ ग्रामसंघ आणि १४ समुदाय संसाधन व्यक्ती कार्यरत आहेत. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने या सर्व घटकांचे कार्य अत्यंत मोलाचे ठरत आहे. तर बचत गटांच्या माध्यमातून महिलांचा आर्थिक उज्वल प्रवास सुरु असल्याचे जिल्हा प्रकल्प संचालिका प्रियदर्शिनी मोरे यांनी सांगितले.



## आदर्श कॉलेजच्या विद्यार्थिनींचे यश

**श्रीवर्धन :** एसएनडीटी विद्यापीठाची युवा महोत्सव २०२५ ची अंतिम फेरी दि. ४ ते ५ ऑक्टोबर रोजी चर्चगेट आवारात पार पडली. श्रीवर्धनच्या महर्षी कर्वे आदर्श महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी त्रिपुरा राज्यातील ममीता हे लोकनृत्य सादर केले. ज्याला युवा महोत्सवाच्या सलग मुंबई प्रादेशिक तसेच अंतिम फेरीत रौप्यपदक मिळाले. या नृत्यात युक्ता निलेश माने, स्वरांगी शैलेश दवटे, वैष्णवी अशोक म्हात्रे, अंजली अनंत मेंदाडकर, वैष्णवी संतोष जोशी, श्रुती संजय वाणी, ऋतुजा कमलाकर पड्याळ, श्रावणी सुनील दातार, सायली सोमनाथ काळे, नुपूर विनायक चोगले या विद्यार्थिनींनी उत्तम कामगिरी बजावत रौप्यपदक पटकावले. या नृत्याचे दिग्दर्शन सागर कुंभार व राहुल भुवड यांनी केले. अंतिम फेरीचा बक्षीस वितरण सोहळा विद्यापीठाच्या कुलगुरू मा. प्रो. उज्वला चक्रदेव तसेच ध्वनी दिग्दर्शक पारुल भटनागर यांच्या उपस्थित पार पडला.

## अळंबी व्यवसायातून रोजगार



**पालघर :** पालघर हा आदिवासीबहुल जिल्हा असून तेथील शेतकरी हा भातशेतीवर अवलंबून आहे. परंतु, नैसर्गिक आपत्तींमुळे उदरनिर्वाह करायचा कसा, असा प्रश्न या आदिवासी शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी डहाणूच्या कोसबाड येथील कृषी विज्ञान केंद्राने पुढाकार घेत या महिलांसाठी अळंबी म्हणजेच मशरूमचा जोड व्यवयास उपलब्ध करून दिला आहे. कमी खर्च, कमी श्रम आणि चांगल्या उत्पन्नामुळे हा व्यवसाय आदिवासींना उपयुक्त ठरला असून रोजगार नवी संधी बनला आहे. कोसबाड येथील कृषी विज्ञान केंद्र हे महाराष्ट्रातील पहिले आणि देशातील दुसरे केंद्र आहे. गेल्या ४९ वर्षांपासून शेती व संलग्न क्षेत्रांमध्ये संशोधन, प्रशिक्षण आणि विस्तार सेवा देत आहे. शेतकऱ्यांच्या गरजांनुसार आधुनिक कृषी तंत्रज्ञान पोहोचवणे, शेती विकास साधणे, तसेच पूरक व्यवसायांचा प्रसार करण्याचे काम केंद्राच्या माध्यमातून केले जाते. अळंबी उत्पादनासाठी कृषी विज्ञान केंद्रामार्फत आदिवासी भागातील महिला व तरुणांसाठी एक ते आठ दिवसांचे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले जाते. या शिबिरात गृहविज्ञान तज्ज्ञ रुपाली देशमुख या अळंबी विषयी प्रात्यक्षिक करतात. तर प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. विलास जाधव हे उद्योजकता विकास व मार्केटिंग या विषयांवर मार्गदर्शन करतात. आजपर्यंत या केंद्राने अनेक शिबिरे आयोजित केली असून शेकडो महिलांनी त्याचा लाभ घेतला आहे.




## भावनिक वातावरणात शिक्षकांना निरोप

**खरोशी :** पेण तालुक्यातील वाशी ग्रामपंचायत हद्दीतील सरेभाग येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील माजी मुख्याध्यापक मनोज थळे, मीनाक्षी जांभळे, विलास पाटील या शिक्षकांचा निरोप समारंभ अत्यंत भावनिक वातावरणात पार पडला. या सर्व शिक्षकांचे खूप मोठे योगदान सारेभाग शाळेला लाभले. शिक्षकांच्या प्रामाणिक प्रयत्न आणि अथक मेहनतीमुळे अतिशय दुरावस्थेतील शाळेचे रूपडे बदलले. या शाळेची सुसज्ज इमारत, क्रीडांगण, रंगमंच, स्वच्छतागृह, संगणक सुविधा अशा सर्व सुविधा शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी निर्माण केल्या. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गणवेश, टी शर्ट, दप्तर व इतर शालोपयोगी वस्तू भेट दिल्या. तसेच, रोख रक्कम १० हजार रुपये देणगी स्वरूपात दिली. निरोप घेताना विद्यार्थ्यांनी शाळेत शिकविलेल्या कलाकृती बनवून शिक्षकांना भेट दिल्या. त्यामुळे आमची मेहनत सफल झाली, असे उद्गार शिक्षिका मीनाक्षी जांभळे यांनी व्यक्त केले. शाळेसोबत कायम ऋणानुबंध राहतील, असे मनोज थळे गुरूजी व विलास पाटील गुरुजींनी आपल्या मनोगतात सांगितले.

## कारची काच फोडून चोरी

**नवी मुंबई :** सीबीडी येथे राहणारे व ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करणारे जसपालसिंग सिद्धू हे कामानिमित्त वाशी येथे आले होते. त्यांनी त्यांची कार वाशी सेक्टर १७ येथील एका ठिकाणी पार्किंगमध्ये पार्क केली होती. ते रात्री सव्वा सात वाजता एका कार्यालयात गेले व घरी जाण्यास सव्वा नऊ वाजता तेथून बाहेर पडले. ते गाडीजवळ आले असता गाडीची काच फोडलेली आढळून आली. त्यांनी तात्काळ गाडीच्या आतील काही चोरी झाले का याची तपासणी केली असता गाडीतील एक बॅग आढळून आली नाही. याच बॅगेत त्यांनी १५ लाख ७० हजार रुपयांची रोकड ठेवली होती. चोरी झाल्याची खात्री पटल्यावर त्यांनी वाशी पोलीस ठाण्यात कळवले. पोलिसांनी घटनास्थळी येत पाहणी करून गुरुवारी अपरात्री अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद केला आहे.

# टाटा पॉवर विरोधातले उपोषण स्थगित

## कंपनी प्रशासनाकडून लेखी आश्वासन; स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील भिवपुरी येथे टाटा कंपनीकडून नव्याने जलविद्युत प्रकल्प बांधला जात आहे. विविध मागण्यांसाठी स्थानिकांनी या प्रकल्पाला विरोध करीत उपोषण सुरू केले होते. स्थानिकांनी सुरू केलेल्या उपोषणाची सांगता झाली असून टाटा पॉवर कंपनीकडून उपोषणकर्त्यांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत अनेक मागण्या मान्य केल्या आहेत. दरम्यान, टाटा पॉवर कंपनीकडून देण्यात आलेल्या लेखी आश्वासन नंतर स्थानिक ग्रामस्थ आणि प्रकल्पग्रस्तांनी सुरू केलेले उपोषण स्थगित करण्यात आले.



भिवपुरी येथील टाटा पॉवर कंपनीच्या पंप स्टोरेज वीज प्रकल्पाविरोधात प्रकल्पग्रस्त आणि शेतकरी यांनी उपोषण सुरू केले होते. कर्जत पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक संदीप भोसले यांनी उपोषणकर्ते आणि टाटा पॉवर प्रकल्प अधिकाऱ्यांशी दोन दिवस वेगवेगळ्या विषयांवर चर्चा केली. त्यानंतर उपोषणकर्ते यांच्या मागण्या मान्य करीत लेखी आश्वासन दिले.

अक्षय ऊर्जा आणि स्थानिक विकासासाठी टाटा पॉवर प्रकल्प भविष्यात कटीबद्ध राहणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. भिवपुरीच्या टाटा कंपनीच्या पंप स्टोरेज जल विद्युत प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक गावकऱ्यासाठी विविध उपक्रम राबविणार असल्याचे जाहीर केले आहे. यामध्ये भिवपुरी ग्रामपंचायत हद्दी साठी असलेली जलकुंभ येथे पाणी शुद्धीकरण संयंत्राची उभारणी करून देण्यात येणार आहे. स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या करीता स्थानिक युवकांसाठी त्यांच्या आवडीप्रमाणे आणि कंपनी धोरणानुसार बांधकामाशी संबंधित कौशल्यांवर आधारित व्यावसायिक प्रशिक्षण आयोजित करून रोजगार क्षमतेत वाढ करण्याचे जाहीर करण्यात आले.

प्रकल्पाचे काम सुरू असताना ज्या घरांची पडझड झाली आहे अशा धनगरवाडीमधील घरांना संयुक्त तपासणीनंतर दुरुस्ती करण्याचे आश्वासन दिले आहे. धनगरवाडीतील १९ कुटुंबांच्या घरांच्या दुरुस्ती केली जाणार आहे. भिवपुरी, मांडवणे आणि हुमगाव येथील सार्वजनिक ठिकाणी ग्रामपंचायत कार्यालय तसेच शाळांमध्ये सौरदिवे बसविण्यात येतील. विविध गावातील युवा पिढी सुदृढ व्हावी या करिता एक ओपन जिम उभारली जाणार आहे. प्रकल्पाच्या बांधकामामुळे परिसरातील बोअरवेलमधील पाणी गायब झाले आहे, त्या बोअरवेलची दुरुस्ती केली जाईल तर ग्रामपंचायत कार्यालय आणि रोकडेवाडी-भिवपुरी रस्त्याला जोडणाऱ्या सुमारे दोन किमी रस्त्याच्या दुरुस्ती केली जाईल. अशा अनेक मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून प्रकल्प ग्रस्त यांनी टाटा कंपनी अधिकारी सोबत झालेल्या बैठकीत लेखी आश्वासन मान्य करीत आपले उपोषण स्थगित केले आहे.



## विद्यार्थ्यांसाठी योगाचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी योगाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम राजीव साबळे, प्रा. मेहरोश सनगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन मनोज उभारे यांनी केले.

कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. उभारे यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. प्रा. मेहरोश सनगे, सायली बक्कम, सोहम पोवार, संदीप सुतार, वैभव पाटील, अनघा गमरे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिले.

## चिरनेरला वन्यजीव सप्ताह

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या ठकुबाई परशुराम खारपाटील इंग्लिश मीडियम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र शासन वनविभाग अलिबाग वन परी क्षेत्र उरण व फ्रेंड्स ऑफ नेचर सर्पमित्र निसर्ग संवर्धन संस्था चिरनेर यांच्या विद्यमाने वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी फॉन संस्थेतर्फे विशेष वन्यजीव छायाचित्र प्रदर्शन व पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना वन्यजीव संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले.



दीपावली सणानिमित्त किल्ल्यांच्या निर्मितीला पनवेलमध्ये सुरुवात झाली आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

## चोंढी येथे स्त्रीशक्ती अभियान कार्यक्रम

**। सोगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील चोंढी येथील द लाईफ फाऊंडेशन व लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ (एल.एस.पी.एम.) कॉलेज चोंढी यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्रीशक्ती - महिलांचे सबलीकरण व स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान हा विशेष कार्यक्रम पार पडला. यामध्ये अंगणवाडी सेविका, आयसीडीएस पर्यवेक्षक, विद्यार्थी व स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.




या कार्यक्रमाचे आयोजन द लाईफ फाऊंडेशनच्या विश्वस्त पूनम अजित लालवानी व अलिबागच्या डी. वाय. एस. पी. माया मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. यावेळी 'एक भारत हम भारत' संस्थेतर्फे पूनम लालवानी यांना समाजकार्यातील योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी किशोरवयीन मुलींना, भेटवस्तू देण्यात आली. यावेळी रवींद्र ठाकूर, प्रमोद पाटील, जगन्नाथ पेढवी, राजेंद्र शिंदे, राजेंद्र नार्वेकर, किरण ठाकूर, मनोहर म्हात्रे, भाग्यश्री पाटील, कल्पिता सालावकर, डॉ. अश्विनी सपकाळ, डॉ. सुप्रिया वेटकुळे, प्राचार्या लीना पाटील उपस्थित होते. यावेळी द लाईफ फाऊंडेशनतर्फे सर्व मान्यवर, सहभागी व सहकारी संस्थांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

## राजश्री पाटील यांची उपसरपंचपदी निवड

**हमरापूर :** पेण तालुक्यातील कळवे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी राजश्री पाटील यांची निवड करण्यात आली आहे. उपसरपंच निवास पाटील यांची मुदत संपल्याने नवीन उपसरपंच पदासाठी निवडणूक प्रक्रिया करण्यात आली. यामध्ये राज-श्री पाटील निवडल्या गेल्या. यावेळी सतीश पाटील, श्रीधर म्हात्रे, निवास पाटील, दिलीप पाटील, भगवान पाटील, प्रमोद पाटील, नितीन पाटील, सदस्या मनीषा पाटील, अंकिता पाटील, कल्पिता पाटील, जयमाला पाटील, शामल मोकल, आदी उपस्थित होते.



## उरण नगरपरिषदचे आरक्षण जाहीर

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण नगरपरिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागनिहाय अंतिम आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. या आरक्षणानुसार, एकूण २१ जागांपैकी ११ जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.

नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी एकूण ६ जागा आरक्षित आहेत. यापैकी ३ जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी एकूण २ जागा आरक्षित आहेत. यापैकी १ जागा अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव आहे. अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी कोणतीही जागा आरक्षित नाही (निरंक). सर्वसाधारण सर्वसाधारण प्रवर्गासाठी एकूण १३ जागा आरक्षित आहेत. यापैकी ८ जागा सर्वसाधारण महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

## स्टॉलधारकांना परवाने देण्याची मागणी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मावळचे खा. श्रीरंग बारणे दिव्यांग संघटनेतर्फे पनवेल महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग स्टॉल धारकांना त्वरित परवाने मिळावे याचे निवेदन ६ ऑक्टोबर रोजी देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र दिव्यांग विकास फाऊंडेशनचे जिल्हाप्रमुख भरत ज्ञानदेव जाधव, विलास फडके, अतुल रायबोले, नवनाथ गाढवे आणि इतर दिव्यांग बांधव उपस्थित होते.

महानगर पालिका हद्दीत दिव्यांग स्टॉलच्या माध्यमातून अनेक वर्षापासून व्यवसाय करत आहेत. परंतु त्यांना महानगरपालिका वारंवार अतिक्रमण कारवाई करत आहे. त्यामुळे दिव्यांग स्टॉलधारकांवर नेहमी भीतीची टांगती तलवार असते. या विरोधात अनेक आंदोलने उपोषणे केली, मोर्चे काढले परंतु पनवेल मनपा आयुक्त फक्त आश्वासन देतात की सर्व दिव्यांग स्टॉलधारकांचे सर्वे करून तुम्हाला परवाने देतो. महानगरपालिका स्थापन झाली तेव्हापासून चार वेळा आयुक्त आले आणि गेले. प्रत्येक आयुक्त फक्त आश्वासनाची पाने दिव्यांगांच्या तोंडाला पुसत असल्याचा आरोप दिव्यांग बांधव करत आहेत. ठराविक संघटनांच्या स्टॉल धारकांना परवाने दिलेले आहेत. इतर दिव्यांगांना परवाने का देत नाहीत हा दुजाभाव, भेदभाव का? केला जात आहे असा सवाल विचारला जात आहे. खासदारांनी याकडे स्वतः लक्ष घालून महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग स्टॉलला कायमस्वरूपी परवाने मिळवून द्यावेत अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## पाण्यासाठी धनगरआळीतील महिला त्रस्त

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहे शहरातील धनगरआळी परिसरात पाणी टंचाई जाणवत असल्याने संतप्त महिलांवर्गाने नगर पालिकेवर धडक मोर्चा काढून नगर पालिकेला लेखी निवेदन दिले आहे.

ऐन सणासुदीत परिसरात पाणी पुरवठा होत नसल्याने नागरिकांत विशेषतः महिला वर्गात संतापाचे वातावरण पसरला आहे. दरम्यान, आपल्या भागातील महिलांचे पाण्या वाचून हाल होत असल्याने या पाणी समास्यावर मात करण्यासाठी महिलांवर्गाने मोर्चा काढला होता.



> ग्रामस्थांकडून पाणी समस्या बद्दल निवेदन प्राप्त झाला आहे. या भागात नक्की पाणी कमी दाबाने येत आहे का हे बघितले जाईल आणि त्यानंतर तातडीने योग्य उपाययोजना केली जाईल.
>
> - अजयकुमार शिंदे, मुख्याधिकारी रोहा अष्टमी नगर पालिका

धनगर आळी भागातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून अनियमित पाणी व कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. पाण्याच्या वेळा देखील निश्चित नाहीत. तसेच अपुऱ्या पुरवठ्यामुळे नागरिकांचे आपापसात भांडण होते. पाणी आल्यानंतर ते अवघे दहा ते पंधरा मिनिटे असते. त्यामुळे या परिसरातील नागरिक त्रस्त असून महिलांनी सोमवारी नगरपालिका कार्यालयावर मोर्चा काढला.

यावेळी माजी नगरसेविका सुमित्रा बांदल, लीला बांदल, अश्विनी काफरे, कुसुम बांदल, सुनीता वखारदार, पुष्पा वखारदार, संगीता जाधव, आशा वखारदार, रंजना वखारदार, मंजुळा बांदल, अक्षता शिंदे, आशा काफरे, अश्विनी साळवी, अंजु घरट, संगीता भोसले, वैशाली बांदल, सुरेश बांदल, रवी वखारदार व महिला भगिनी उपस्थित होत्या.

**शासनाकडून हेक्टरी ५० हजाराची मदतीची मागणी | तहसीलदारांना भरपाई मिळावीसाठी निवेदन**

# भातशेती नुकसानीसाठी शिवसेना आक्रमक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील खरीप हंगामात केलेल्या भाताच्या शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. सरत्या पावसाने केलेल्या भाताच्या शेतीचे झालेले नुकसान लक्षात घेऊन शासनाने हेक्टरी ५० हजाराची मदत द्यावी अशी मागणी शिवसेना ठाकरे पक्षाने केली. शिवसेना ठाकरे पक्षाचे बहुसंख्य कार्यकर्ते शेतीच्या नुकसानी बद्दल भरपाई देण्याच्या मागणीसाठी आक्रमक झाल्याचे दिसून आले.

तालुक्यातील भाताच्या पिकाची मोठ्या प्रमाणावर सरत्या पावसामुळे नुकसान झाले आहे. शिवसेना ठाकरे पक्षाने कर्जत तहसील कार्यालय गाठून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी आपल्या मागणीचे निवेदन दिले.



अतिवृष्टीमुळे घरे आणि पशुधनाचे नुकसान झालेल्या नागरिकांना, जुने निकष न लावता, योग्य आणि पुरेसा मोबदला त्वरित देण्यात यावा अशी मागणी शिवसेना पक्षाने केली. राज्यातील शेतकरी सततच्या नैसर्गीक आपत्ती, दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, उत्पादन खर्चातील वाढ महागडी खते, औषधामुळे आर्थिक संकटात सापडले आहेत. पीकांचे भाव हमी भावापेक्षा कमी मिळत असून उत्पादन खर्च वसूल करणे देखील कठीण झाले आहे. शेतकरी व ग्रामीण भागाचे उपजीविकेचे प्रमुख साधन असलेल्या शेतीतील उत्पन्नाला हमीभाव, योग्य बाजार नसल्याने बहुतांश शेतकरी बँक व सावकाराकडील कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहेत. अनेकांना थकबाकीमुळे नोटीसा, जप्ती कार्यवाही, काहीकडून तर आत्महत्येचे टोकावे निर्णय घेतले जात आहे. दिवसेंदिवस त्याचे आकडे वाढत आहे. ही कर्जमुक्ती सर्व प्रकारच्या कर्जावर, यामध्ये थकबाकीदार, चालू बाकीदार यांच्यासह अल्प मुदतीचे पीक कर्ज, मध्यम मुदतीचे सिंचन व उपकरण कर्ज तसेच सावकारी कर्ज यात समाविष्ट करण्यात यावी.

### कर्जमुक्तीची मागणी

**सरसकट कर्जमुक्ती हीच तातडीची आणि परिणामकारक उपाययोजना आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सर्व कर्जातुन कर्जमुक्त करावे. पीक विम्याचे कठीण निकष तातडीने शिथिल करून पंचनाम्याची प्रक्रिया बाजूला ठेवत विम्याची रक्कम त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी.**

यावेळी शिवसेना ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, उत्तम कोळंबे, बाबू घारे, प्रमोद सुर्वे, नितीन धुळे, बाजीराव दळवी, पांडुरंग बागडे, भगवान बांगर, दिनेश भासे, मिलिंद सोनवले, रमेश भुसाल, संपत हडप, नरेश मिनमीने, सतीश सावंत, साहिल मगर, करण धस, लालू शाह आदीसह शेतकरी उपस्थित होते.

## निवडक



### मासेमारीसाठी कोळीबांधवांची लगबग

**आगरदांडा :** मुरूड तालुक्यातील एकदरा, राजपुरी, आगरदांडा, बोर्ली, कोर्लेई या परिसरातील मासेमारी बोटी समुद्रात मासेमारी करिता जाण्यास सुरुवात केली आहे. त्या आधी सकाळी बोटीत महिन्यांभरचे कडधान्य, बर्फ, पुरेशी औषध, पिण्याचे पाणी आदिंसह सामान भरण्यासाठी मासेमारी कोळी बांधवांची लगबग सुरू झाली आहे. शासनाने १ ऑगस्टपासून समुद्रात जाण्यास व मासेमारी करण्यात मान्यता दिल्यापासून समुद्रात तीन वेळा वादळ आल्याने मासेमारी कोळी बांधवांचं खुप मोठं आर्थिक नुकसान झाले आहे. आता वादळ पुर्णता शांत झाल्याने मच्छिमार बांधव नव्या उत्साहात दर्यावर स्वार होण्यासाठी सज्ज झाला आहे. मुरूड तालुक्यासह शहरातील हजारो कुटुंब मासेमारी व्यवसायावर अवलंबून असतात. पावासाळ्यात संपुर्ण मासेमारी बंद होती. बंदी उठल्या नंतर मासेमारी करणारे कोळी बांधव समुद्रात मासेमारी करिता सज्ज होत्या दोन दिवसांतच दोनदा वादळी वाऱ्यासह पाऊस पडत असल्याने पुन्हा बोटी किनाऱ्यावर लावल्या गेल्या.एका बोटीत साधारण १० खलाशी व एक नाखवा असतो. त्यांचा पगार अंगावर पडल्याने नाखवाना म्हणजे च बोट मालकांना आर्थिक नुकसानला सामोरे जावे लागले. आता हवामान चांगले आहे. त्यामुळे मासेमारी बोटी समुद्रात जाण्यास तयार झाले आहे.



### ज्येष्ठ नागरिक दिन साजरा

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील झिराड येथे झिराड परिसर(२७ गांव) संस्थेच्या वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त १ ऑक्टोबर रोजी मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या सभागृहामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा संस्थेच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष ॲड. अनंतराव पाटील, अशोक म्हात्रे, प्रफुल्ल राऊत, ॲड. के. डी. पाटील उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष अनंतराव पाटील, अशोक म्हात्रे, भिडे, अशोक पाटील, नरहरी तोडणकर, डॉ. सुरेश म्हात्रे, नरेंद्र घोसाळकर, नथुराम पाटील, शांताराम नरहरी राऊत, नथुराम कडवे, गजानन पाटील, विनायक पाटील आदी ज्येष्ठ नागरिक व मान्यवरांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन विक्रांत पाटील यांनी केले.

### बोरघर येथे रानडुकरांचा कहर

**चणेरा :** रोहा तालुक्यातील बोरघर परिसरात रानडुकरांचा प्रचंड हैदोस सुरू असून, या भागातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. हातात तोंडाशी आलेले भात पीक, कारले, भेंडीसह विविध पिकांची संपूर्ण नासधूस झाली असून, शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. गावातील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तात्काळ पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, तसेच रानडुकरांचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस उपाययोजना करावी अशी मागणी केली आहे. यशवंत भगत यांच्या शेतात रानडुकरांनी हाहाकार माजवून भात पिकाचे मोठे नुकसान केले आहे. या संदर्भात तालुक्याचे वनविभागाचे मुख्य अधिकारी दबडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीबाबत अर्ज करावा. त्यासोबत आधार कार्ड, सातबारा उतारा, बँक पासबुक या कागदपत्रांच्या प्रती जोडून द्याव्यात. पंचनामा करून अहवाल वरिष्ठांना सादर केला जाईल अशी माहिती दिली, दरम्यान, बोरघर व परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी प्रशासन व वनविभागाने संयुक्त सर्वेक्षण करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत द्यावी, तसेच रानडुकरांच्या नियंत्रणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. आमच्या मेहनतीचा घास हिरावला गेला आहे. आता प्रशासनाने तरी न्याय द्यावा आणि बोरघर येथील सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अकाऊटंट पाहिजे. पात्रता- Bcom, Tally अनुभव- ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार २५००० महिना, Contact- 9823585321
- आवश्यक : सहाय्यक कर्मचारी खाजगी बंगल्याच्या साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदारी आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थान : नागाव, संपर्क : ९८२०४१४८११ बैठकीची तारीख ११ ऑक्टोबर २०२५, सकाळी ११ वाजल्यापासून सुरू. किमान वयोमर्यादा १८ ते ३५ वर्षे आहे.
- दुकान गाळा विक्री करणे आहे. अलिबाग एस.टी.स्टँड जवळ ९७६४५४८६७९
- अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी १० वी पास मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- अलिबाग-गोंधळपाडा येथे २.५ वर्षांच्या जुळ्या मुलींना सांभाळून जेवण बनवणे किंवा घरकाम करणे यासाठी निवासी (२४ तास) प्रेमळ मदतनीस ताईची आवश्यकता आहे. साधारण वयोमर्यादा- ३५ ते ५५ वर्षे. संपर्क : ९८६९१८०१५१/८८०६६८५७१०
- मुलं, मुली पाहिजेत कामासाठी १० वी १२ वी पास औषधांच्या एजन्सीमध्ये part time सुद्धा चालेल. वेळ : १०.०० am to ७.०० pm

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# माथेरान घाटात अपघाताचा धोका

| माथेरान | प्रतिनिधी |

वाहनाच्या धडकेने माथेरान घाटातील पिटकर पॉइंटवर सुरक्षा रेलिंग तुटले आहे. मात्र महिना उलटूनही या ठिकाणी नवीन सुरक्षा रेलिंग बसवण्यात आलेले नाही. त्यामुळे पर्यटकांचे एखादे भरधाव वाहन दरीत कोसळून मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. घाटात असे अनेक ब्लॅक स्पॉट असल्याने माथेरानचा मार्ग धोक्याच्या वळणावर आहे. त्यामुळे बांधकाम विभागाच्या भोंगळ कारभारामुळे अपघात होण्याचा धोका आहे.

थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरानमध्ये दररोज हजारो पर्यटक येतात. मात्र माथेरानला जाणारा घाटरस्ता सध्या धोकादायक बनला आहे. पिटकर पॉइंट या वळणावरील सुरक्षा रेलिंग मागील अपघातात तुटले होते. मात्र प्रशासनाने याची दुरुस्ती केली नाही. त्यानंतर पुन्हा याच ठिकाणी अपघात झाला. या अपघातात पाच पर्यटक जखमी झाले तर एक महिला थोडक्यात बचावली होती. या घटनेला महिना उलटून गेला तरीदेखील प्रशासनाने याची दखल घेतली नाही. आता तरी प्रशासनाला जाग येणार का, आणखी किती अपघात झाल्यावर रेलिंग बसवणार, कोणाचा जीव गेल्यावर उपाययोजना करणार का, असा संतप्त सवाल नागरिकांनी केला आहे.

---

दि. २९/०३/२०२५

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा सदरच्या व्यवहाराची बयाणा पावती विद्यमान मालक १) श्री.प्रविण नारायण ठाकुर, २) सौ.समिता सुदेश टेकाळकर यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

| मौजे | भूमापन नंबर | क्षेत्र ( हे.आर .) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चिंचोटी ता.अलिबाग | ७६/६/ब | जिरायत ०-२४-५०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-२५-०० | ०.५० |

वर वर्णन केलेली संपुर्ण मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे

**ॲड. नभेश भास्कर ठाकुर**
मु. महाजने, पो.मल्याण,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ७०६६७०९५९७

---

### PANVEL MUNICIPAL CORPORATION PANVEL

### TENDER NOTICE

Online bids are invited from bidders for purchase of the Medicinal items on behalf of the in after called the Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel (here CORPORATION) and will be received online on the website www.mahatenders.gov.in as per time schedule (key dates) in the notice published on the above website. Tenders are being invited online from eligible contractors for "Supply of Medicines for the Panvel Municipal Corporation Area". Online pre bid queries will be asked panvelcorporation@gmail.com before the stipulated date.

Tender No.: PMC/MOH/01/2025-26 Date: 09/10/2025

sd/xxx
Additional.commissioner
Panvel municipal corporation

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अभय आत्माराम दळवी रा. मल्याण, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

-: मिळकतीचे वर्णन :-

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| मल्याण ता. अलिबाग | ३९८/१ | ०-८२-६०<br>पो. ख ०-०६-००<br>०-८८-६० | १२-१८ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व समजून माझे आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. ०९-०९-२०२५

सही/-
**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु, ब्राम्हण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत हि खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे : कांडणे खुर्द, ता. रोहा, जि. रायगड, येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | एकुण क्षेत्र हे आर | आकार रु.पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| प्रियांका संदीप पारकर | ४१/१ | जिरायत १-७५-००<br>पो.ख.०-८४-००<br>२-५९-००<br>पैकी प्रियांका संदीप पारकर यांचे मालकीचे क्षेत्र १-८०-०० | १=१२<br>०=६४ | १ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे आशिल यांनी जमीनमालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त साठेकरार, अखत्यार, लिएन चार्ज, ॲटचमेंट अन्न, वस्त्र, निवारा ताबा, कबजा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. १०/१०/२०२५

सही /-
**ॲड. श्री.पी.जी.दाभाडे,**
रा. फ्लॅट नं.४०२, बी विंग, ४ था मजला.
साई नगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे हॉस्पीटल जवळ, रोहा,
ता. रोहा जि. रायगड ४०२१०९,
मोबा. क्र. ९२७२७१३९५६

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत या मिळकतीचे विद्यमान मालक श्री अशोक सखाराम पाटील, रा. मु. पो. कोपर, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी केली आहेत.

**मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार(रू.पैसे) |
|---|---|---|---|
| कोपर, ता.अलिबाग, जि.रायगड | ७३/३ | ००-३७-७०<br>पो.ख. ००-०६-१०<br>एकुण ००-४३-८०<br>पैकी सुमारे १६ गुंठे क्षेत्र | १०.९१ |

सदर वर नमुद मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष तांबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा श्री अशोक सखाराम पाटील यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत आणुन द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचाही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहुन आलेली अशी कोणतीही, कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक : ०९/०९/२०२५

स्वाक्षरीत/-
**ॲड.सविता शं.पिंगळे**
२०१ सुष्टी, दुसरा मजला, वेध शाळेसमोर
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड

---

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि.रायगड)

ज.म.र अर्ज ३५२/२०२५

## जाहिर नोटीस

प्रति,
श्री.अखतर अली अब्दुल्ला महाडकर — अर्जदार
रा.मु.पो.शिघ्रे, ता.मुरुड जि.रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे,
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ०२/०५/१९६७ रोजी मौजे शिघ्रे, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ०२/०५/१९६७ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक १८/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

कळावे.

आज ता. ०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे पाबळ, ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. मयुर महादेव नाईक व इतर यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. सुनिल जानु पदरत, श्री. सुधिर जानु पदरत व शांताबाई जानु पदरत यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| पाबळ | ३७ अ | ०.५९.७०<br>पो.ख ०.००.००<br>एकुण क्षेत्र ०.५९.७० | ६.५० |

वरील संपूर्ण क्षेत्रापैकी श्री.सुनिल जानु पदरत, श्री.सुधीर जानु पदरत व शांताबाई जानु पदरत यांच्या हिश्याचे क्षेत्र ०.१६.७० हे.आर., आकार ०.०० रू.पै.इतके क्षेत्र हे आमचे अशिल नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप : सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण : पेण
दि.१०/१०/२०२५

सही /-
**ॲड हेमा ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं. ९८२२०३०३८९

---

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) रमेश म्हातारबा गावडे आणि २) सदाशिव म्हातारबा गावडे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित बाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा ) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - रुळे, तालुका अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १०/२, एकूण क्षेत्र ०१-१४-३० (हे.आर.चौ.मी.) आकार रु.पै. २६.०६/- आणि भूमापन क्रमांक व उपविभाग ११, एकूण क्षेत्र ००-१७-०० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ०.३६/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०९/१०/२०२५

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

---

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग ११, एकूण क्षेत्र ०.४१.८० (हे.आर), आकार २.२० (रु.पैसे), या मिळकतीचे विद्यमान मालक साक्षी जितेंद्र पिंगे, रा. मुंबई यांजकडुन जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशीलांनी विकत घेण्याबाबत बोलणी केलेली आहेत. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक-०९/१०/२०२५

**(ॲड. परेश एम.घरत )**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर, एस.टी.स्टॅंड जवळ,
अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड
९८५०४८१२३४

---

### e-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-19/25-26 **7000037845** | AMC for restoration of collapsed tower and work preventive maintenance, emergency and breakdown works at various 220kV and 100kV lines under line s/dn Panvel-I & under EHV (O&M) Division, Panvel. | **Rs. 100.00 Lakhs** |

EMD 1% of estimated cost, **Submission of bids from 09.10.2025 to 24.10.2025 up to 11:00 hrs, Opening date :- 24.10.2025 @ 11:30 Hrs. Tender Fee :-** Rs. 500/- + GST each tender. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer (Adm)
Mob. No. 8412050202. E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक बाळासाहेब श्रीकृष्ण पुरी व मंजुषा बाळासाहेब पुरी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे मौजे डोणे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ११/२/अ | एकुण क्षेत्र ०-४०-३० हे आर पॉ | ५-६० |
| १२/१ | एकुण क्षेत्र ०-२१-५० हे आर पॉ | ०-४९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाना-पावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १०/१०/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता.कर्जत,जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड. कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

---

## अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याचे कलम ३२ ग अन्वये पोट-कलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

**नोटीस** — दावा क्रमांक ०८/२०२५

१. श्री. प्रमोद जयराम पाटील
२. श्री. संजय जयराम पाटील — वादी/अर्जदार
३. श्रीम. जयश्री प्रभाकर पाटील
सर्व रा.धामणपाडा, पो.शहाबाज,
ता.अलिबाग, जि.रायगड

विरूद्ध

श्रीम. शांताबाई ऊर्फ इंदिराबाई वामन पाटील
रा.धामणपाडा, पो.शहाबाज, — प्रतिवादी/सामनेवाला
ता.अलिबाग, जि.रायगड

**विषय-** मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम ३२ ग प्रमाणे

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं.हि.नं. | क्षेत्र हेक्टर आर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| मौजे शहापुर, ता.अलिबाग | ४२०/२ | ०-१३-४०<br>पो.ख. ०-००-८०<br>एकूण ०-१४-२० | १.७५ |

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम ३२ ग नुसार खरेदी किंमत ठरवून मिळणेकामी या न्यायालयात दि.१०/०६/२०२५ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारिख ०७/११/२०२५ रोजी ११.०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणा पुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावीत आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न राहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- ०७/१०/२०२५

सही/-
**(विक्रम पाटील)**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण**
**अलिबाग- रायगड**

---

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग ३९, एकूण क्षेत्र ०.३७.१० (हे. आर), आकार ०९.९४ (रु. पैसे), पैकी ०.२१.८० हे. आर या मिळकतीचे विद्यमान मालक तेजल तुषार म्हात्रे, रा. सारळ, अलिबाग यांजकडुन जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशिलांनी विकत घेण्याबाबत बोलणी केलेली आहेत. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०९/१०/२०२५.

**(ॲड. परेश एम. घरत )**
तळमजला, अशोका शॉपिंग सेंटर, एस.टी.स्टॅंड जवळ,
अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड
९८५०४८१२३४

---

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसात कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांनबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे आर्के, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.चौ.मी | रुपये | पैसे |
| के ॲन्टोनी मॅथ्यु | १२६ | १ | ०-२०-०० | ० | १९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:-ए विंग, फ्लॅट नं.४,
पहिला मजला, गणेश अपार्टमेंट,
कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- १०/१०/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७

---

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दत्तात्रेय रामचन्द्र पाटील व इतर १९ यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु. पै) |
|---|---|---|---|
| मौजे सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड | १०४ | जिरायत ०-५३-३०<br>वरकस ०-१६-८०<br>पो.ख. ०-०४-००<br>एकूण ०-७४-१० | १४.६१ |

अलिबाग,
दि. ०९/१०/२०२५

**ॲड. हर्षल लक्ष्मण पाटील**
MAH/7118/2023

---

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल १. श्रीमती संध्या रविंद्र ठाकुर व २. श्री. सृजन रविंद्र ठाकुर, दोघे रा. रुम नंबर ३०३, कैलास सह. गृहनिर्माण सोसायटी, प्लॉट नंबर ११, सेक्टर नंबर १४, नवीन पनवेल, जिल्हा रायगड., नवीन पनवेल - ४१०२०६ यांनी खालील नमूद केलेली शेतजमीन मिळकत, सदरील जमीन मिळकतीचे ज्ञात मालक श्री. सुभाष लक्ष्मण पाटील, वगैरे १२, सर्व रा.बोर्झे, पो.वाशी, ता.पेण, जि. रायगड यांचेकडून कायम मालकीहक्काने खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत उभय पक्षकारांमध्ये व्यवहाराच्या वाटाघाटी पुर्ण होऊन दिनांक ०९/१०/२०२५ रोजी साठेखतासोबत बयाणा पावती दस्त आमचे अशिलांचे लाभांत नोटरीद्वारे नोंदणी करुन देऊन, आमचे अशिलांकडून, बयाणाची रक्कम सर्व जमीन मालकांनी रोख व धनादेशांचे स्वरुपात स्विकारलेली आहे.-:

**मिळकतीचे वर्णन :-**

| गाव | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.-पैसे.) |
|---|---|---|---|
| ओढांगी, ता.पेण | २७७ | ००-१४-९० | २-३१ |

वरील जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरील जमीन मिळकतींचे ज्ञात मालकांनी, आमचे अशिलांना दिलेला आहे. तरी देखील सदर जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा, व्यक्तींचा, जमीनीचे मुळ मालकांचा अगर त्यांचे वारसांचा, सहकब्जा-हिस्साधारक यांचा, कोणत्याही बँकेचा, संस्थेचा गहाण, लिन, लिज, दान, बक्षिस, बयाणा पावती, साठेकरार, खरेदी, इतर कोणताही करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा, बोजा, वसुली अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, महसुल वाद, दिवाणी दावा, इत्यादी काहीही असल्यास त्याबाबतच्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे सदरहू नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी तक्रार, हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास, वर उल्लेखलेली शेतजमीन मिळकत पुर्णतः निर्वेध व बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल, सदर शेतजमीन मालमत्तेचा खरेदीचा अंतिम व्यवहार विद्यमान मालकांबरोबर नोंदणीद्वारे पुर्ण करतील व त्यानंतर मागाहून येणारी कोणतीही तक्रार/हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे कळावे व याची सर्वांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर केले असे.

ठिकाण : पेण,
दिनांक : १०/१०/२०२५

सही /-
**ॲड. सौ. सरिता प्रविण माळी**
फ्लॅट नंबर २०१/०९ ए, भालचंद्र कॉम्प्लेक्स,
ए विंग, २ रा मजला, वीर सावरकर मार्ग,
गोविंद बाग, कौंडाळतळे, मु.पो.ता.
पेण, जिल्हा रायगड.-४०२ १०७
भ्रमणध्वनी क्र. ८९८३४३५१९६/७४४७६७०५५५

# काकरतळे तरुणांचा 'आदर्श' देखावा


**पुणे कोकणात पटकावला द्वितीय क्रमांक**

**। महाड । प्रतिनिधी ।**

टाईम्स ग्रीन गणेश स्पर्धेत काकरतळे तरुण ऊत्साही मंडळाने साकारलेल्या 'आदर्श गाव' या समाजप्रबोधनात्मक देखाव्याने यंदा पुणे व कोकण विभागात दुसरा क्रमांक पटकावला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा बुधवारी (दि.८) मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पार पडला. यावेळी महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, सिनेअभिनेत्री मृणाल देशपांडे आणि माधवी निमकर उपस्थित होत्या.




कोकणातील तरुण वर्ग रोजगाराच्या शोधात शहरांकडे वळत असल्याने गावे ओस पडत चालली आहेत, शेती कमी होत आहे. या पार्श्वभूमीवर काकरतळे तरुण ऊत्साही मंडळाने समाजप्रबोधनाचा संदेश देणारा 'आदर्श गाव' हा देखावा साकारला. पूर्णपणे मातीपासून बनवलेल्या या देखाव्यात ग्रामविकास, पर्यावरण संवर्धन आणि रोजगारनिर्मिती यांचे जिवंत चित्रण करण्यात आले. या देखाव्यात वृक्षलागवड, औषधी वनस्पती लागवड, देवराई संवर्धन, जलसंधारणाची कामे, सिमेंट नाला बांध, वळण बंधारा, कोल्हापुरी प्रकारचा बंधारा, शेततळे, वनतळे, समतल चर आदींचे प्रतिकृतीद्वारे दर्शन घडविण्यात आले. सोलर पंपद्वारे सिंचन, भाजीपाला व फळशेती, तसेच शेती उत्पादनावर आधारित प्रक्रीया युनिट दाखवून ग्रामीण रोजगाराचे आदर्श मॉडेल सादर केले. त्याचबरोबर गावातील कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, ग्रामपंचायत इमारत, झरे विकास प्रकल्पांतर्गत पाणीपुरवठा प्रणाली, सोलर ऊर्जा प्रकल्प, शोषखड्डे, बायोगॅस, बचतगटांचे व्यवसाय, औषधी वनस्पती प्रक्रिया उद्योग, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन यांचा समावेश करण्यात आला. गावातील आदर्श शाळा, क्रीडांगण, उद्यान, सीसीटीव्ही व्यवस्था, अभ्यासिका, ग्रामस्थांसाठी अवजार बँक, सौर पथदिवे, पर्जन्यम ापक यांसारख्या उपक्रमांमधून गावाचे सर्वांगीण चित्र साकारले गेले. या देखाव्याच्या निर्मितीसाठी मंडळातील कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या या प्रयत्नाची दखल घेत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि टाईम्स ऑफ इंडिया समूह यांच्या संयुक्त विद्यमाने मंडळाला चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष विशाल सावंत, सदस्य राहुल सावंत, राकेश घरटकर, राजा सुतार, रुपेश घरटकर, प्रवीण जोशी, सूरज सावंत, मेहुल सावंत, रितेश घरटकर, मयुर कदम, शैलेश सावंत, राधेय सुतार आणि साई सावंत आदी उपस्थित होते.



## हुतात्मा चौकात स्मृतिचिन्ह बसवले

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

पेण शहरातील वीर हुतात्मा भाई कोतवाल चौकातील स्मृतिचिन्हासाठी सामाजिक कार्यकर्ते जीवन पाटील यांनी बुधवारी (दि.१) पेण नगरपरिषद मुख्याधिकारी तथा प्रशासकांच्या कार्यालयात त्यांची भेट घेऊन स्मृतिचिन्ह बसविण्याची मागणी केली होती. त्याबाबत मुख्याधिकारी यांनी मागणीची तात्काळ दखल घेत अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देऊन लवकरच काम हाती घेण्याची ग्वाही दिली होती. त्या शब्दाला जागून त्यांनी बुधवारी (दि.८) हुतात्मा चौकात स्मृतिचिन्ह प्रस्थापित केले. शहराच्या सांस्कृतिक अभिमानाशी निगडित असलेल्या या कार्यासाठी त्यांनी दाखविलेली कर्तव्यनिष्ठा, संवेदनशीलता व कार्यदक्षता दाखवल्याबद्दल त्यांचे जीवन पाटील यांनी आभार मानले. तसेच, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांचेही आभार मानण्यात आले.

## निवडक



### पनवेल तहसीलदारपदी मीनल भामरे

**पनवेल :** पनवेलच्या तहसीलदारपदी मिनल भामरे यांची नियुक्ती करण्याचे आदेश राज्य सरकारच्या महसूल खात्याने काढले आहेत. त्यानुसार त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. पनवेल परिसरात असलेल्या मॅरेथॉन बिल्डरला दिल्या गेलेल्या अकृषिक जमिन दाखल्याप्रकरणाचा ठपका ठेवत तत्कालीन तहसीलदार विजय पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई केली गेली आहे. त्यांना या काळात जिल्हाधिकारी कार्यालयात सेवेत रुजू करून घेत त्यांचा पदभार अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांच्याकडे सोपविण्यात आला होता. दरम्यान, शासनातर्फे मिनल भामरे यांच्या नियुक्तीचे आदेश काढण्यात आले. त्यांनी नुकताच आपला पदभार स्वीकारला असून त्यांचे प्रांतधिकारी पवन चांडक यांनी पुष्पगुच्छ अभिनंद केले.



### जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**उरण :** रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या मार्गदर्शनाखाली दि.८ व ९ ऑक्टोबर रोजी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये आढावा बैठका आयोजित करण्यात आल्या. यावेळी रोहा, तळा, महाड आणि माणगाव या तालुक्यांतील बैठकीत स्थानिक स्तरावरील पक्ष कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठका यशस्वीपणे पार पडण्यासाठी रोहा तालुकाध्यक्ष सुनील देशमुख, तळा तालुकाध्यक्ष शरद भोसले, माणगाव तालुकाध्यक्ष विलास सुर्वे आणि महाड तालुकाध्यक्ष उमेश तांबे यांनी आपल्या तालुक्यांमध्ये बैठकीचे अत्यंत प्रभावी नियोजन केले. तसेच, या दौऱ्यादरम्यान तळा, माणगाव आणि महाड येथे काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयांचे उद्घाटन देखील करण्यात आले. या कार्यक्रमाला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




### पोस्को महाराष्ट्र स्टीलचा सन्मान

**माणगाव :** स्टील उद्योग क्षेत्रात आघाडीचे नाव असलेल्या माणगावातील पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीला शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल 'रोटरी नॅशनल सीएसआर अवॉर्ड २०२५' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. रोटरी क्लब ऑफ मुंबई पिअरने रोटरी नॅशनल सीएसआर अवॉर्ड समारंभ बुधवारी (दि.८) मुंबई येथील मोतीलाल ओसवाल टॉवर येथे आयोजित केलर होता. यामध्ये सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कंपन्यांना सन्मानित करण्यात आले. पश्चिम विभागातील गुजरात, महाराष्ट्र आणि गोवा) या राज्यांतून १६० कंपन्यांनी नामांकन सादर केले. त्यापैकी २० कंपन्यांची निवड झाली. माणगांवातील औद्योगिक क्षेत्रातील पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी शिक्षण, पर्यावरण, आरोग्य, महिला सक्षमीकरण तसेच इतर कल्याणकारी उपक्रम सातत्याने राबवत असते.

### दहा गणांच्या आरक्षणासाठी सोडत

**महाड :** पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुक सदस्यांच्या आरक्षणासाठी सोमवारी (दि.१३) विशेष सभा आयोजित केली असून या सभेसाठी तालुक्यातील सर्व राजकीय पक्षाचे नेते, पुढारी कार्यकर्ते व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन महाडचे तहसीलदार महेश शितोळे यांनी केले आहे. यामध्ये धामणे, बिरवाडी, वरंध, खरवली, नडगाव तर्फे बिरवाडी, नाते, दासगाव, अप्पर तुडील, करंजाडी, विन्हेरे या १० जागांसाठी आरक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या बहुउद्देशीय सभागृहात सोडत पद्धतीने या जागांचे आरक्षण काढले जाणार आहे.



## बोर्वे शाळेतील शिक्षकांचा निरोप

**। पेण । प्रतिनिधी ।**

बोर्वे शाळेतून बदली झालेले मुख्याध्यापक अजित कोठेकर आणि उपशिक्षक विनोद म्हात्रे यांना नुकताच निरोप देण्यात आला. २०१९ मध्ये जेव्हा या शिक्षकांनी शाळेत प्रवेश केला तेव्हा विद्यार्थ्यांची संख्या फक्त नऊ होती. मात्र, त्यांच्या आथक प्रयत्नांनी शाळेचे रुप पालटले असून आज शाळेचा पट ५३ वर पोहोचला आहे. मुख्याध्यापक कोठेकर यांनी पद सांभाळल्यानंतर गावातील लोकांना एकवटले आणि शाळेचा विकास केला. त्यांनी डिजिटल क्लासरुम, संगणक कक्ष, प्रत्येक वर्गात एल.ई.डी. टीव्ही, प्रोजेक्टर स्पीकर इत्यादी व्यवस्था करून शाळेला एक नवं आणि आधुनिक रुप दिले. या प्रवासात विनोद म्हात्रे यांनी त्यांच्या खाद्यांला खांदा लावून सहकार्य केले. या निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन बोर्वे गाव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य, विद्यार्थी, पालक यांनी मिळून केले.

## म्हसळ्यात सोमवारी आरक्षणासाठी सोडत

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

आगामी पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता आरक्षणासाठी म्हसळा तहसीलदार साचिन खाडे यांनी सोमवारी (दि.१३) सकाळी ११ वाजता पंचायत समितीच्या सभागृहात विशेष सभा आयोजित केली आह. या सभेसाठी तालुक्यातील सर्व पक्षाचे नेते, कार्यकर्ते आणि नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन खाडे यांनी केले आहे. तसेच, अनु. जाती-जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी आणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करण्यासाठी सोडत पद्धतीने कार्यवाही होणार असल्याचेही खाडे यांनी सांगितले.



## मजगावमध्ये अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांचा शुभारंभ

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

देशभरातील सर्व आयटीआय संस्थांमध्ये एकाच वेळी सुरू करण्यात येणाऱ्या अल्पमुदत अभ्यासक्रमांच्या उद्घाटन कार्यक्रमाचा समारंभ बुधवारी (दि.८) संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन प्रसारणाद्वारे करण्यात आले. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण मुरुड येथील वीर कोंडाजी फर्जंद आयटीआय व मजगाव येथील मेहरुन्निस्सा अब्बास फक्की करिमी हॉल येथे संयुक्तपणे करण्यात आले होते. ऑनलाईन उद्घाटनाप्रसंगी पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे महत्त्व पटवून देत 'कौशल्य भारत, सक्षम भारत' या संकल्पनेला बळकटी देण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मेहरुन्निस्सा अब्बास फक्की संस्थेचे अध्यक्ष सैफुल्ला फिरफिरे, खजिनदार नौशाद शाबान, अझर उलडे, शबाब उलडे, आयटीआय व्यवस्थापन समिती सदस्य संजय ठाकूर, विकास कोळी, शिक्षकवर्ग व विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## लाकूड फर्निचर कारागिरांचा सन्मान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

ॲक्शन टेस्सा यांच्या माध्यमातून लाकूड फर्निचर उद्योगातील कारागिरांचा विशेष सन्मान करण्यात आला. इंजिनियअर्ड वूड पॅनल उत्पादनांची सर्वात मोठी उत्पादक आणि या क्षेत्रातील आघाडीची कंपनी ॲक्शन टेस्सा यांनी सलग दुसऱ्या वर्षी राष्ट्रीय सुतार दिन साजरा केला. या निमित्ताने कंपनीने फर्निचर उद्योगात काम करणाऱ्या कारागिरांना एक वेगळी ओळख देण्यासाठी त्यांचा सन्मान केला.



गेल्या वर्षीच्या कार्यक्रमाच्या प्रचंड यशानंतर, यावर्षी कंपनीने राष्ट्रीय सुतार दिनानिमित्त देशभरातील ५०हून अधिक ठिकाणी 'मेगा मीट' आयोजित केली होती. यावेळी हजारो कारागिरांनी फर्निचर बनवण्याची त्यांची कला सामायिक केली आणि राष्ट्रीय सुतार दिन साजरा केला. चित्रपट अभिनेता अजय देवगण यांच्या प्रेरणादायी शब्दांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी कारागिरांच्या कामाला सलाम केला आणि त्यांच्या अदृश्य भूमिकेचे कौतुकही केले. महत्त्वाचे म्हणजे, गेल्या वर्षीच्या यशावर आधारित, एमएसएमईच्या सहकार्याने विकसित केलेल्या तीन महिन्यांच्या कौशल्य विकास कार्यक्रम, वुड पॅनेल प्रोसेसिंग टेक्निकने सर्व ३० विद्यार्थ्यांना १०० टक्के प्लेसमेंट मिळवून दिली. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर लगेचच प्रत्येक विद्यार्थ्याला नोकरीची ऑफर देण्यात आली, जी उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि कार्यक्रमाच्या मजबूत उद्योग प्रासंगिकतेची साक्ष आहे.

## बळीराजा भात कापणीत व्यस्त

**। तळा । प्रतिनिधी ।**

परतीच्या पावसामुळे भातशेतीचे काही प्रमाणात नुकसान झाले असून गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघाडी दिली असल्याने तालुक्यातील बळीराजा भात कापणीच्या कामात व्यस्त झाला आहे. यंदा परतीच्या पावसामुळे बहुतांश ठिकाणी भात पिकाचे नुकसान झाले आहे. लहरी पावसाचा भरोसा नसल्यामुळे तळा तालुक्यात शेतकरी वर्गाची भात कापणीची लगबग सुरू झाली असून तालुक्यातील शेतकरी वर्ग भात कापणीच्या कामात मग्न झाला आहे. मात्र, वाढलेल्या मजुरीचा फटका बळीराजाला बसला आहे. वाढती महागाई, खते व बी बियाणांचे वाढलेले दर यामुळे सध्याच्या काळात शेती करणे परवडणारे नाही. मात्र, अशा परिस्थितीत देखील तालुक्यातील बहुतांश शेतकरी शेती करत आहेत. परतीच्या पावसामुळे भात शेतीचे होणारे नुकसान वाचवण्यासाठी दिवसा कडक उन्हातही भात कापणी केली जात आहे. त्यातच भात कापणीला मजुरांची देखील कमतरता जाणवत आहे. तरी देखील मिळतील ते मजुर घेऊन लवकरात लवकर भात कापणी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## मतदार यादीतील हरकतीसाठी मुदत

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकी करिता मुरुड पंचायत समिती प्रारुप मतदार यादी बुधवारी (दि.८) प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी मुरूड तहसिल कार्यालय व पंचायत समिती कार्यालयात तालुक्यातील सर्व नागरिकांना अवलोकनार्थ ठेवण्यात आली आहे. या प्रारुप मतदार यादीवर हरकत असल्यास तशी लेखी हरकत व सुचना दि. १४ ऑक्टोबरपर्यंत कार्यालयीन वेळेत तहसिल कार्यालयात सादर करावी. अंतिम तारखेनंतर कोणत्याही लेखी हरकती आणि सुचना स्वीकारल्या जाणार नाहीत, असे तहसीलदार आदेश डफळ यांनी सांगितले आहे.

## उद्योग योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

प्रधान मंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नयन योजनेत कृषी वा बिगर कृषी क्षेत्रातील लाभार्थ्यांनी अर्ज करून लाभ घेण्याचे आवाहन राज्य शासनातर्फे करण्यात येत आहे. या योजनेमध्ये वैयक्तिक, स्वयं सहायता समूह, भागीदारी कंपनी, शेतकरी कंपनी, खासगी कंपनी, सहकारीसंस्था, गैर सहकारी संस्था वा व्यक्ती सहभागी होऊ शकतात. यामध्ये नवीन किंवा अस्तित्वात असलेले सर्व प्रकारचे अन्न प्रक्रिया उद्योगांचा समावेश आहे. या योजनेंतर्गत बँक व्याज दर वार्षिक ८ ते १२ टक्क्यांपर्यंत आकारले जाणार असुन नियमानुसार या योजनेअंतर्गत राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य आहे. ही कर्ज मुदत कमीतकमी १ ते १० वर्षे असून अनुदानाची मर्यादा मुदत कर्ज रक्कमेच्या ३५ टक्के किंवा जास्तीत जास्त १० लाख रुपये पर्यंत असणार आहे. हा प्रकल्प चालू झाल्यानंतर ६ महिन्यांत अनुदान बँकेत जमा होईल. परंतु, ३ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर त्याचा लाभ घेता येईल. व्यवसाय ३ वर्षा अगोदर बंद केल्यास किंवा बँक हफ्ते थकीत राहिल्यास अनुदानाचा लाभ भेटणार नाही याची नोंद घ्यावी. असे शासनातर्फे सांगण्यात येत आहे.

**अधिकृत संकेतस्थळाचे उद्घाटन | वेबसाईट तयार करणारी पहिली ग्रामपंचायत**

## साळाव ग्रामपंचायतीचे 'डिजिटल' पाऊल

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

स्मार्ट ग्राम पुरस्कारासाठी आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानामध्ये सक्रिय सहभागामुळे, साळाव ग्रामपंचायत सध्या तालुक्यात चर्चेत आहे. या दोन्ही महत्त्वपूर्ण योजनांच्या पूर्ततेसाठी ग्रामपंचायतीत अनेक अभिनव उपक्रम राबवले जात आहेत. त्याच प्रयत्नांचा भाग म्हणून, तालुक्यातील साळाव ग्रामपंचायतीने डिजिटल युगात एक अभिनव पाऊल टाकले असून, ही ग्रामपंचायत मुरुड तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये स्वतःची अधिकृत वेबसाईट तयार करणारी पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.




मुरूड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी खताळ यांच्या हस्ते सोमवारी (दि.६) साळाव ग्रामपंचायतीच्या अधिकृत संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आले. हा सोहळा साळाव ग्रामपंचायत कार्यालयात पार पडला. यावेळी बोलताना गट विकास अधिकारी खताळ यांनी या डिजिटल उपक्रमाचे विशेष कौतुक केले. ते पुढे म्हणाले की, मुरुड तालुक्यासाठी हा एक मैलाचा दगड आहे. स्मार्ट ग्राम व समृद्ध पंचायत अभियानांतर्गत अशा डिजिटल सुविधा अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. साळाव ग्रामपंचायतीच्या salavpanchayat.org या संकेतस्थळामुळे ग्रामस्थांना शासनाच्या विविध योजना, आवश्यक दाखले आणि ग्रामपंचायतीच्या कामांची माहिती तात्काळ उपलब्ध होईल. त्यामुळे प्रशासनात पारदर्शकता वाढण्यास मदत होईल, असे खताळ यांनी नमूद केले.

या कार्यक्रमासाठी सरपंच वैभव कांबळी, उपसरपंच दिनेश बापलेकर, ग्रामसेवक आशा बिरवाडकर यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब नाट्यगृहाचे नूतनीकरण

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण खात्याकडून १० ऑगस्ट २००४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते महाडच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील नाट्यगृहाचे लोकार्पण झाले होते. मात्र, या नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी १ जानेवारीपासून हे नाट्यगृह बंद राहणार असल्याची माहिती या स्मारकाचे व्यवस्थापक प्रकाश जमदाडे यांनी कृषीवलच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.



२०२१ मध्ये आलेल्या महापुरानंतर या स्मारकातील विविध ठिकाणची यंत्रणा दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र, मागील काही वर्षात ती पुन्हा नादुरुस्त झाल्याने समाज कल्याण खात्यामार्फत या संदर्भात स्थानिक व्यवस्थापनाकडून देण्यात आलेला प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून या कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या नाट्यगृहा अंतर्गत पत्रे बदलणे, पडदे बदलणे, नवीन खुर्च्यांची निर्मिती, सेंट्रल वातानुकूलित यंत्रणा बसविणे, पीओपीची नवीन निर्मिती, डख नवीन तयार करणे, प्रकाश यंत्रणा व ध्वनीयंत्रणेची नव्याने निर्मिती, ड्रेसिंग रूम सुसज्ज करणे, लाईट कंट्रोल रूम मधील लाईट ऑपरेटर स्विच नवीन करणे तसेच नाट्यगृहात प्रेक्षक लाईट योजना नव्याने निर्माण करण्याचा समावेश आहे. महाडकरांची मागणी आता शासनाकडून मंजूर झाल्याने काही काळानंतर पुन्हा एकदा नव्याने कार्यक्रमांचे आयोजन केले, जाईल असा विश्वास महाडकर व्यक्त करीत आहेत.




## राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक समस्या सतावतील. भावंडांशी मतभेद संभवतात. नोकरीत सहकाऱ्यांचा सल्ला लक्षात घ्या.
- **वृषभ** : प्रलंबित कामांना गती येईल. ज्येष्ठांचं मार्गदर्शन हिताचं ठरेल. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात संधी लाभतील.
- **मिथुन** : अनावश्यक ताण टाळायला हवा. महत्त्वाचे करार लांबणीवर पडतील. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.
- **कर्क** : अंगभूत कला-गुणांचा विकास होईल. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. आर्थिक स्थैर्य लाभेल.
- **सिंह** : घरगुती अडचणी सुटतील. विवाहाच्या प्रयत्नात यश येईल. भागीदारी व्यवसायात उत्कर्ष होईल.
- **कन्या** : सरकारी कामं विलंबानं होतील. प्रयत्नातील सातत्य कायम ठेवावं. गृह सजावटीत अनुकूलता राहील.
- **तूळ** : दिवसाच्या सुरूवातीस दिलासा मिळेल. प्रियजनांच्या भेटी होतील. किरकोळ बाबीं त्रासदायक ठरतील.
- **वृश्चिक** : कलाकारांचा उत्साह वाढेल. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा. बेरोजगारांना उत्तम दिलासा मिळेल.
- **धनु** : अचानक धनलाभ संभवतो. कामासाठी प्रवास लाभदायी ठरेल. प्रापंचिक अडचणींवर मात करू शकाल.
- **मकर** : कर्तव्याकडे अधिक लक्ष द्यावं. मन विचलित करणाऱ्या घटना संभवतात. भलतं साहस करू नका.
- **कुंभ** : उत्कर्षाच्या नव्या संधी लाभतील. कार्याचं इतरांकडून कौतुक होईल. मानसिक स्वास्थ्य उत्तम राहील.
- **मीन** : परिश्रमपूर्वक यश साध्य करता येईल. जुनी येणी वसूल होतील. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता लाभेल.

## १० ऑक्टोबर
दिनविशेष

**१९०६ :** ख्यातनाम लेखक आर. के. नारायण यांचा जन्म.
**१९५४ :** हिंदी चित्रपट अभिनेत्री रेखा यांचा जन्म.
**१९९८ :** भारताचे २९ वे सरन्यायाधीश म्हणून आदर्श सेन आनंद यांनी कार्यभार सांभाळला.
**२००८ :** प्रख्यात कथ्थक नर्तिका रोहिणी भाटे यांचं निधन.
**२०१३ :** मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने निवृत्त होत असल्याचं जाहीर केलं.

## उच्च रक्तदाबाचे परिणाम
आरोग्यमंत्र

उच्च रक्तदाबाचा त्रास हा आजकाल खूप कॉमन झाला आहे. बऱ्याच जणांना उच्च रक्त दाबाचा त्रास होताना दिसतो. मात्र त्याकडे दुर्लक्ष करणे जीवावर बेतू शकतो. अपूर्ण झोप, व्यायामाचा अभाव अशा अनेक घातक सवयी उच्च रक्तदाबासाठी कारणीभूत आहेत. सामान्य रक्तदाब (ब्लड प्रेशर) १२०/८० पर्यंत असते. तर १४०/९० पेक्षा जास्त आकडा आल्यास त्याला हाय ब्लड प्रेशर मानलं जातं. वयानुसार ही रेंज बदलत राहते. एका संशोधनानुसार, भारतात सुमारे ३० टक्के तरुणांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे. त्यापैकी ३४ टक्के व्यक्ती शहरी भागांत तर २८ टक्के व्यक्ती ग्रामीण भागांत राहतात. महिलांच्या तुलनेत पुरुषांमध्ये उच्च रक्तदाबाची शक्यता ३ टक्के अधिक असते. पुरेशा प्रमाणात पाणी प्यायल्यास उच्च रक्तदाब कमी करता येऊ शकतो, असं तज्ज्ञांनी म्हटलं आहे. उच्च रक्तदाब म्हणजे, हृदय गरजेपेक्षा अधिक वेगाने रक्त पंप करतं. अधिक वेगाने आलेलं हे रक्त रक्तवाहिन्यांमधून जाण्यासाठी हृदय , मेंदू, किडनी , डोळे आणि शरीराच्या इतर अवयवांवर अतिरिक्त दबाव पडतो. उच्च रक्तदाबामुळे हृदयविकाराचा झटका, हृदयाशी संबंधित आजार , स्ट्रोक, धमन्यांचा आजार, डिमेन्शिया, किडनीचा आजार यांचा धोका अधिक वाढतो. त्यामुळे उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी स्वत:कडे दुर्लक्ष करता कामा नये. उच्च रक्तदाबाचा त्रास असाऱ्या कोणत्याही व्यक्तीला मीठ कमी खाण्याचा सल्ला दिला जातो. त्याचप्रमाणे पुरेशा प्रमाणात पाणी प्यायल्यासही उच्च रक्तदाबाचा त्रास कमी होऊ शकतो.



## ॲपलटन थर
महत्त्वपूर्ण काही...

सर एडवर्ड व्हिक्टर हे १९४७ च्या भौतिकीच्या नोबेल पारितोषिकाचे विजेते म्हणून आपल्याला परिचित आहेत. केंब्रिज येथील सेंट जॉन्स कॉलेजमध्ये त्यांनी शिक्षण घेतलं परंतु पहिल्या महायुद्धात सैन्यात दाखल होण्यासाठी शिक्षण अर्धवट सोडावं लागलं. युद्धकालात सिग्नल ऑफिसर म्हणून काम करत असताना त्यांना रेडिओसंबंधी आवड निर्माण झाली आणि युद्धानंतर केंब्रिजला परतल्यावर त्यांनी या विषयाचा अभ्यास सुरू केला. १९२० मध्ये कॅव्हेंडिश प्रयोगशाळेत ते प्रायोगिक भौतिकीचे साहाय्यक निर्देशक आणि नंतर १९२२ मध्ये ट्रिनिटी कॉलेजमध्ये साहाय्यक प्राध्यापक होते. १९२४-३६ पर्यंत लंडन विद्यापीठात आणि त्यानंतर केंब्रिज विद्यापीठात ते भौतिकीच्या प्राध्यापकपदावर होते. वातावरणातील केन्ली हेव्हीसाइड थराचं अस्तित्व त्यांनी प्रायोगिकरित्या दाखवून दिलं आणि त्याची उंचीही मोजली. या थराच्याही वरती आणि जमिनीपासून २३० किमी. उंचीवर पृथ्वीभोवती रेडिओ लघुतरंग परावर्तित करणारा एक थर ॲपलटन यांना आढळून आला. या थराला 'ॲपलटन थर' असं नाव मिळालं आहे.

## पंचांग

**शुक्रवार १० ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, अश्विन कृष्ण ४, चंद्रराशी : वृषभ, योग : सिद्धि, नक्षत्र : कृत्तिका, सूर्योदय : ६.३३, सूर्यास्त ६.१८

## फॉरवर्डस

**इस शहर क़ी रिवायत सें तुम अंजान हों दोस्त...**

**यहाँ याद रहनें क़े लियें याद दिलानां पड़ता हैं...!**

## परसबाग

इप्सम सॉल्ट या स्वयंपाकघरात वापरल्या जाणाऱ्या घटकाच्या साह्याने बाग खुलवता येते. इप्सम सॉल्टच्या मदतीने बागेतील रोपं बहरतात. रोपांमधल्या सल्फर, नायट्रोजन आणि फॉस्फरचं प्रमाण वाढतं. विशेषत: गुलाबाच्या रोपांना या सॉल्टचा चांगला लाभ होतो. म्हणूनच अर्धा कप इप्सम सॉल्ट चार लिटर पाण्यात विरघळून तयार होणाऱ्या द्रावणात गुलाबाची रोपं थोडा वेळ ठेवावी आणि नंतर लावावी. रोप लावल्यानंतर बाजूला खड्डा करुन त्यात चमचाभर सॉल्ट घालून पाणी द्यावं. यामुळे रोप टवटवीत राहतं. छान वाढतं.

## साकारा सुगंधी विश्व
गृहसजावट

स्त्रियांना फुलांची जात्याच आवड असते. त्यामुळे त्या घरात जमेल तेव्हा वेगवेगळ्या फुलांची आकर्षक सजावट करत असतात. अशा पुष्परचनेमुळे फुलदाणी किंवा फ्लॉवरपॉटचे विश्वही आता विस्तारले आहे. मेटल, टेराकोटा, सिरॅमिक, काच अशा वेगवेगळ्या प्रकारांमध्ये फ्लॉवरपॉट मिळत असले तरी काचेच्या फ्लॉवरपॉटचे सौंदर्य वेगळेच असते. आधुनिक घरातील एक कोपरा फुलांच्या अस्तित्वाने व्यापलेला असतो. शिवाय छोट्या सेंटरटेबलवर आणि डायनिंग टेबलवरही छोटीशी पुष्परचना हवीच. योग्य आकार आणि योग्य रंगाच्या फुलदाणीची निवड मूळ पुष्परचनेच्या सौंदर्यात भर घालते. गुलाब, गुलछडी, डेलिया आणि पामची पाने वापरून मोठ्या पुष्परचना करायच्या तर उभट आकाराच्या परंतु तळाकडे पसरट आणि डेरेदार असणाऱ्या जड आणि जाड काचेच्या फ्लॉवरपॉटचा उपयोग करावा. फ्लॉवरपॉट डार्क निळ्या, हिरव्या, पांढऱ्या पारदर्शी काचेचे किंवा फिनिश्ड चिनीमातीचे असावेत. अशाच मोठ्या पुष्परचना कृत्रिम फुलातून बनवायच्या तर हॉट सिरॅमिकचे भले मोठे पॉट योग्य ठरतात. हल्ली पुष्परचनेसाठी वेट ॲक्रेलिक स्पंजचा वापर करत असल्यामुळे कमी उंचीचे किंवा उथळ पॉटही वापरता येतात.

## चिनी भाषेत प्राविण्य मिळवा
करिअरवाटा

परकीय भाषा शिकण्याची इच्छा असेल तर चिनी भाषेचा प्राधान्याने विचार करायला हवा. कारण फ्रेंच, स्पॅनिश, जॅपनीज, जर्मन आदी भाषांप्रमाणे उत्तम कारकिर्दीसाठी ही भाषादेखील कामी येणारी आहे. चीनचा वाढता दबदबा पाहता या भाषेतल्या शिक्षणातल्या शिक्षणाचा मोठा लाभ मिळू शकतो. चायनीझ बिझनेस कोर्सअंतर्गत चिनी भाषेतील ५५० शब्द शिकवले जातात. प्रथमस्तरावर मिळालेल्या या माहितीद्वारे चिनी भाषेचं जुजबी ज्ञान मिळतं आणि या भाषेत तोडकंमोडकं बोलता येतं. या अभ्यासक्रमात शब्दांच्या उच्चारावर भर दिला जातो. विद्यार्थ्यांकडून चिनी उच्चार शुद्ध करून घेतले जातात. पाकिस्तान, बांगलादेश, म्यानमार आणि श्रीलंकेच्या आर्थिक विकासात चीनची भूमिका मोठी आहे. त्यामुळे या भाषेचं शिक्षण अशा विविध देशांमध्ये उपयोगी पडू शकतं. हा लेटरग्रेडिंग कोर्स आहे. आयआयएम, अहमदाबाद इथं पाचव्या सेमिस्टरमध्ये या भाषेचा अंतर्भाव करण्यात आला आहे. यामध्ये टेस्ट आणि अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रं दिली जातात. चीनी भाषा अवगत झाल्यावर कारकिर्दीच्या नवनवीन संधी प्राप्त होऊ शकतात.




## खेचाखेची

**पालक पनीर**

बायकोने नवऱ्याला विचारले, असे काय पांढरी पँट आणि हिरवा शर्ट घालून आला आहात?

**नवरा:** का? कोणी काही म्हणलं का?

**बायको:** माझ्या मैत्रिणी विचारत होत्या, हे कोणाचं पालक पनीर फिरतंय म्हणून.

## वेगळं काही

छत्तीसगडमधल्या कोंडागाव जिल्ह्यात लिंगेश्वरी मातेचं मंदिर आहे. हे मंदिर वर्षातून फक्त एकदाच उघडतं आणि तेही फक्त बारा तासांसाठी. छत्तीसगडमधला हा जिल्हा नक्षल प्रभावित आहे. त्यामुळे इतर भागातले लोक या ठिकाणी फारसे येत नाहीत. हिरव्यागार जंगलाच्या मधोमध अलोर नावाचं छोटंसं गाव आहे. या गावातल्या डोंगरांवर निसर्गाची एक कलाकृती पहायला मिळते. याच कलाकृतीच्या दारावर एक दगड आहे. हा दगड हटवल्यानंतरच मंदिरात प्रवेश करता येतो. या मंदिरात शंकर आणि पार्वतीच्या एकत्र रूपाला लिंगेश्वरी नावाने संबोधलं जातं. या मंदिरातल्या देवतेला काकडीचा नैवेद्य दाखवला की नवस पूर्ण होतो अशी इथल्या लोकांची श्रद्धा आहे.

## पालकांनी काही नियम पाळायला हवेत
संगोपन

मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणं गरजेचं असतं. त्यासाठी पालकांनी काही नियम पाळायला हवेत. याविषयी...



* मुलांसोबत विविध खेळ खेळा. मुलांची आकलन शक्ती प्रचंड असते. ते बऱ्याच गोष्टी झटपट शिकून घेतात. मुलांसोबत खेळताना त्यांना बऱ्याच गोष्टी समजावून सांगता येतात. चुकांची जाणीव करून देता येते. कोणत्या परिस्थितीत कसं वागायचं याचे धडे देता येतात. खेळांच्या माध्यमातून त्यांची कौशल्यं विकसित होऊशकतात. * मुलांच्या दिनक्रमाविषयी जाणून घ्या. दिवसभरात काय केलं, शाळेत नवं काय शिकवलं हे त्यांना विचारा. त्यांच्याकडून काही गोष्टी जाणून घेताना तुम्हीही तुमचा दिनक्रम त्यांना सांगा. यामुळे मुलं संवाद साधायला शिकतील. * मुलांसोबत बौद्धिक कौशल्यं आणि क्षमता वाढवणारे खेळ खेळा. नंबर गेम्स, कोडी सोडवणं यामुळे त्यांचा मेंदू दुप्पट वेगाने काम करूलागेल. अशा खेळांमधून आयुष्यातल्या आव्हानांना सामोरं जाण्याची कलाही तुम्ही त्यांना शिकवू शकाल. * दुपारी किमान एक तास मुलांना झोपवा. दुपारच्या आरामामुळे मुलांच्या मेंदूची क्षमता वाढते. * मुलांवर उगाचच ओरडू नका. त्यांना नीट, प्रेमाने समजावून सांगा.

## सुडोकू १४ [redacted]


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २ | | १ | ६ |
| ३ | १ | ४ | ६ | | | | | ७ |
| | ९ | | | | ४ | ५ | ३ | |
| | | ७ | ८ | ६ | | | | ९ |
| ८ | | | | ९ | | | | २ |
| ९ | | | | ४ | ७ | ३ | | |
| | ७ | ५ | ३ | | | | ९ | |
| ४ | | | | | ९ | ७ | ६ | ३ |
| ६ | ३ | | ४ | | | | | |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १३ चे उत्तर [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ५ | १ | ७ | २ | ३ | ८ | ६ | ४ |
| २ | ३ | ८ | ९ | ८ | ४ | १ | ५ | ७ |
| ७ | ४ | ८ | ५ | १ | ६ | ९ | २ | ३ |
| ६ | ७ | ५ | १ | ४ | ९ | ३ | ८ | २ |
| ८ | ९ | ३ | २ | ७ | ५ | ४ | १ | ६ |
| १ | २ | ४ | ६ | ३ | ८ | ७ | ९ | ५ |
| ३ | ६ | २ | ८ | ९ | ७ | ५ | ४ | १ |
| ४ | १ | ९ | ३ | ५ | २ | ६ | ७ | ८ |
| ५ | ८ | ७ | ४ | ६ | १ | २ | ३ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक १४



**आडवे शब्द :-**
१) ताजमहालाचा दगड
५) सरसनीरस, बरेवाईट
८) शरीर
१०) शिळाच्या विरुद्ध
११) नगरपलिकेचा अध्यक्ष
१३) सटरफटर, किरकोळ सामान
१५) दुर्दशा
१७) अंधार
१८) बेचव
२०) जन्म
२२) ढीग
२४) पायदळाचा शिपाई
२६) मनाचे श्लोक लिहिणारे
२९) झकास
३०) व्यायाम
३२) पुन्हा
३४) राज्ञी
३६) अनुमती
३९) पोत्याचे कापड
४१) जननी
४२) गुणाकारच्या विरुद्ध
४४) बारा वर्षाचा काळ
४६) धातूचा धागा
४७) रात्रभर
४९) बाजेची सुती पट्टी
५१) विनाकारण
५२) मत देण्याची क्रिया
५४) कौरव पांडवांची कथा
५६) गरळ ओकणारा सरपटी प्राणी
५७) विविध
५९) सूर्याचे एक नाव
६०) डोंगर
६१) शूर पुरुष
६३) अशुभ सावली
६४) मान, प्रतिष्ठा
६६) बशीचा जोडीदार
६८) चित्रपटाचा पडदा
७०) रत्न
७२) माफ
७४) युद्धात आलेले मरण
७६) वर्तुळ
७७) लोकनाट्य
७८) *** निर्यात
७९) स्तुती

**उभे शब्द :-**
१) राग उत्पन्न करणारा
२) गणपतीचे एक नाव
३) इंग्रजीत एक
४) रक्त(ग्रा)
५) उद्देश, जे साधावयाचे ते
६) असुर
७) धोबी
८) कोल्हापुरची महालक्ष्मी
९) हत्ती
१२) वंदनाचा एक शब्द
१४) पोपट
१६) अरण्यातील वाट
१९) दुसऱ्याच्या कबजातील
२१) अर्जुनाचे एक नाव
२३) सद्वर्तन
२५) उणीव, न्यूनता
२७) अभिप्राय
२८) भूपती
३१) वाकबगार
३३) निमग्न
३५) दोरा
३६) उद्याच्या नंतरचा दिवस
३७) बातमी
३८) कवी
४०) फळाचे साल
४१) विश्राम
४२) हिंदुस्थान
४३) अरण्य
४५) पुन्हा पुन्हा
४८) सामन्यातील पराक्रमी खेळाडू
५०) दारूचा एक प्रकार
५१) श्रद्धा नसलेला
५३) गुलामी
५५) फुलाची माळ
५७) बाई
५८) प्रफुल्लित
६१) प्रणयलीलेत नखाने काढलेला ओरखडा
६२) रात्र
६३) सर्प
६५) किंमत
६७) पळून जाणे
६९) जेवायला बसलेल्यांची रांग
७१) वधू
७३) आईचा भाऊ
७५) नदीचा काठ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# यशस्वी निवृत्त जीवनाचा मुलमंत्र






डॉ.निर्मला राव (मुंबई)



कशाला काही शिकायचं, कशाला कुठला नवीन प्रयत करायचा? असले विचार पूर्णपणे मोडून काढायची गरज आहे! खरं म्हणजे, हा काळ अतिशय सुखकर असा काळ ठरू शकतो. आपल्या दृष्टिकोनावरच सगळं अवलंबून आहे. आपल्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करून झाल्या आहेत, आता कसलाच दबाव नाही, कसलीच घाई नाही, आता सर्व आरामाचे व मनासारखे व्हावे - असे वाटायला हरकत नाही. नोकरी-धंद्यातून निवृत्त होऊन आता मला माझ्या अपुऱ्या इच्छा व स्वप्नांकडे पहायचे आहे

एक मुक्त आयुष्य जगायच आहे! असं म्हणत निवृत्त होणारी मंडळी, कधी-कधी या ''मुक्ततेत'' बिथरून जातात. आपलं अस्तित्वच जणू हलले आहे असे त्यांना वाटू लागते. आपले काम, आपला हुद्दा यावरून आपली ओळख ठरवणारे, आता आपली ओळख काय राहिली, या विचारात अडकून जातात. रोज कुठे जाण्याची गडबड नाही, काही कामच नाही, असे वाटून एक पोकळी निर्माण होऊ शकते. रोज भेटणाऱ्या लोकांचा लोंढा अचानक नाहीसा झाल्याने एकटेपणा जाणवू लागतो. वयाप्रमाणे कधी छोटे, कधी मोठे असे आजार आघात करू लागतात. बरं जे या सगळ्यात न अडकता खरंच मुक्त जगतात, इतरांना त्यांचा हेवा ही वाटे, व आपल्याला असे अनुभव का नाही मिळत याबद्दल राग अथवा दुख ही वाटे. आपल्या कुटुंबियांसोबत वेळ घालवावा असे वाटत असते, पण ते आपल्याच ''धुंदीत'' अर्थात आपापल्या कामात व्यस्त असतात. कोणालाच माझ्यासाठी वेळ नाही असे ही कधी वाटू लागते. कधी-कधी वाढत्या महागाईमुळे आर्थिक चणचण देखील जाणवू शकते. हाच का तो सुखकर काळ, ज्याची मी स्वप्नं रंगवली होती, असा प्रश्न ही पडू शकतो.

आशा वेळी काय करावे? आपणच आपला आधार बनावे व आपला रस्ता आपणच शोधावा. लक्षात घ्यावे - एक परिपूर्ण आयुष्य म्हणजे सर्वांगी विकास ! त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत काहीतरी करत राहणे, आपल्याला व्यस्त ठेवणे हे गरजेचे असते. मुख्यत: आपल्या शारीरिक आरोग्याची काळजी घ्यावी - योग्य आहार, योग्य व्यायाम, व पुरेशी झोप याकडे लक्ष्य द्यावे. आपल्या मेंदुस ही चालना हवी त्यासाठी नवीन गोष्टी शिकणे, नवनवीन विचारांचे मंथन करणे, जगातील बदलत्या परिस्थिती बद्दल जाणून घेणे, वेगवेगळ्या क्षेत्रातील होणारे बदल समजून घेणे, इत्यादी बौद्धिक क्रियांचा आपल्या दिनक्रमात समावेश असावा. याशिवाय आपल्या मानसिक आरोग्याची ही काळजी घ्यावी. नसत्या विचारात व तुलनेत न अडकता, आपल्याला काय शक्य आहे, ते शोधावे व करत राहावे. समाधान हे बाह्य गोष्टीत नसून, स्वत:च्याच विचारात आहे, हे लक्षात घ्यावे. स्वत:कडे काय नाही, हे बघत बसल्यापेक्षा मला काय मिळाले आहे, याचा विचार करावा. वास्तवाला स्वीकारून कठीण परिस्थितीवर मात करत पुढे जात राहावे !

रिक्तपणा घालवण्यासाठी, स्वत:ला गुंतवून ठेवावे. काहीतरी शिकावे, काहीतरी वाचावे, काहीतरी लिहावे. माणसांनी नेहमी सकारात्मक व सक्रिय असावे. मी अजून काही शिकू शकते, अजून इतरांच्या आयुष्यात माझे मोलाचे योगदान असू शकते ही धारणा कुठल्या तरी संस्थेशी स्वत:ला जोडून घ्यावे व सामाजिक कार्यात आपले योगदा गरीब मुलांना शिकवणे, मागासलेल्या वर्गातील स्त्रियांना आर्थिक पातळीवर सक्षम होण्या करता मार्गदर्शन करणे, नगरीकशास्त्राचे व नैतिकतेचे धडे सर्वांपर्यंत पसरवणे आशा अनेक कार्यामध्ये तुमचे योगदान महत्वाचे ठरेल. आपल्या अनुभवांचा इतरांना बराच उपयोग होऊ शकतो. कोणाला शिकवावे, कोणाला त्यांच्या नोकरी-धंद्यात मार्गदर्शन करावे. कोणाला तरी वेळ द्यावा, व्यक्त होण्यास जागा द्यावी, ''मी आहे'' हा आधार द्यावा. स्वत: पलीकडे जाऊन, इतरांसाठी काहीतरी करण्याची इच्छा ठेवावी, सामाजिक पातळीवर विचार करावा.

आनंदी राहण्यासाठी दुसऱ्यांवर अवलंबून न रहाता, स्वत:चा आनंद स्वत:च शोधावा - स्वत:चे छंद जोपासावे, आपल्या आवडी-निवडी जपाव्या, आपल्या मित्रपरिवराशी भेटावे- बोलावे. आपल्या लोकांना वेळ द्यावा, नातेसंबंध जपावे. पण इथे एक महत्वाचे - नाते हे जबरदस्तीने नव्हे, तर प्रेमाने जपायचे असते! सगळ्यांनी आपल्या प्रमाणेच वागायला हवे, हा हट्ट सोडून द्यावा. नवीन पिढीच्या नवीन कल्पना आपल्याला नेहमी पटतील असे नाही, पण त्यांचं आयुष्य त्यांच्या प्रकारे त्यांना जगू द्यावं. गोष्टी बदलतात, परिस्थिति बदलते, जग बदलते असे का, आमचेच विचार/आमच्याच पद्धती योग्य होत्या, असं ठरवून टाकण्याऐवजी नवीन विचार समजून घ्यावे. सगळंच पटेल असं नाही, पण सगळंच चूक नाही, हे लक्षात येईल. मग कळेल की जगाला बदलण्या आधी स्वत:ला बदलण अधिक महत्वाचे असतं!

ही वेळ भौतिक विश्वापलीकडे जाऊन, आंतरिक/आध्यात्मिक विश्वाचा शोध घेण्याची आहे, असे ही म्हणू शकतो. स्व-ज्ञान अर्थात स्वत:ची जाणीव, आयुष्याचा अर्थ, आपल्या जीवनाचे प्रयोजन, इत्यादी विषयांवर विचार करणे - हे सर्व या आध्यात्मिक प्रवासाचा भाग आहे. आत्मनिरीक्षण करून, ध्यान-चिंतनाचा मार्ग अवलंबून, आणि तत्वज्ञान वा धार्मिक सिद्धांतानच वापर करून, जीवनाचा एक उच्च बिंदु गाठण्याचा प्रयत करत राहावा. स्वत:चे छोटेसे विश्व ओलांडून, परमेश्वराच्या विशाल निर्मितीचा विस्तार व अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करावा.

लक्षात ठेवा - बदलत्या विश्वात स्थिरता शोधायची असते ती आपल्या मनाची!

## निवडक



### कोटियनने मुंबईला दिला आधार

**पुणे** : महाराष्ट्राच्या धावसंख्येचा पाठलाग करताना मुंबई संघाची दमछाक झाली. तनुष कोटियन (६२) आणि तुषार देशपांडे (६१) मदतीला धावले. त्यामुळे आठ बाद २१८ वरून मुंबईला दुसऱ्या दिवसअखेर नऊ बाद ३२० धावांपर्यंत मजल मारता आली. मुंबईच्या डावात हेडरवाडकर आणि सिद्धेश यांनीही अर्धशतके केली; परंतु आशिया करंडक स्पर्धेतील हीरो शिवम दुबे पहिल्याच चेंडूवर शून्यावर बाद झाला. काल एक फलंदाज गमावणाऱ्या मुंबईची आज सुरुवात निराशाजनक होती. दुसरा सलामीवीर अंगक्रिश रघुवंशीही अपयशी ठरला; मात्र अखेर हेरवाडकरने ५५ धावा करत किल्ला लढवला. त्यानंतर सिद्धेश लाडही ६४ धावांची खेळी सजवत असला तरी सुवेद पारकर आणि शिवम दुबेपाठोपाठ बाद झाल्यामुळे मुंबई संघावर दडपण आले होते. कोटियन आणि देशपांडे यांनी नवव्या विकेटसाठी ९९ धावांची भागीदारी केली आणि मुंबईला सावरले.

### चिनी स्पर्धेवर अमेरिकेचा ताबा

**नवी दिल्ली** : जागतिक पातळीवर अमेरिका आणि चीन यांच्यात असलेले वैर जगद्विख्यात आहे. आज चीन ओपन स्पर्धेत अमेरिकेच्या अमांदा ऑनिसिमोव्हाने दुसऱ्या सेटमधील चुकांना झुगारत सामन्यात पुनरागमन करत चायना ओपन महिला एकेरीचे जेतेपद पटकावले. तिने अंतिम सामन्यात झेक प्रजासत्ताकच्या लिंडा नोस्कोव्हाला ६-०, २-६, ६-२ अशा सेट्समध्ये पराभूत करत या वर्षी दुसर्या डब्ल्यूटीए १००० किताबावर आपले नाव जिंकला. जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या ऑनिसिमोव्हाने पहिल्या सेटमध्ये जोरदार फटकेबाजी करत केवळ २३ मिनिटांत प्रतिस्पर्धीवर मात केली. मात्र पहिल्यांदाच डब्ल्यूटीए १००० स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या २० वर्षीय नोस्कोव्हाने दुसऱ्या सेटमध्ये स्वत:ला सावरले. तिने सेटच्या पहिल्याच गेममध्ये सर्व्हिस ब्रेक करत ४-२ अशी आघाडी घेतली. दोन ब्रेक पॉइंट वाचवत तिने दमदार बॅकहॅण्ड व एसेसच्या जोरावर हा सेट जिंकला. तथापी यंदाच्या विम्बल्डन व अमेरिकन ओपनची उपविजेती ऑनिसिमोव्हा निर्णायक सेटमध्ये चपळाई व वेगाच्या जोरावर वरचढ ठरली. तिने सलग चार गेम जिंकत थकलेल्या नोस्कोव्हावर वर्चस्व गाजवले आणि करिअरमधील चौथे डब्ल्यूटीए जेतेपद आपल्या नावावर केले.

### शालेय जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत पनवेल, पेण सुधागडची बाजी

**पाली/गोमाशी :** क्रीडा व संयुक्त सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद रायगड द्वारा रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील जिल्हा क्रीडा संकुल नेहुली अलिबाग येथे ७ ते ८ ऑक्टोबर रोजी संपन्न झाली.या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत मुले १४ वर्ष वयोगट पनवेल ,१७ वर्ष रानपाखर पेण आणि १९ वर्ष वयोगट सुधागड ग. बा वडेर हायस्कूल व व. ग. ओसवाल ज्युनिअर कॉलेज पाली या सर्व विजयी संघाने स्पर्धेत प्रथम क्रमांकाच्या पारितोषकाची कमाई केली.शालेय जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेत १९ वर्षीय मुले सुधागड ग. बा.वडेर हायस्कूल व ओसवाल ज्युनियर संघाने प्रशिक्षक राकेश बेलोसे यांच्या मार्गदर्शनाखाली बहारदार खेळ करत कर्जत, रोहा, अलिबाग, पेण या संघाना एकतर्फी धूळ चारत प्रथम क्रमांक पटकावला त्याबद्दलसंस्थेच्या, महाविद्यालयाच्यावतीने अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## यु मुंबाचा बाद फेरीत प्रवेश

# बंगाल वॉरियर्सवर विजय

### गुणतालिकेत घेतली मोठी झेप



**। पुणे । प्रतिनिधी ।**

प्रो कबड्डी लीग स्पर्धेत बाद फेरीत प्रवेश करण्याचा अखेरचा मान यु मुंबाने मिळविला. लीगच्या ११ व्या पर्वात झालेल्या सामन्यात यु मुम्बाने बंगाल वॉरियर्सचा ३६-२७ असा पराभव केला. या विजयाने यु मुंबाने गुणतालिकेत पाचव्या स्थानावर झेप घेतली. यु मुंबा संघाने सातव्या पर्वानंतर प्रो कबड्डी लीगच्या बाद फेरीत प्रवेश केला. यु मुंबा बाद फेरीत प्रवेश करणार हे निश्चित होती. यु मुंबाने आज केवळ त्याची औपचारिकता पूर्ण केली.

यु मुंबाला बाद फेरी गाठण्यासाठी केवळ एक गुण आवश्यक होता. अखेरच्या दहा मिनिटांत बंगाल वॉरियर्सच्या बचावफळी आणि प्रणय राणेच्या चढाईने यु मुंबाच्या संयमाची कसोटी पाहिली. अखेरच्या सत्रात एकवेळ बंगालने ११ गुणांचा सपाटा लावला. यु मुंबा त्या वेळेस केवळ दोनच गुण मिळवू शकला होता. पण, तोवर वेळ संपत चालल्यामुळे यु मुंबा संघाला सुटकेचा निश्वास टाकता आला. पूर्वार्धातच काहिशा संथ सुरुवातीनंतर यु मुंबाने अजित चौहानच्या चढाया आणि सुनिल कुमारच्या बचावाने यु मुंबाने हळू हळू सामन्यावर नियंत्रण मिळविले आणि नंतर वर्चस्व राखले. पूर्वार्धात एक लोण देत त्यांनी मध्यंतराचा १८-१० अशी मोठी आघाडी मिळवली. उत्तरार्धात फार वेगळे चित्र दिसले नाही. यु मुम्बाने सामन्यावरील नियंत्रण निसटणार नाही याची काळजी घेतली. उत्तरार्धात झफरदानेशच्या चढाया निर्णायक ठरल्या. सुनिल कुमार आणि परवेश बैन्सवाल या दुकडीचा बचाव या सत्रातही बघायला मिळाला. संदीप कुमारचं सलग तिसरं सुपर १०; गुणतालिकेत घेतली मोठी झेप.एकूणच यु मुंबा संघाने नियंत्रणपूर्वक खेळ करताना विजयाची नोंद केली. बंगाल वॉरियर्सकडून केवळ प्रणय राणेला, नितेश राणेलाच छाप पाडता आली. चढाई आणि बचावातील त्यांची लढत बंगालसाठी निर्णय बदलू शकली नाही. नितेश कुमारने (८) हाय फाईव्ह पूर्ण केले, तर प्रणयने (१२) सुपर टेनची कामगिरी केली. अर्थात, उत्तरार्धात त्यांना यु मुम्बावर लोण चढविण्याचे समाधान लाभले.

### लंका प्रीमियर लीगमध्ये भारतीय खेळाडूंचा प्रवेश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लंका प्रीमियर लीगच्या (एलपीएल) सहाव्या हंगामात यंदा पहिल्यांदाच भारतीय क्रिकेटपटू मैदानात उतरणार असल्याची घोषणा आयोजकांनी केली. या घोषणेनंतर संपूर्ण क्रिकेटविश्वात आणि विशेषत: उपखंडातील चाहत्यांमध्ये उत्साहाला नवे उधाण आले आहे. हा रोमांचक हंगाम १ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. एकूण २४ सामने खेळवले जाणार असून त्यात २० साखळी सामने आणि ४ नॉकआउट सामने असतील. हे सर्व सामने कोलंबोतील प्रेमदासा आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, पल्लेकल क्रिकेट स्टेडियम आणि दांबुल्यातील रंगिरी दांबुला स्टेडियम या प्रमुख ठिकाणी पार पडतील. यामुळे एलपीएलच्याच नव्हे, तर संपूर्ण उपखंडातील क्रिकेटप्रेमींना या हंगामाची उत्सुकता लागली आहे.

## प्रवीणला उंच उडीत कांस्यपदक



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

येथे शनिवारी झालेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या उपांत्य दिवशी, उंच उडीत कांस्यपदक मिळाल्यानंतर प्रवीण कुमारला निराशा लपवता आली नाही. दुसरीकडे, क्लब थ्रोमध्ये आपले विजेतेपद राखण्यात अपयशी ठरलेल्या आणि रौप्यपदकावर समाधान मानाव्या लागलेल्या एकता भ्यानने पदकाची परंपरा कायम राखली. भारताने या दिवशी एक रौप्य आणि दोन कांस्य पदके जिंकली. यामुळे भारताची एकूण पदकसंख्या १८ (६ सुवर्ण, ७ रौप्य, ५ कांस्य) झाली आहे.

स्पर्धेचा एक दिवस शिल्लक असताना, जागतिक स्पर्धेतील ही भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. यापूर्वी, २०२४ मध्ये जपानमधील कोबे येथे झालेल्या स्पर्धेत भारताने १७ पदके (६ सुवर्ण, ५ रौप्य, ६ कांस्य) जिंकली होती. ब्राझील ३७ पदकांसह (१२ सुवर्ण, १८ रौप्य, ७ कांस्य) पदकतालिकेत अव्वल स्थानी कायम आहे. दिवसातील भारताचे तिसरे पदक पुरुषांच्या गोळाफेक एफ ५७ प्रकारात मिळाले. ४२ वर्षीय लष्करी जवान सोमन राणा यांनी १४.६९ मीटरच्या या हंगामातील सर्वोत्तम कामगिरीसह कांस्यपदक पटकावले. हँग्झू आशियाई क्रीडा स्पर्धेतील या रौप्यपदक विजेत्याने आपल्या चौथ्या प्रयत्नात ही सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. प्रवीणला दुखापतीचा फटकापॅरिस पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेता आणि पुरुषांच्या टी ६४ उंच उडी प्रकारात सुवर्णपदकाचा प्रबळ दावेदार मानला जाणारा प्रवीण कुमार, २.०० मीटरची हंगामातील सर्वोत्तम कामगिरी नोंदवूनही तिसऱ्या स्थानी राहिला. प्रवीणला यासाठी दोन प्रयत्न करावे लागले.

दुखापतीचा फटका बसल्याचे प्रवीणचे प्रतिपादनप्रवीण आपल्या इव्हेंटदरम्यान वेदनेनेत्रस्त असल्याचे दिसत होते. तो आपला रन-अप छोटा घेत होता आणि प्रत्येक प्रयत्नानंतर त्याच्या चेहर्यावर वेदना स्पष्ट दिसत होत्या. त्याने १.९७ मीटरची उंची सहज पार केली.

## अमनवर एका वर्षाची बंदी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या अमन सेहरावतला जागतिक वरिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेत वजन गटात अपयशी ठरल्याबद्दल भारतीय कुस्ती महासंघाने एक वर्षासाठी निलंबित केले आहे. पुरुषांच्या ५७ किलो फ्रीस्टाईल गटातील भारताच्या पदकाचा दावेदार असलेल्या २२ वर्षीय अमनला स्पर्धेच्या दिवशी निर्धारित वजनाच्या मर्यादेपेक्षा १.७ किलो जास्त वजन असल्याने अपात्र ठरवण्यात आले होते. यावरून ही कारवाई करण्यात आली. निलंबनाच्या या कालावधीत, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर डब्ल्यूएफआयने आयोजित केलेल्या किंवा मान्यता दिलेल्या कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होण्यास अथवा त्याशी संलग्न राहण्यास सक्त मनाई आहे, असे डब्ल्यूएफआयने नमूद केले आहे.

२३ सप्टेंबर २०२५ रोजीच्या पत्राद्वारे डब्ल्यूएफआयने अमनला या चुकीबद्दल स्पष्टीकरण मागण्यासाठी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. २९ सप्टेंबरला त्याने सादर केलेले उत्तर त्यांच्या शिस्तपालन समितीला असमाधानकारक आढळले. आपले २९ सप्टेंबर २०२५ रोजीचे उत्तर शिस्तपालन समितीने योग्यरीत्या तपासले. तसेच, मुख्य प्रशिक्षक आणि सहायक प्रशिक्षक कर्मचार्यांकडूनही स्पष्टीकरणे घेण्यात आली. सखोल तपासणीअंती, समितीला आपले उत्तर असमाधानकारक आढळले असून, कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे त्यात म्हटले आहे. दरम्यान, मुख्य प्रशिक्षक जगमेंदर सिंग आणि इतर तीन प्रशिक्षक सदस्य विनोद, वीरेंद्र आणि नरेंद्र यांनाही अजिंक्यपद स्पर्धेच्या तयारी दरम्यान वजन व्यवस्थापनावर लक्ष ठेवण्यात अपयश का आले, याबद्दल स्पष्टीकरण देण्यास सांगण्यात आले होते.

## पणदेरी पेवे पंचक्रोशी हायस्कूलचा

# खो-खो स्पर्धेत विजयाचा चौकार

**। मंडणगड । प्रतिनिधी ।**



मंडणगड तालुका विकास मंडळ (ऋ-१४२८) मुंबई संचलित, पणदेरी पेवे पंचक्रोशी हायस्कूल, पणदेरी या विद्यालयाने तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेत खो-खो या सांघिक खेळात सलग चौथ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावून जिल्हा स्तरीय पात्रता मिळविली आहे.

शाळेला खेळण्यासाठी मैदान नसताना व शा. शि. विषयाचे शिक्षक नसताना विद्यालयाने मिळविलेल्या यशाबद्दल सर्व स्तरातून खेळाडूंचे विशेष कौतुक होत आहे. शेवटच्या पणदेरी हायस्कूल व आंबवडे हायस्कूल यांच्यात झालेल्या फायनलच्या अटीतटीच्या लढतीत पणदेरी हायस्कूलच्या संघाने अक्षरशः विजयश्री खेचून आणत सलग चौथ्यांदा विजयी होत विजयाचा गुलाल उधळून तालुकास्तरावर सलग चौथ्यांदा विजयी होत विजयाचा चौकार पूर्ण केला. या यशामध्ये खेळाडूंच्या अथक मेहनतीबरोबरच मार्गदर्शक प्रशिक्षक वाकचौरे यांचे मोलाचे मार्गदर्शन व परिश्रम महत्त्वाचे ठरले आहेत. या कामगिरीबद्दल संस्था, शालेय समिती, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक व सर्व क्रीडाप्रेमींकडून सर्व खेळाडू व प्रशिक्षकांचे मनः पूर्वक अभिनंदन केले आहे.

## आकांशा नित्तुरे दुसऱ्या फेरीत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



नाशिकच्या खेळाडूंनी महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस स्पर्धेत वर्चस्व गाजवले. दिव्याने, मेन ड्रॉमध्ये क्वॉलिफ़ायिंग फ़ेरीतून प्रवेश केला असून तिने पाऊसामुळे परिणाम झालेल्या सामन्यात तिसऱ्या क्रमांकाची माहाराष्ट्राचा पूजा इंगळे हीचा ६-३, ६-४ असा पराभव केला. सामन्याची सुरवात अतिशय रोमांचक पद्धतीने झाली, दोन्ही खेळाडू ३-३ अशा बरोबरी ने खेळत असताना दिव्याने खेळावर नियंत्रण मिळवत थेट तीन गेम जिंकून सेट जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये देखील पहिल्या सेटप्रमाणे ३-३ अशी बरोबरी झाली, पण मध्यंतरापर्यंत दिव्याने पूजाची सर्विस ब्रेक करत ५-३ अशी आघाडी घेतली. त्या नंतर तिसरा क्रमांक असलेल्या पूजाने नेटभोवती उत्कृष्ट प्रदर्शन करत डाव पुढे नेला, पण दिव्याला तिचा सहावा गेम जिंकण्यापासून आणि पुढील फ़ेरीत जाण्यापासून ती थांबवू शकली नाही.

दरम्यान, खेळामध्ये आकांशाने पहिल्या फ़ेरीत महिला एकेरी सामन्यात अगदी पहिल्या गेम पासूनच आघाडी मिळवली, तिने उत्कृष्ट बेसलाईनसह तेलंगनाच्या पावनी पाठकला ६-०, ६-० अशा सरळ सेटमध्ये पराभूत केले. दुसऱ्या क्रमांकवर खेळणाऱ्या आकांशाने बेसलाईन जवळ आपल्या गतीचा उत्तम वापर केला आणि पावनीची सर्विस ब्रेक करत एकहाती विजय मिळविला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)